CERTIFICATE

IPTA Platinum Jubilee — ...प्टाची ७५ वर्षे

# IPTA- JAN NATYA SANGHA, AMRAVATI

(Reg. No. Maharashtra/110/2017/Amravati)

**Orgnised In Association with**

## Mahila Pradhyapak Parishad, S.G.B. Amravati University, Amravati

(Reg. No. Maharashtra/660/2001/Amravati)

# Inter Disciplinary National Research Conference-2017

## Theme - Women : Image & Reality

Mr./Prof./ Dr. डॉ वर्षा चिरवले

College/ University श्री शिवाजी कला, वाणिज्य महाविद्यालय अमरावती.

Has Attended Inter Diciplinary National Conference on **'Women : Image & Reality'**, at Amravati on 23 September 2017. also Presented a Paper. Hence This Certificate is Issued.

Title of the Paper लावणीतून व्यक्त झालेली स्त्री प्रतिमा


**Dr. Nisha Shende**
President
Mahila Pradhyak Parishad,
S.G.B. Amravati University, Amravati

**Prof. Deepak Wankhade**
Conference Secretory
Inter Disciplinary National Research Conference

**Dr. Satish Pawade**
President
INDIAN PEOPLES THETRE ASSOCATION,
AMRAVATI

# स्त्री : ◆ प्रतिमा आणि वास्तव ◆ छवि और यथार्थ

मुख्य संपादक
डॉ. सतीश पावडे



# Women: Image and Reality

# लावणीतून व्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा

डॉ. वर्षा चिखले
सहयोगी प्राध्यापक,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

मराठी साहित्यात शाहिरी वाङ:मयाला एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. शाहिरी वाङ:मयात लावणी आणि पोवाडा यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. मराठी वाङ:मयाचा इतिहास लिहिला जात असताना सारस्वतकारांनी शाहिरांचा देशभक्त म्हणून गौरव केला, तर अ.ब. कोल्हटकरांना शाहिरांच्या काव्यात मराठी काव्याची प्रभात जाणवली; परंतु थोडयाच दिवसात शाहिरांच्या भोवतालचे हे वलय नष्ट झाले आणि लवणीकार म्हणजे पोटासाठी कवणे करणारा, पैसा मिळावा म्हणून रचना करणारा शाहीर असे सिध्द करण्याचे प्रयत्न केले.

लावणी जेव्हा प्रथम निर्माण करण्यात येऊ लागली तेव्हा तिला सामाजिक प्रतिष्ठा नव्हती. शिष्ट समाजाची रचना म्हणूनच ती प्रसिध्द होती. तरी पण ती रूष्ट झाली नाही किंवा वाङ:मयातून नष्टही झालेली नाही. पुढे लोकशाहीचा उदय झाल्यानंतर ती लोकनाट्यातून आविष्कृत होऊन राजमान्य झाली. लावणी म्हटले की, तमाशात म्हटली जाणारी शृंगारिक लावणी नसून वात मनोरंजनासोबत आध्यात्मिकताही दिसून येते. एकुण अनेक विषयांवर लावण्या आढळतात. लावणीचे विविध प्रकार आहेत. लावणी हा दृकश्राव्य काव्यप्रकार आहे. या काव्यात संगीत, अभिव्यक्ती आणि विषय या तीन घटकांना महत्त्व आहे. लावणीची निर्मिती, स्वरूप, प्रकार, विषय यासंबंधी विवेचन न करता लावणीतून व्यकत झालेल्या स्त्री प्रतिमा हा शोधनिबंधाचा हेतू आहे.

**विषयप्रवेश :-** लावणी हा शब्द उच्चारला की, नजरेसमोर येते ती तमाशातील नर्तकी. डफ-तुणतुणा, ढोलकीच्या तालावर नाचत आहे. प्रेक्षक अश्लील चाळे करून तिला खुणावत आहेत. तिच्याकडे पैसे फेकत आहेत असे काहीसे तिचे स्वरूप. परंतु अलीकडे लावणीला दर्जा प्राप्त झालेला दिसतो. पंजाबचा भांगडा, गुजरातचा गरबा तशी महाराष्ट्राची लावणी मराठी मनावर आधिराज्य गाजवित आहे. म्हणूनच लावणीमधील स्त्री प्रतिमांचाही विचार होणे गरजेचे आहे. स्त्री म्हटली की तिला विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. विविध नाती निभवावी लागतात. त्या विविध नात्यांनी ती कशी बांधली जाते तिची मानसिकता, तिचे दु:ख, तिचा घुमसट या संदर्भात लावणीकारांनी लावणीत स्त्री प्रतिमा पुढे कशा रेखाटल्या आहेत त्याचा शोध घेण्याचा हा प्रयत्न.

संसारी स्त्रीचा पती मुलुखागीरीवर गेलेला असताना ती त्याच्या विरहात दिवस काढीत असते परंतु एक दिवस तिला शुभशकून होतो आणि ही भावना ती आपल्या मैत्रिणीजवळ बोलून दाखविते.

वामनेत्र आज सखे लवू लागला उगवता दिवस बाई आज चांगला
माडिया ग सज्जावरी का ग बोलतो हाच शकुन साक्ष पती मार्ग चालतो

अशा शब्दात होनाजीने स्त्रीच्या मनाचे चित्र रेखाटले आहे. कावळ्याचे ओरडणे, डोळा लवणे हे शुभ संकेत मानण्याची प्रथा होती दूर देशी गेलेला पती परत येण्याचा संकेत तिला मिळतो. संसारी स्त्रीला पती खूप दिवस घर सोडून जाऊ नये असे यातून चित्रित होते. काही दिवसानंतर जगाचे स्वरूप पालटते हे अनंतफंदी यांच्या जमाना आला उरफाटा या लावणीतून दिसते.

**जमाना आला उरफाटा सून सासूला लावी बट्टा**
**जावई सासूला म्हणतो तू काशी लवंडून देतो गातेशी**

होनाजीच्या लावणीतील सासू-सासऱ्याची सेवा करणारी स्त्री ही सासूला बट्टा-कलंक लावणारी दिसते. संसारात असणारी स्त्री ही प्रतिव्रता असावी अशीच आशा लावणीकरांनी व्यक्त केलेली आहे.

रूपवती स्त्रीचे वर्णन करतांना परशराम म्हणतो की,

छबिदार सूरत फाकडी बुंद राखडी जडून बरखडे
गुंफिणी वेणी नागिणी लडा गालावर दोनीकडे
वय अटकर बांधा लहान हरपले पाहून भूक तहान

यातून परशरामाने आकर्षक चेहऱ्याची रेखीव अशी स्त्री चित्रित केली आहे. वेणीला नागिणीची उपमा, तिची हळूवार चाल, तिचा अटकर बांधाही परशरामाच्या नजरेतून सुटत नाही. अशाच अर्वाच्या एका लावणीत ग.दि. माडगुळकर लावण्यवतीचे वर्णन करताना

**छबिदार नार गुलजार चालती नटून**
**नाकात नथ झोकात कशी लाखात दिसे उठून**

छबिदार हे विशेषण दोघांनीही वापरले यातून स्त्रीचे सुंदर रूप त्यांनी व्यक्त केले आहे. असे असले तरी अनेकांनी तिचे सौंदर्य हे पुरूषाच्या कमजोरीचा विषयच जणू ठरविला आहे. रामजोशी यांची सुंदरा मनामाधि भरली ही स्त्रीच्या उत्तम सौंदर्याचा नमुनाच म्हणायला हवी.

प्रेमभंगाचे किंवा अपेक्षाभंगाचे दु:ख हे स्वातंत्र्योत्तर लवणीकारांनी रेखाटले आहे.

**जरा आठवा सख्या झाल्या भेटी किती**
**प्रीत केली कशी हात धरूनी हाती**
**आता काळजावरती पाय ठेवू नका**

खेबुडकरांनी या लावणीतून प्रेयसीचे दुभंगलेले अंत:करण साकार केले आहे. प्रेम करून जीव लावून दूर न जाण्याविषयी


ISBN: 978-81-89839-99-4

प्रियकराला ती आर्त विनवणी करीत आहे. यातून स्त्रीच्या मनाची कल्पना येते. स्त्री जशी प्रियकरावर मनापासून प्रेम करते तशीच पती रूसून बसलेला आवडत नाही म्हणून ती परोपरीने समजूत काढण्याचा प्रयत्न करते.

**तुम्ही सजना सुजाग हया आदराचे पान**
**मज दुबळीचा राखा स्वाभिमान**
**तुम्ही का रूसला काय चुकले का केला**

यामधील भावनांची कोमलता रम्य आहे. आपल्या पतीसाठी जीवाचे रान करायलाही मागेपुढे न पाहणारी नायिका आहे, तसेच आपल्या सेवेत काहीतरी कमतरता आहे म्हणूनच पती सला आहे. अशी स्वत:कडे दोष ओढवून घेणारी स्त्री लावणीत दिसते. अनेक लावण्यांमधून आपल्या पतीला प्रश्न विचारणारी चतुर स्त्री शाहिरांनी चित्रित केली आहे.

**चंद्राचे चांदणे सितळ कां उष्ण प्राणपती**
**ते सांगा मजप्रती कल्पना डोळयामधि खुपती**

अशी चतुरपणे प्रश्न विचारणारी सगनभाऊची नायिका आहे. भारतीय परंपरेप्रमाणे पतीला सर्वस्व मानणारी स्त्री परशरामाच्या लावणीतील एक प्रतिव्रता म्हणते की आमचा स्त्रीधर्म हा पतीच्या चरणी आहे. सद्भावनेने पतिसेवा करण्यातच आयुष्यातील सर्व सौख्य प्राप्त होतात.

**देह गेला तरी जावो परंतु नेम न टळे कधी**
**आम्ही स्त्रियांच्या स्वधर्म ऐसा लक्ष पतीच्या पदी**
**सकळ तीर्थे अवघे एकीकडे**
**सदभावे पतिसेवा करिती अवघे तिजला घडे**

अशी प्रतिव्रता स्त्री अनेक लावण्यांमधून व्यक्त झाली आहे. प्रभाकरला खानदानी स्त्री ही जणू कलियुगातील दुसरी राधाच वाटते. तिचे सौदर्य, डौलदार वर्णन ते व्यक्त करताना

**मोहिनी जसी सूरसमेमधी अमृत वाढी करी**
**तशी नार पंगातित आग्रह धरी**
**नटनाटक कलियुगात ही आली राधा दुसरी**
**सुखसोहळे दोहोकडे होती माहेर सासरी**

या लावणीतील आग्रह करणारी नार म्हणजे एक खानदानी व गर्भश्रीमंत स्त्री आहे. सगुणसंपन्न अशी या स्त्रीचे सर्वप्रकारचे सुखसोहळे सासरी-गाहेरी दोन्हीकडे पूर्ण होतात. तिला सासर हेच माहेराप्रमाणे आहे. तिचा हुकूम झेलण्याकरिता कितीजण मयदिने उभे आहे असे वर्णन करून शेवटच्या कडव्यात तिच्या सौदर्याचे वर्णन हे रसिकाच्या मनाला भुरळ पाडणारे आहे. प्रभाकराने देवाचे आभार मानले आहे कारण की सुंदर स्त्रिया निर्माण करायला तो विसरला नाही अशी ही खानदानी स्त्री प्रभाकराच्या लावणीतून गर्भश्रीमंतीचे पिं घेऊन आलेली आहे. तशी मातेच्या रूपात प्रकट झालेली स्त्री होनाजींच्या घनश्याम सुंदरा या लावणीत आढळते.

**घनश्याम सुंदरा श्रीधरा अरूणोदय झाला**
**उठा लवकरी वनमाळी उदयाचही मित्र आला**

असे म्हणून माता यशोदा कृष्णाला उठवित आहे. यासाठी त्याला ती मधू-सुदना, ऋषिकेशी म्हणून संबोधते यातून एका मातेचे आपल्या अपत्याविषयीचे मन व्यक्त होते.

काही लावण्यांमधून कार्यक्षम नायिका सुध्दा प्रकट केलेली आहे.

**उठा उठा हलविते आता पहा पहा पहाट फारच झाली**
**व्हा जागृत प्रियकरा कुचाची खरी नौबत वाजुन राहीली**

पती साखर झोपेत आहे. त्याला उठवू नये असे तिला वाटते; पण कुचाची नौबत वाजू लागल्याने ती पतीला जागे करीत आहे. मोहिमेवर जाण्याची घाई करीत आहे. पारंपारिक नायिकेपेक्षा या नायिकेत वेगळेपणा दिसून येतो. अशी कर्तव्यदक्ष नायिका ते रेखाटतात. काही लावण्यांमध्ये व्याभिचारी स्त्रीची प्रतिमा कसलेली आहे.

**घरी व्रत आहे बिजवर कोण सक्त एक पकडली**
**तो लपंट तिजवर मी म्हणून खूष तुजवर**

अशी जशास तशी नायिका या लावणीतून दिसते. संक्रांतीला तिळगुळ देण्याच्या निमित्ताने बोलाबून त्याच्याशी प्रेमभावनेचा आविष्कार करणाऱ्या वाममार्गाने जाणाऱ्या व्याभिचारिणी स्त्रिया शाहिरी वाङ:मयात आढळतात. जिथे सर्व समाजच अवनतीच्या मार्गाने जात होता तिथे स्त्रियांनाही त्याची थोडी झळ लागावी यात आश्चर्य नाही हे म.ना. अदवंत यांचे विधान महत्वाचे वाटते.

याशिवाय पारंपारिक संकेताचा स्वीकार करणारी व व्यावहारिक उपदेश करणारी स्त्री, विरहिणी म्हणून प्रकट झालेली निपुत्रिक स्त्री तिची मानसिकता, सवती-मत्सरातून प्रकट झालेले स्त्री रूप, विशिष्ट रंगाचा साज घेऊन येणारी स्त्री अशी विविध स्त्रियांची रूपे लावणीतून व्यक्त केली आहेत. एकूणच शाहीरांचे समाजातील निरिक्षण किती सुक्ष्म होते हे दिसून येते आणि विविध स्त्री-प्रतिमांचे विविध पदर उलगडून दाखवताना मनोरंजनाच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केलेला आढळतो.

**निष्कर्ष** :- ✲ लावणीतील स्त्री ही खरी मराठमोळी वृत्तीची आहे.

✲ लावणीतून व्यक्त झालेली स्त्री मनोरंजन करीत असली तरी विविध नाती जपताना दिसते.

✲ लावणीतील स्त्री कळत-नकळत पुरूषवर्गाला संस्कारित करण्याचा प्रयत्न करते.

✲ लावणीतून व्यक्त झालेल्या स्त्री प्रतिगांकडे केवळ अश्लीलतेच्या चष्म्यातून बघता कामा नये.

✲ लावणीतील स्त्री ही एक चांगली नृत्यांगणा, एक श्रेष्ठ कलाकार म्हणून समाजाने स्वीकारावे ही अपेक्षा आहे.

**संदर्भ -**


१. मोरजे, गंगाधर - मराठी लावणी वाङ:मय
२. अदवंत, म.ना. - पैंजण
३. नासिराबादकर, ल.रा. - प्राचीन मराठी वाङ:मयाचा इतिहास
४. क, श्री. रं - ओवी ते लावणी


◆◆◆


ISBN: 978-81-89839-99-4

## Henry Fielding: Theory of Fiction

Dr Archana Devidas Bobade is an Associate Professor, Department of English at Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati Naac Accredited 'A' grade. She is also a Chairman of Board of Studies in languages, Faculty of Commerce and an Ex member of Management Council and Senate, Sant Gadge Baba Amravati University, Amravati. She has also worked as a Course Co-ordinator for four Refresher Courses in English and Short Term Course in Communication Skills, Sant Gadge Baba Amravati University, Amravati. She has attended many State, National and International Seminars/ Conferences/ Workshops and many of her articles are published in National and International Journals.

Printed by

LAXMI
BOOK PUBLICATION, Solapur

Published by

Lulu.com

# Henry Fielding:

## Theory of Fiction



Dr.Archana Bobade

Book Publication.
03- Books.

# HENRY FIELDING: THEORY OF FICTION

Author

**Dr Archana Bobade**

**Laxmi Book Publication**
2017

Price: /-

**Henry Fielding: Theory of Fiction**

Dr Archana Bobade

**© 2017 by Laxmi Book Publication, Solapur**

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without prior permission of the author. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

[The responsibility for the facts stated, conclusions reached, etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

**ISBN: 978-1-365-73608-7**

**Published by,**
**Lulu Publication**
3101 Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

**Printed by,**
**Laxmi Book Publication,**
258/34, RaviwarPeth,
Solapur, Maharashtra, India.
**Contact No. : +91 9595 359 435**
**Website:** http://www.isrj.org
**Email ID:** ayisrj@yahoo.in

# CONTENTS


| | |
|---|---|
| Chapter I………… | 01 |
| INTRODUCTION | |
| Chapter II………… | 35 |
| HENRY FIELDING LIFE AND WORK | |
| Chapter III………… | 61 |
| A REVIEW OF FICTIONAL THEORIES | |
| Chapter IV………… | 101 |
| FIELDING AND THE FICTIONAL THEORY | |
| Chapter V………… | 134 |
| CONCLUSION | |
| BIBLIOGRAPHY………… | 147 |



# Sane Guruji : A Saintly Soul

Dr. Archana D. Bobade

# The Minor Novels of Doris Lessing
# A Thematic Study

**Dr. Archana D. Bobade**
**Dr. Meghaa P. Sonone**

नभप्रकाशन

**The Minor Novels of Doris Lessing : A Thematic Study**

First Edition: 10/9/2017

Author
**Dr. Archana D. Bobade**
**Dr. Meghaa P. Sonone**

Publisher
**Milind B. Dahake**
Nabh Prakashan
Shyam Nagar, Amravati-06
Ph: 7798204500, 8177838400

Typesetting
**Rahul kumar**
Amravati

Printer
**Nabh Offset Printer**
Shyam Nagar, Amravati- 444 606.

Pune Office
**Suraj Dahake**
Cell No.- 7875101787
Sahil Kohinoor Apartment, Flat No.-307
Near Malwant Marble, Gokool Nagar, Katraj, Pune

Price: **Rs. 150/-**


**ISBN- 978-81-905776-58-8**


Any human anywhere
will blossom in a hundred unexpected talents
and
capacities simply by being given the opportunity to do so.

**- Doris Lessing**

# The Minor Novels of Doris Lessing
# A Thematic Study

Dr. Archana D. Bobade
Dr. Meghaa P. Sonone




Sane Guruji : A Saintly Soul
Dr. Archana D. Bobade

# Sane Guruji

## A Saintly Soul

Dr. Archana D. Bobade

नभप्रकाशन

**Sane Guruji**
**A Saintly Soul**

First Edition: 22/8/2017

Author
**Dr. Archana D. Bobade**

Publisher
**Milind B. Dahake**
Nabh Prakashan
Shyam Nagar, Amravati-06
Ph: 7798204500, 8177838400

Typesetting
**Rahul kumar**
Amravati

Printer
**Nabh Offset Printer**
Shyam Nagar, Amravati- 444 606.

Pune Office
**Suraj Dahake**
Cell No.- 7875101787
Sahil Kohinoor Apartment, Flat No.-307
Near Malwant Marble, Gokool Nagar, Katraj, Pune

Price: **Rs. 150/-**

**ISBN- 978-81-905776-60-4**

# Preface

Pandurang Sadashiv Sane, also known as Sane Guruji by his students and followers, was a Marathi author, teacher, social activist and freedom fighter from Maharashtra, India. He is referred to as the National Teacher of India. Sane Guruji was considered to be a personification of gentleness and humility who did not bowed to injustice at any cost. His childlike mind had unbounded affection for children. Sane Guruji was a philosopher in action.

The challenge of our age lies in making use of the gifts of science and the comparatively newly acquired values of freedom and equality for real human happiness. Sane Guruji's winged ideas are of great help in meeting these challenges. His writings has the potential to bring changes in attitudes and as we need both laws and morals for creating a happy, humane and just society we must explore the phenomenon called Sane Guruji more fully.

The name of this ardent patriot, Gandhian freedom fighter and social reformer was always uttered with great respect by those who knew about his work. His popular autobiographical novel *Shyamchi Aai* rebuilds the extremely sensitive brighter and human being in him.In this novel he lovingly talked of his loving mother and how she shaped his mind and morals. Sane Guruji was a tireless fighter for the rights of farmers and textile workers.


A profound thinker whose ideas have the potential of giving a new Yug Dharma to today's complex world- a world full of new challenges and new opportunities. Sane Guruji's ideas do not seem to fit into a groove. But they show with great originality ways to harmonize science and spiritualism, patriotism and internationalism, action and meditation, freedom and responsibility and the so called "manly" and "womanly". Such harmony will indeed be needed for tackling today's problems.

The book ***Sane Guruji: A Saintly Soul*** is an invitation to a feast of ideas and insights of one of the most remarkable human beings of modern India. I feel sure that this book will lead to a stimulating discussion and reflection on Sane Guruji's thought. This book is an effort to share with all my readers what I feel about this remarkable personality.

**- Dr. Archana D. Bobade**

# The Minor Novels of Doris Lessing
# A Thematic Study

Dr. Archana D. Bobade
Dr. Meghaa P. Sonone



# The Minor Novels of Doris Lessing
## A Thematic Study

Dr. Archana D. Bobade
Dr. Meghaa P. Sonone

नभप्रकाशन

**The Minor Novels of Doris Lessing :**
**A Thematic Study**

First Edition: 10/9/2017

Author
**Dr. Archana D. Bobade**
**Dr. Meghaa P. Sonone**

Publisher
**Milind B. Dahake**
Nabh Prakashan
Shyam Nagar, Amravati-06
Ph: 7798204500, 8177838400

Typesetting
**Rahul kumar**
Amravati

Printer
**Nabh Offset Printer**
Shyam Nagar, Amravati- 444 606.

Pune Office
**Suraj Dahake**
Cell No.- 7875101787
Sahil Kohinoor Apartment, Flat No.-307
Near Malwant Marble, Gokool Nagar, Katraj, Pune

Price: **Rs. 150/-**

**ISBN- 978-81-905776-58-8**

Any human anywhere
will blossom in a hundred unexpected talents
and
capacities simply by being given the opportunity to do so.

**- Doris Lessing**

309

2017 - 2018

ISBN 978-81-921694-8-4

# 25 Years of Human Development Report : Concept, Issues and Challenges



**Editors**

**Dr. Prashant Haramkar**
**Dr. Jairam Gaikwad**
**Dr. Vanita Chore**
**Dr. Rajshree Raibhog**

**Kautilya Dnyan Prabhodhini, Amravati.**

# INDEX


| Sr.No. | Name of the Article | Author Name | Pg.No. |
|---|---|---|---|
| **Subsection I : Human Development : Concept & Components** | | | |
| 1) | Gender Equity & Human Development In India : A Challenge | Prashant Katole | १ |
| 2) | A Study on Comparison and Review of Critiques of Human Development Index | Aparna Samudre | ११ |
| 3) | The UN Strategy of "Human Development" A Journey from "Human Rights" | K. B. Nayak | २६ |
| 4) | Human development for everyone - Looking forward | Rajesh R. Chavan | ३३ |
| ५) | मानवी संसाधनाचे आर्थिक विकासात योगदान | लाजवंती आर. टेंभुर्णे | ३५ |
| ६) | मानव विकास अहवालाची २५ वर्षे : संकल्पना आणि आव्हाने | अस्मिता ठोंबरे | ४० |
| ७) | मानवी विकास निर्देशांक व संसाधने | अविनाश निकम | ४५ |
| ८) | मानव विकास निर्देशांक आणि त्याचे निर्देशक | ज्योती ढोमणे | ५२ |
| ९) | मानव विकास संकल्पना आणि स्वरूप | जे.व्ही. गायकवाड | ५५ |
| १०) | मानव विकास–एक विश्लेषण | गजानन गं. भारती | ६० |
| ११) | मानव विकास व आर्थिक विकासाचे परस्परावलंबन | वैशाली देशमुख | ६७ |
| १२) | UNDP ने वर्गीकृत केलेल्या मानव विकासाच्या विविध पैलूंचे विश्लेषण | राजश्री आ. रायभोग | ७२ |
| १३) | मानव विकास व महिला सक्षमीकरण – एक दृष्टीक्षेप | निना सा. चवरे | ८१ |
| **Subsection II : Various Issues addressed in UNDP's Report** | | | |
| १४) | Pathways to Development with Dignity : Review of UNDP Human Development Report 2010 with Special Reference to SAARC Countries | Dhanashri Mahajan | ८६ |
| १५) | मानव विकास संकल्पनेची २५ वर्ष : युएनडीपी च्या अनुषंगाने | आर. बी. भांडवलकर, विठ्ठल धिनमिने | ९१ |
| १६) | मानव संसाधन विकासामध्ये आरोग्य : एक उत्पादनक्षम घटक | रविंद्र दा. इचे | १०० |


********************************

# मानव विकास संकल्पना आणि स्वरूप

**जे.व्ही. गायकवाड**
या.द.व.देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा
जि. अमरावती.

**प्रस्तावना :**

मानवी गुणवत्ता वाढविण्यासाठी विकासाचे ध्येय निर्देशीत करणारी संकल्पना म्हणजे मानवी विकास होय. समाजातील सर्व घटकांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेणे आवश्यक आहे. खऱ्या अर्थाने मानवाच्या सर्वांगीण विकासाचे मोजमाप करण्यासाठी 'मानव विकास निर्देशांक' ही संकल्पना १९९० मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या विकास कार्यक्रमात मांडण्यात आली. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये नैसर्गिक साधनसामुग्री आणि भांडवल या घटकांना सुरूवातीपासून महत्त्व दिले आहे. लोकसंख्येकडे पुरेसे लक्ष दिले नाही. परंतु जेव्हा नैसर्गिक साधनाची फारशी अनुकूलता नसताना तसेच भांडवल मर्यादीत प्रमाणात उपलब्ध असताना काही देशांनी आर्थिक विकास साध्य करून आश्चर्याचा धक्का दिला तेव्हा आर्थिक विकासासाठी नैसर्गिक संसाधने, भांडवल या घटकाबरोबर श्रमशक्ती (श्रम) महत्त्वाची आहे असे प्रत्येक देशाला वाटू लागले. श्रमिकांची कार्यक्षमता, कौशल्य या जलद आर्थिक विकासासाठी आवश्यक असल्याने सरकार त्यादृष्टीने नवीन कार्यक्रम तयार करून लोकसंख्येच्या मात्रात्मक वाढीपेक्षा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. इस्त्राईलसारख्या देशाने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मानव विकास घडवून आणला आहे. जपानसारख्या राष्ट्राने मानवी भांडवल निर्मितीवर भर देवून जागतिक बाजारपेठेवर प्रभुत्व निर्माण केले. थोडक्यात जगामध्ये आर्थिक विकास साध्य करताना मानव विकासाकडे पुरसे लक्ष दिले जाते आहे. भारतामध्ये Skill of India, Digital India, Make in India आणि 'बेटी बचाओ बेटी पढाओ' असे कार्यक्रम राबवून मानव विकास वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे. मानव विकास निर्देशांकाची संकल्पना मांडण्याचे श्रेय नोबेल पारितोषिक विजेते व भारतीय कल्याणकारी अर्थशास्त्राचे जनक अमर्त्य सेन आणि अर्थतज्ञ मेहबूब-उल- हक यांच्याकडे जाते.

**मानव विकास संकल्पना :**

'मानव विकास म्हणजे लोकांना उपलब्ध असलेल्या निवड, पर्यायाचा विस्तार करणारी प्रक्रिया होय.' मानव विकास म्हणजे शिक्षण, आरोग्य आणि उपजिविकेचे साधन या जीवनाच्या तीन महत्त्वाच्या पैलूसाठी दिलेला आणि त्याची प्रत्यक्षात झालेली पूर्तता याचा मिलाफ होय. पॉल स्ट्रीटच्या मते- 'मानव विकास म्हणजे अधिकाधिक उत्पादकता होय.' उत्पादकता वाढविण्यासाठी उत्तम आरोग्य, साक्षरता, कुशलता-कौशल्य असणारा श्रमिकवर्ग आणि भांडवल आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्र संघ विकास कार्यक्रम अहवालानुसार (UNDP) 'मानव विकास म्हणजे जनतेच्या कल्याणाचा उच्चस्तर साध्य करून त्याच्या निवडीच्या प्रक्रिया विस्तारीत करणे होय.' कल्याणकारी अर्थशास्त्राज्ञांच्या मते - 'मानवी

कल्याणात वाढ घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजे मानव विकास होय.'

मानव विकासाची संकल्पना ही फार मोठी असून तिची व्याप्ती अधिक आहे. ती दीर्घकालीन प्रक्रिया असून या प्रक्रियेत संधीची उपलब्धता, राजकीय स्वातंत्र्य, मानवी हक्कांचे संरक्षण, स्त्री-पुरूष समानता, आर्थिक समानता आणि सांस्कृतिक समानता या अंतर्भूत असून अन्न, पाणी, शिक्षण, आरोग्य सेवा आणि सुरक्षित पर्यावरण याचाही सर्वांना 'मूलभूत हक्क' मिळणे आवश्यक आणि अपेक्षित आहे. सर्वसाधारणपणे मानव विकासाचे घटक खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) शिक्षण (Education)

२) आहार (Diet)

३) आरोग्य सेवा (Health)

४) राष्ट्रीयत्वाची भावना

५) वास्तविक उत्पन्न (Income)

**मानव विकास निर्देशांक :**

मानव विकासाचे मोजमाप करणे फार कठीण आहे. आर्थिक विकास दरडोई किंवा निव्वळ उत्पन्नाच्या साहाय्याने मोजता येते तसा मानवी विकास मोजण्यासाठी निर्देशांक तयार करून मानव विकास लक्षात घेतला जातो. मानव विकास निर्देशांक हा शिक्षण, आरोग्य आणि आहार, उत्पन्न यावरून निर्धारीत केला जातो. ज्या देशामध्ये सरासरी, आयुर्मान, साक्षरता आणि उत्पन्न या अधिक प्रमाणात आढळतात. त्या देशामध्ये उच्च मानव विकास आढळतो. निर्देशांकाच्या सहाय्याने देशातील वास्तविक स्थिती प्रतिबिंबीत होते. साधारणत: मानवी विकास निर्देशांकात उत्पन्न, शिक्षण, आरोग्य, बेकारी, दारिद्य, पाणीपुरवठा इत्यादी मापन होते. निर्देशांकाचे वाढीव मूल्य देशाची प्रगती दर्शविते.

**भारतातील मानव विकास निर्देशांक :**

संयुक्त राष्ट्र संघाने मानव विकास निर्देशांक तयार करताना विचारात घेतलेल्या विविध पैलूचे मूल्य ० ते १ या दरम्यान असते निर्देशांक मूल्य ०.८०० पेक्षा अधिक असणारे देश अधिक उच्च मानव विकास निर्देशांक असणारे आहेत.०.५०० ते ०.८०० या दरम्यान मूल्य असणारे देश मध्यम निर्देशांक असणारे आणि ०.५०० पेक्षा कमी निर्देशांक मूल्य असणारे अल्प मानव विकास निर्देशांक असणारे देश समजले जातात. सन १९९५ मध्ये जगातील १७४ देशांचा निर्देशांक मोजला होता. भारताच्या त्यावेळी क्रमांक १३४ होता. सन २०१० च्या मानव विकास निर्देशांकांत १८३ देशाच्या क्रमवारीत भारत ११९ व्या स्थानी होता यावेळी चीनचा क्रमांक ८९ होता २१ मार्च २०१७ रोजी संयुक्त राष्ट्र संघाने नुकताच अहवाल सादर करून १८८ देशामध्ये भारताचा १३१ वा क्रमांक असल्याचे दर्शविले आहे. दक्षिण आशियाई देशामध्ये तिसरा क्रमांक असून HDI च्या बाबतीत चीननंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो आहे. प्रथम क्रमांक नार्वे देशांचा (-) आहे. २०२० पर्यंत मानव विकास वाढविण्यासाठी भारतात निती आयोगाद्वारे, सरकारद्वारे, Skill of India, Digital India, Make in India स्वच्छ भारत अभियान, बेटी बचाओ, बेटी पढाओ अशा स्वरूपाचे अभियान राबविण्यात येत असल्याचे मत युनडीपी चे समन्वयक 'युरो अफरसेन यांनी व्यक्त केले आहे.

**मानव विकास निर्देशांक मूल्य :**

संयुक्त राष्ट्र संघाने मानव विकास निर्देशांक तयार करताना विचारात घेतलेल्या विविध पैलूचे मूल्य ० ते १ या दरम्यान असते. २०१७ मध्ये प्रकाशित केलेल्या रिपोर्टनुसार १८८ देशामध्ये ५१ देश अधिक उच्च मानव विकास निर्देशांक असणारे, उच्च मानव

विकास निर्देशांक असणारे ५६ देश आहेत. मध्यम मानव विकास निर्देशांक असणारे ४१ देश असून ४० कमी मानव विकास निर्देशांक असणारे देश आहेत.नार्वे देशांचा सर्वात जास्त म्हणजे ०.९४९ मानव विकास निर्देशांक मूल्य असून सर्वात कमी मूल्य ०.३५२ मध्य अफ्रिकन देशाचे आहे. भारताचा १८८ देशामध्ये १३१ वा क्रमांक असून मानव विकास निर्देशांक मूल्य ०.६२४ आहे. २०१७ च्या अहवालानुसार जागतिक मानव विकास निर्देशांक मूल्य ०.७१,७आहे.

**तक्ता क्र.१**

**विविध देशातील मानव विकास निर्देशांक मूल्य**

| अ.क्र. | श्रेणी मानव विकास | मूल्य | देश |
|---|---|---|---|
| १ | अति उच्च मानव विकास निर्देशांक | ०.९४९ ते ०.८०० | ५१ |
| २ | उच्च मानव विकास निर्देशांक | ०.७९६ ते ०.७०१ | ५६ |
| ३. | मध्यम मानव विकास निर्देशांक | ०.६९९ ते ०.५५० | ४१ |
| ४ | कमी मानव विकास निर्देशांक | ०.५४१ ते ०.३५२ | ४० |
| | एकूण | | १८८ |

संदर्भ : संयुक्त राष्ट्रसंघ मानव विकास अहवाल २०१७

**तक्ता क्र.२ अति उच्च मानव विकास असणारे देश**

अति उच्च, मानव विकास निर्देशांक असणारे प्रमुख देशांमध्ये नार्वे, नेदरलॅन्ड, स्वीडन, स्वित्झलँड,

| क्रमांक Rank | देश | HDI Value | HDI मध्ये वाढ/घट |
|---|---|---|---|
| १ | नॉर्वे | ०.९४९ | वाढ ०.००१ |
| २ | आस्ट्रेलिया | ०.९३९ | वाझ ०.००२ |
| ३ | स्विर्त्झलंड | ०.९३९ | वाढ ०.००१ |
| ४ | जर्मनी | ०.९२६ | वाढ ०.००२ |
| ५ | डेन्मार्क | ०.९२५ | वाढ ०.००२ |
| ६ | सिंगापूर | ०.९२५ | वाढ ०.०१३ |
| ७ | नेदरलॅन्ड | ०.९२४ | वाढ ०.००१ |
| ८ | आर्यलॅन्ड | ०.९२३ | वाढ ०.००३ |
| ९ | आईसलॅन्ड | ०.९२१ | वाढ ०.००२ |
| १० | कॅनडा | ०.९२० | घट ०.००१ |
| ११ | अमेरिका | ०.९२० | वाढ ०.००२ |
| १७ | जपान | ०.९०३ | वाढ ०.००१ |
| ४९ | रशिया | ०.८०४ | वाढ ०.००१ |
| १३१ | भारत | ०.६२४ | वाढ ०.००९ |

संदर्भ : मानव विकास अहवाल २०१७

अति उच्च, मानव विकास निर्देशांक असणारे प्रमुख देशांमध्ये नार्वे, नेदरलॅन्ड, स्वीडन, स्वित्झलँड, आस्ट्रेलिया, डेन्मार्क, कॅनडा, फिनलँड, जर्मनी, अमेरिका, आईसलॅन्ड, सिंगापूर याचा समावेश होतो. कमी मानव विकास निर्दशांक असणाऱ्या देशाची यादी जास्त असली तरी २१ मार्च २०१७ रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार अति उच्च मानव विकास असणारे देश खालीलप्रमाणे आहे. भारत हा मध्यम मानव विकास निर्देशांक असणारा देश आहे.

**२०१६ चा अहवाल प्रमुख बाबी :**

१) सन १९९५ मध्ये जगातील १७४ देशाचा निर्देशांक मोजला होता. त्यामध्ये भारताचा १३४ वा क्रमांक होता. २०१७ मध्ये जगातील १८८ देशाच्या निर्देशांकामध्ये भारताचा १३१ वा क्रमांक आहे. २०१० च्या तुलनेत भारताचा २०१६ मध्ये ११९ वरून १३१ पर्यंत क्रमांक वाढलेला आढळतो म्हणजेच मानव विकासासाठी ज्या बाबीची आवश्यकता आहे त्यामध्ये अपेक्षित वाढ झालेली नाही.

२) २०१६ च्या अहवालानुसार ०.९ पेक्षा अधिक असणारे देश १८ आहे. २०११ मध्ये फक्त १२ देश होते यामध्ये आस्ट्रेलिया, नेदरलॅन्ड, अमेरिका, कॅनडा स्वित्झलॅन्ड, जपान यांचा समावेश होता. २०११ च्या अहवालानुसार भारताचा क्रमांक १३४ होता तो कमी होवून १३१ वा क्रमांक झाला याचा अर्थ २०११ च्या तुलनेत विकासाच्या सुविधामध्ये वाढ झाली आहे.

३) चीन हा देश सन १९७० पासून मानव विकास निर्देशांकामध्ये सुधारणा कारणारा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. आरोग्य सेवा, शिक्षण आणि दरडोई उत्पन्न चीनचे गेल्या ४० वर्षात २१ पटीने वाढले तरी चीन हा अजूनही अति उच्च प्रगती करणाऱ्या देशामध्ये दीर्घाआयुष्यमान व शाळेत जाणाऱ्याची संख्या याबाबतीत प्रगती करून शकला नाही.

४) दक्षिण आशियाई देशामध्ये भारताचा तिसरा क्रमांक आर्थिक विकासाच्या बाबतीत लागतो ब्रीक्स देशामध्ये चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक मानव विकासांच्या बाबतीत लागत असून पहिला क्रमांक रशिया (४९) ब्राझील (७९) चीन (९०) सा.आफ्रिका (११९) भारत (१३१) असा उतरता क्रम आहे.

५) २०१६ च्या मानव विकास अहवालामध्ये नार्वे ०.९४९, ऑस्ट्रेलिया ०.९३९ आणि स्वित्झर्लॅन्ड ०.९३९ हे प्रमुख तीन देश मानव विकासाच्या बाबतीत अग्रेसर आहेत.

६) भारताच्या मानव विकास निर्देशांक मूल्यामध्ये १९९० च्या ०.४२८ च्या तुलनेत २०१६ मध्ये ०.६२४ पर्यंत वाढ झालेली आढळते.

७) भारतामधील सरासरी आर्युमान ६८.३ वर्ष असून ६९.९ स्त्रिया व ६६.९ पुरूषांचे आर्युमान आहे. ब्रीक्स देशामध्ये भारताची HDI च्या बाबतीत सर्वात कमी Rank आहे.

८) सार्क देशामध्ये श्रीलंका (७३), मालदिव (१०५) भारत (१३१) भूतान (१३२) नेपाळ (१४४) बाग्लांदेश (१३९) पाकिस्तान (१४७) अफगानिस्तान (१६९) असा HDI च्या बाबतीत क्रमांक लागत असल्याचे स्पष्ट होते.

९) लिंग समानता(Gender Inequality) या बाबतीत भारताचा १२५ वा क्रमांक लागत असून रशिया चा ५२ वा क्रमांक, ब्राझील चा (९२), चीन या देशाचा ३७ वा क्रमांक लागतो. देशाच्या पार्लमेंटमध्ये महिलांचा अल्प सहभाग असून

भारतामध्ये १२.२ प्रतिशत चीनमध्ये २३.६ प्रतिशत, साऊथ आफ्रिका ४१.२ प्रतिशत रशिया, १४.५ प्रतिशत असल्याचे आढळते.

श्रमशक्ती सहभागामध्ये ७९.१ प्रतिशत पुरूष आणि २६.८ प्रतिशत स्त्रियांचा वाटा आहे. श्रमशक्तीच्या बाबतीत रशियामध्ये स्त्रियांचा सहभाग ५६.६ प्रतिशत, पुरूषाचा सहभाग ७१.७ प्रतिशत, चीनमध्ये स्त्रियांचा सहभाग ६३.६ प्रतिशत आणि पुरूषांचा ७७.९ प्रतिशत श्रमशक्तीमध्ये सहभाग आहे याचाच अर्थ काम करणाऱ्या शक्तीमध्ये स्त्रियांचा वाटा किंवा सहभाग भारतात इतर देशाच्या तुलनेत कमी आहे. म्हणून भारतात महिला सबलीकरणाचे कार्यक्रम हाती घेण्यात आलेले आहेत.

देशातील जागतिक मानव विकास निर्देशांकाचा परिणाम म्हणून भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये विविध राज्यामध्ये मानव विकास अहवाल प्रकाशित करण्याच्या प्रयत्नांना वेग आलेला आहे. देशामध्ये सर्वप्रथम मध्यप्रदेश राज्याने स्वतःचा मानव विकास अहवाल प्रकाशित केला. महाराष्ट्र सरकारने २००२ मध्ये पहिला मानव विकास अहवाल प्रसिद्ध केला. देशातील राज्य निहाय मानव विकास निर्देशांकाचा विचार केल्यास ०.९२० मूल्यासह केरळ राज्यांचा प्रथम क्रमांक लागत असून त्यापाठोपाठ ०.८९२ मूल्यासह चंदीगडचा दुसरा क्रमांक लागतो. ही दोनच राज्य उच्च निर्देशांक असणारी आहेत. ०.७ ते ०.८ मानव विकास निर्देशांक असणाऱ्या राज्यामध्ये लक्षद्विप, मिझोराम, दिल्ली, गोवा, पाँडेचरी व मणिपूर राज्याचा क्रमांक लागतो. महाराष्ट्र राज्याचे निर्देशांक मूल्य ०.६८९ असून ते राष्ट्रीय सरासरीपेक्षा (०.६२४) अधिक आहे. सर्वात कमी निर्देशांक बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश, ओरिसा या राज्यामध्ये आहे. ओरिसा राज्य वगळता बाकीच्या राज्यांना बिमारू राज्ये (Bimaru) असे म्हणतात. भारतातील वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशातील सहा राज्य मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत आघाडीवर आहेत. यामध्ये दक्षिणेकडील केरळ व तामिळनाडू पश्चिम मध्यभाग म्हणून महाराष्ट्र आणि पंजाब तर हिमाचल प्रदेश व हरियाणा ही उत्तर पश्चिम राज्य होत. थोडक्यात भारतामध्ये जवळपास सर्वच राज्यात दरडोई उत्पन्न, साक्षरता दर, आर्युमान या मानवी निर्देशाकांच्या पैलूमध्ये वाढ झालेली असली तरी ती सर्वत्र समान नाही तसेच ज्या राज्याचे दरडोई उत्पन्न अधिक आहे त्या ठिकाणी HDI जास्त आहे असे ही आढळत नाही.

**सारांश :**

जगाबरोबर भारताचा मानव विकास निर्देशांक साधावयाचा झाल्यास शिक्षण, आरोग्य सेवा, पायाभूत सुविधामध्ये वाढ, भांडवली गुंतवणूक, सेवा क्षेत्राचा विकास होणे अपेक्षित आहे. सरकारने ग्रामीण व आदिवासी भागामध्ये लक्ष देणे गरजेचे आहे. कमी मानव विकास झालेल्या राज्याकडे लक्ष दिल्यास भविष्यात भारत हा देश जगामध्ये प्रमुख देश बनेल.

**संदर्भ :**


१) मानव विकास अहवाल (२०१६):(युएनडीपी)

२) महाराष्ट्रातील मानव विकास (२००९): राज्यस्तरीय अर्थशास्त्र परिषद , श्री शिवाजी महाविद्यालय, अमरावती दि.७ फेब्रुवारी

३) अर्थसंवाद (२०१२): मराठी अर्थशास्त्र परिषदेची त्रैमासिक, जुलै- सप्टे खंड ३६, अंक २

४) अर्थसंवाद (२०१४): मराठी अर्थ परिषद त्रैमासिक जून खंड ३८, अंक १.



□□□

301

2017-18

डॉ.एस.व्ही.खांदेवाले गौरव ग्रंथ

# भारतातील आर्थिक सुधारणांची २५ वर्षे



# अनुक्रमणिका


| | लेखाचे शिर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | जागतिकीकरण : भारतीय शेतीसाठी अनुकूल ठरेल का? | आर.एस.देशपांडे<br>केदार विष्णू | १ |
| २. | आर्थिक सुधारणांच्या काळातील पीक रचनेतील बदल | कुमुदिनी जोगी<br>राजेश चव्हाण | १६ |
| ३. | आर्थिक सुधारणा अंतर्गत भारतातील कृषी क्षेत्राचे बदलते स्वरूप | वनिता चोरे<br>ज्योती ढोमणे | २८ |
| ४. | आर्थिक सुधारणांच्या अंतर्गत औद्योगिक विकास | सुषमा देशमुख<br>संजय कोठारी | ४३ |
| ५. | भारताचे औद्योगिक धोरण – एक परामर्ष | अंजली कुळकर्णी | ६२ |
| ६. | भारतातील संघटित सेवा क्षेत्र | मंगला भाटे<br>प्रशांत काटोले | ७३ |
| ७. | भारतातील असंघटीत क्षेत्रातील कामगार : सद्य:स्थिती, समस्या व उपाय | जी.जी.भारती<br>जे.व्ही.गायकवाड | ८१ |
| ८. | वेध श्रमनियमन विषयक विचारांचा – इतिहास व वर्तमान | मुक्ता जहागिरदार<br>राजश्री रायभोग | ९५ |
| ९. | भारतीय बँकिंग प्रणाली – बदलते संदर्भ व त्यांची मीमांसा | के.के.पाटील | ११२ |

# भारतातील असंघटीत क्षेत्रातील कामगार : सद्य:स्थिती, समस्या व उपाय

जी.जी.भारती
जे.व्ही.गायकवाड

**प्रास्ताविक :**

जागतिक स्तरावर प्रत्येक देशात असंघटित कामगाराचे प्रमाण हे कायम अधिक असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर असंघटित कामगाराच्या जीवनमानात फार सुधारणा झाली आहे असेही म्हणता येत नाही. जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्थेत झपाट्याने बदल घडून आलेले आहेत त्यातल्या त्यात माहिती तंत्रज्ञानाने प्रचंड वेग घेतला आहे. परंतू त्याचा फायदा असंघटित कामगारांना झाला नाही किंवा त्यांना घेता आला नाही असेच म्हणावे लागेल. त्यामुळे जागतिकीकरणातही असंघटित क्षेत्राचे प्रमाण कमी न होता कासवगतीने वाढत राहीले.

असंघटित क्षेत्राच्या तुलनेत संघटित क्षेत्रातील कामगारांची स्थिती अनेक पटीने चांगली आहे. जसेकी संघटित क्षेत्रातील कामगारांसाठी, निवृत्तीवेतन योजना, ग्रॅच्युइटी, अपघात विमा योजना, वैद्यकिय मदत, विविध रजा, महिलांसाठी प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर पगारी रजा, बेकारीभत्ता या योजनांचा लाभ मिळतो. तसा लाभ किंवा सोयीसुविधा असंघटित क्षेत्रातील कामगारांना मिळत नाहीत. ही वास्तविकता आहे.

अलीकडील काळात शहरीकरण, औद्योगिकीकरण तसेच जागतिकीकरण अंतर्गत विशेषत: सेवाक्षेत्रामध्ये १९९० ते २०१५ पर्यंत वेगाने वाढ झाली आहे. त्यानिमित्ताने ग्रामीण जनतेचे शहरीभागाकडे होणारे स्थलांतरण तीव्र गतीने झाल्याने ग्रामीण शेतमजुरांच्या संख्येत कमालीची घट झाल्याचे दिसून येते. देशाचा आर्थिक विकास, औद्योगिकीकरण व शहरीकरण यांचा सहसंबंध धनात्मक असल्याने सेवाक्षेत्रावर त्याचा अनुकूल परिणाम होऊन सेवाक्षेत्राचा वेग वाढतो आणि या आर्थिक घडामोडीमध्ये असंघटित कामगाराचा सहभाग अधिक असल्याचे दिसून येते.

असंघटीत क्षेत्राची संकल्पना सर्वप्रथम जागतिक कामगार संघटनेने १९७० च्या पुर्वार्धात आफ्रिकेमध्ये जागतिक रोजगार कार्यक्रम अभियान (World Employment Programme Mission) हाती घेऊन असंघटीत क्षेत्राकडे जगाचे लक्ष वेधून घेतले. तेव्हापासूनच असंघटीत क्षेत्रावर चर्चा तसेच अभ्यास होण्यास सुरूवात झाली आणि अजुनही चालूच आहे.

राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षणानुसार (२००४-०५) भारतातील ९३% श्रमिक हे असंघटित क्षेत्रात काम करतात तर केवळ ७% श्रमिक हे संघटित क्षेत्रात काम करत आहेत असे स्पष्ट होते. यावरून असंघटित क्षेत्राची व्याप्ती आणि स्वरूपाची कल्पना येते. भारतातील अतिरिक्त लोकसंख्या, अशिक्षितपणा, कर्जबाजारीपणा, ग्रामोद्योगाचे अद्य:पतन, आजारी उद्योगाच्या समस्या, कामगाराचे दारिद्र्य, कुशल कामगाराचा अभाव, कामगाराचे स्थलांतर, संघटनेचा अभाव, संघर्षाचा अभाव, शासनाचे व उद्योगपतीचे प्रतिकूल धोरण, मध्यस्थाचा प्रभाव, शेतीउद्योगातील अस्थिरता या विविध कारणांनी असंघटित क्षेत्राची स्थिती अधिकच बिकट बनली आहे.

**व्याख्या :**

१) असंघटित मजूर सामाजिक सुरक्षितता कायदा २००८ नुसार खाजगी मालकीच्या एखाद्या संस्थेत किंवा स्वयंरोजगार करणारे १० पेक्षा कमी कामगार एकत्रित येऊन उत्पादन किंवा वस्तुविक्री किंवा कोणतीही सेवा पुरविण्याचे काम करतात अशा कार्याशी संबंधित क्षेत्रास असंघटीत क्षेत्र म्हणतात.

२) जे कामगार स्वत:च्या काही वैशिष्ट्यामुळे, जसे अज्ञान, निरक्षरता, अकुशलता, उद्योगाचा लहान आकार, विखुरलेले स्वरूप यामुळे एकत्र येऊ शकत नाहीत किंवा संघटीत होऊ शकत नाहीत त्यांना असंघटीत क्षेत्र असे म्हणतात.

भारतात श्रममंत्रालयाने असंघटीत क्षेत्राला चार गटामध्ये विभागले आहे.

**अ) व्यवसायाच्या दृष्टीने वर्गीकरण** – लहान व अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन मजूर, ठेक्यांची शेती करणारे, मासेमारी, पशुसंवर्धन, बिडी बनविणारे, लेबल व पॅकींग करणारे, बांधकाम व्यवसायात गुंतलेले, चामड्याचे व्यवसाय करणारे, विणकाम व शिवणकाम करणारे, कारागीर, मिठाचा व्यवसाय, विट उत्पादक कामगार, दगड खाणीमधील कामगार, करवत गिरणीमध्ये काम करणारे व तेल घाण्यामध्ये कामकरणाऱ्या कामगारांचा समावेश या व्यवसाय गटात होतो.

**ब) रोजगार स्वरूपाच्या दृष्टीने वर्गीकरण** – यामध्ये कृषी संलग्न मजूर, शुल्कबंध, स्थलांतरीत मजूर व ठेकेदारी व अस्थायी कामगार असे वर्गीकरण केले जाते.

**क) कामाच्या स्वरूपावरून वर्गीकरण** – यामध्ये ताडी व्यवसाय करणारे, स्वच्छता कर्मी हमाल, प्राणी वाहून नेणारे, वाहनावर काम करणारे हमाल या वर्गीकरणामध्ये येतात.

**ड) सेवा श्रेणीच्या दृष्टीने वर्गीकरण** – या गटात घरगुती कामगार, मासेमारी, सुतकाम करणारे, न्हावी, वृत्तपत्र विक्रेते, भाजीपाला व फळविक्रीकरणारे कामगार येतात. शिवाय हस्तकला व्यावसायिक, सुतारकाम करणारे रिक्षा ऑटो, शिंपी, विजयंत्राचे काम करणारे असंघटीत क्षेत्रात येतात.

**भारतीय संघटीत व असंघटीत क्षेत्रांची तुलनात्मक स्थिती :**

भारताच्या संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगाराच्या संख्येत मागील २५ वर्षाच्या कालावधीत कसे बदल होत गेले याची सांख्यिकीय माहिती

**तक्ता क्र. १**

**भारतातील संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार**

(आकडे दशलक्षात, कंसातील आकडे प्रतिशत मध्ये)

| वर्ष | संघटीत | असंघटीत | एकूण कामगार |
|---|---|---|---|
| १९८७-८८ | २५.७१ (७.९३) | २९८.५८ (९२.०७) | ३२४.२९ |
| १९९३-९४ | २७.३७ (७.३१) | ३४७.०८ (९२.६९) | ३७४.४५ |
| १९९९-०० | २८.११ (७.०८) | ३६८.८९ (९२.९१) | ३९७.०० |
| २००५-०६ | २६.४६(७.५४) | ३५८.४५ (९२.४६) | ३८४.९१ |
| २०११-१२ | २७.२२(६.६०) | ३८५.०१ (९३.४०) | ४१२.२३ |
| सरासरी वृद्धीदर | २.८८ | ७.४१ | ७.०६ |

(स्त्रोत : Dhas A.L. / Helen M. Social Security for Unorganised Workers in India, MPRA, Madurai, 2008 (P.4))

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की १९८७-८८ मध्ये भारतात एकूण ३२४.२९ दशलक्ष कामगार होते पैकी संघटीत क्षेत्रात २५.७१ (७.९३%) आणि असंघटीत क्षेत्रात २९८.५८ (९२.०७%) कामगार कार्यरत होते. हेच प्रमाण १९९३-९४ मध्ये एकूण कामगारांची संख्या ३७४.४५ होती त्यापैकी संघटीत व असंघटीत कामगाराची संख्या ७.३१ व ९२.६९ प्रतिशत होती नंतर १९९९-०० मध्ये एकूण कामगारसंख्या ३९७ दशलक्ष होती त्यापैकी संघटीत ७.०८ आणि असंघटीत ९२.९१ प्रतिशत झाली पुढे २००५-०६ मध्ये एकूण कामगार संख्या ३८४.९१ दशलक्षवर गेली. पैकी संघटीत क्षेत्रात ७.५४ प्रतिशत आणि असंघटीत क्षेत्रात ९२.४६ प्रतिशत कामगार कार्यरत होते. २०११-१२ मध्ये एकूण कामगार संख्येत पुन्हा भर पडून ती ४१२.२३ दशलक्षवर गेली त्यापैकी संघटीत क्षेत्रात ६.६० प्रतिशत आणि असंघटीत क्षेत्रात ९३.४० प्रतिशत होती.

अशा पद्धतीने संघटीत क्षेत्राच्या तुलनेने असंघटीत क्षेत्रातील कामगारांची संख्या वाढत असतांना दिसते. तिच्यातील वाढ कमी प्रमाणात असली तरी एकूण अर्थव्यवस्थेतील तिचे योगदान नेहमीच अधिक असल्याचे स्पष्ट होते. मात्र त्यांच्या कार्यात आणि जीवन मानात सुधारणा होतांना दिसत नाही हे विशेष. दोन्ही क्षेत्राचा वृद्धीदर तपासला असता सरासरीने संघटीत क्षेत्राची वाढ १९८३ पासून २.८८ प्रतिशत होती आणि त्याच कालावधीत असंघटीत क्षेत्राचा सरासरी वृद्धीदर ७.४१ प्रतिशत राहिला. दोन्हीचा मिळून संयुक्त वृद्धीदर

मात्र ७.०८ राहिला. वरील आकडेवारीचा अभ्यास करता २००५-०६ नंतर संघटीत क्षेत्रातील कामगार वृद्धीत घसरण होत गेली मात्र त्याच काळात असंघटीत क्षेत्राचा वृद्धीदर वाढत गेला असे चित्र दिसते.

**असंघटीत कामगाराची वैशिष्ट्ये :**

एकंदरीत भारतातील असंघटीत कामगाराच्या स्वरूपावरून व जीवनमानाच्या स्थितीवरून जी काही लक्षणे आढळतात त्यावरून खालील प्रमाणे वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

१) भारतात ग्रामीण क्षेत्रातील असंघटीत कामगाराची विभागणी विशेषत: मागासलेपण, जात, धर्मावर आधारित झालेला दिसून येते तर शहरीक्षेत्रात अशा विभागणीचे प्रमाण कमी असते. मात्र शहरात स्थलांतरित असंघटीत कामगाराचे प्रमाण जास्त असते.

२) विशेषत: असंघटीत कामगार परंपरावादी, जून्या प्रथा व धार्मिक वृत्तीचे असतात तसेच बालविवाह, सणासमारंभाकरिता कर्ज काढून खर्च करणारे असतात.

३) विशेषत: असंघटीत कामगारांना हंगामी बेकारीचा प्रश्न सतत भेडसावीत असतो त्याबरोबरच छुप्या बेकारीचाही सामना त्यांना करावा लागतो.

४) शेतीशी संबंधीत कामे एकत्रितपणे करत असतांना सुद्धा लहान, सिमांत शेतकरी व शेतमालक यांच्यामध्ये औपचारिक संबंध दिसून येत नाहीत.

५) कामाचे स्वरूप एकसारखे असून सुद्धा अनेक असंघटीत कामगार भौगोलिक क्षेत्रामुळे व आपल्या वैयक्तिक कारणांमुळे एकत्रित काम न करता विस्कळीत स्वरूपात काम करत असतात.

६) असंघटीत क्षेत्रात कामगारांना मुक्त प्रवेश असतो तसेच केव्हाही बाहेर पडता येते.

७) असंघटीत क्षेत्रात मुख्यत: श्रमप्रधान तंत्राचा वापर होतो.

८) असंघटीत क्षेत्राला प्राधान्याने शासकीय मदतीचा अभाव असतो.

९) असंघटीत कामगाराचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे असून ते झोपडपट्टी तसेच मागास भागात निवास करतात.

१०) असंघटीत कामगारांमध्ये स्थलांतरित मजुराचे प्रमाण सर्वाधिक असते.

११) असंघटीत कामगाराचे कामाचे तास अधिक मात्र वेतन कमी दिल्या जाते त्यातही अनियमितता असते त्यामुळे त्यांचे शोषणच अधिक होते.

वरील वैशिष्ट्यावरून असे स्पष्ट होते की कोणत्याही देशाच्या विकासात्मक प्रक्रियेमध्ये सुरवातीला संघटीत श्रमिकाचे प्रमाण कमी असते ज्यामध्ये सरकारी, निमसरकारी आणि काही प्रमुख खाजगी कंपन्यामधील श्रमिक वा कर्मचारी संघटीत असलेले आणि ते आपली मजबूत संघटना प्रस्थापित करतात तसेच त्यांची सौदाशक्ती अधिक असते. त्यामुळे

ते मालकांशी यशस्वीरित्या वाटाघाटी करू शकतात तसेच उच्च वेतन, बोनस, इतर सवलती मिळवू शकतात. मात्र असंघटीत कामगार अकूशल, अडाणी, अप्रशिक्षित व मागासलेले अशा श्रमिकांची संख्या भरपूर असते. यामध्ये बहुतांश श्रमिक खेड्यातून आलेले असतात. संघटनेचे महत्त्व त्यांना कळलेले नसते. त्यांच्यातील परंपरागत आणि भटक्यावृत्तीमुळे ते संघटीत राहतात. ग्रामीण आणि शहरी मजुरांमध्ये दिसून येणारा असंघटीतपणा हे त्यांचे वैशिष्टये बनले आहे त्यामुळे श्रमबाजार असंघटीत बनतो म्हणून अशा श्रमबाजारात श्रमाची मागणी व श्रमाचा पुरवठा यांच्या योग्य मेळ बसने खूप कठीत जाते त्याचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम, त्यांच्या कुटूंबावर आणि समाजावर तसेच देशाच्या विकासावर होतांना दिसतात.

**असंघटीत क्षेत्र आणि सामाजिक सुरक्षितता :**

सामाजिक सुरक्षितता ही संकल्पना तशी पूर्वापार चालत आलेली संकल्पना होय. समाज जीवनामध्ये सर्वसाधारणपणे तीन प्रकारच्या सुरक्षिततेबाबत समस्या दिसून येतात. १) उत्पन्नाची असुरक्षितता २) व्यावसायिक असुरक्षितता ३) नैसर्गिक कारणांमुळे निर्माण होणारी असुरक्षितता मात्र काळओघात या संकल्पनेत बदल होत गेलेत.

सप्टेंबर १९७७ ला दिल्ली येथे घेतलेल्या जागतिक श्रम संघटनेच्या (ILO) परिषदेत सामाजिक सुरक्षितता म्हणजे 'समाजाने योग्य संघटनेकडून आपल्या सभासदांना विविध आपत्ती प्रसंगी त्यांना सहाय्य करणे होय' अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न झाला.

श्री. सिंग व स्वरन यांच्या मते, ''सामाजिक सुरक्षा म्हणजे नैसर्गिक सामाजिक व वैयक्तिक तसेच आर्थिक कारणांमुळे निर्माण होणाऱ्या अनेक संकटाच्या विरूद्ध समाजाद्वारे निर्माण केलेली एक पद्धती होय.''

के.एन.वैद्य यांच्या मते, ''सामाजिक सुरक्षितता हा असा एक प्रमुख आधार स्तंभ आहे, यावर कल्याणकारी राज्याची संरचना टिकून असते. व बहुतेक देशामध्ये त्याला सामाजिक योजनांचा महत्त्वपूर्ण भाग समजले जाते.''

या अंतर्गत मुख्यत: सामाजिक विमा, सामाजिक सहाय्य, कौटूंबिक लाभ, आरोग्याची काळजी व सामाजिक कल्याण सेवाशी संबंधीत इतर बाबीचा समावेश होतो. याबाबत जी.डी.एच.कोल यांच्या मते, ''सामाजिक सहाय्य व सामाजिक विमा यामधील फरक स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, सामाजिक सहाय्यतेचा कार्यक्रम हा पारंपरिक अनिवार्य मदतीच्या तत्वावर आधारित असतो तर सामाजिक विम्याची योजना म्हणजे गरजू लोकांच्या प्रति समाजाच्या सद्भावनेचे ते प्रतिक असते.''

भारत सरकारने असंघटीत कामगारांच्या सामाजिक सुरक्षीततेसाठी अस्तित्वात असलेल्या यंत्रणेचे चार भागात वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

१) केंद्र सरकार पुरस्कृत सामाजिक सहाय्यता कार्यक्रम २) सामाजिक विमा योजना ३) केंद्र व राज्यशासनाच्या कल्याण निधीमार्फत सामाजिक सहाय्य व ४) स्वयंसेवी, सामाजिक संस्था मार्फत करण्यात येणारे प्रयत्न.

असंघटीत श्रमिकांना सामाजिक सुरक्षितता मिळावी म्हणून केंद्र व राज्य सरकारमार्फत काही निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. केंद्र सरकारचे विविध कायद्यातंर्गत अनेक प्रकारच्या कल्याणकारी निधीची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये सामाजिक बांधिलकी म्हणून अनेक कामगार संघटनाही असंघटीत श्रमिक वर्गासाठी पुढे येवून कार्य करीत आहेत.

१) बीडी कामगार कल्याण निधी अधिनियम १९७६ अंतर्गत कल्याण निधीची तरतुद.
२) अभ्रक खनिज कामगार कल्याण निधी अधिनियम १९४६ अंतर्गत
३) चुनखडी व डोलामाईट खनिज श्रमिकांसाठी कामगार कल्याण निधी अधिनियम १९७२ अंतर्गत तर
४) लोखंड, मॅगनीज खनिज, कामगार कल्याण निधी अधिनियम १९७६ अंतर्गत तरतुदी केल्या आहेत.

अशा प्रकारे भारत सरकारने विविध श्रमिक वर्गासाठी त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी कल्याण निधीची तरतुद करून या कल्याण निधीतून मुख्यत: वैद्यकीय सेवा त्यांच्या मुलांना शैक्षणिक सहाय्य, घरे, पाणीपूरवठा यासारख्या सोयी सुविधा पुरविण्यावर भर दिला जातो.

केंद्र शासनाच्या या निधीतून राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण व शहरी भागामध्ये विविध योजना राबविल्या जातात. यामध्ये मुख्यत: इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकालीन निवृत्ती वेतन योजना, राष्ट्रीय कुटूंब लाभ योजना आणि राष्ट्रीय प्रसूती विषयम लाभ योजना यांचा समावेश होतो. असंघटीत कामगारांकरिता या सामाजिक सुरक्षा योजना – सामाजिक जीवन विमा निगम (LIC), साधारण विमा निगम (GIC) यांच्याद्वारे राबविल्या जातात. त्यामध्ये जनश्री विमा योजना, कृषीश्रमिक सामाजिक सुरक्षा योजना, आरोग्य विमा योजना, महात्मा गांधी बुनकर विमा योजना, आम आदमी विमा योजना, राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना, इत्यादीचा समावेश होतो.

तसेच या अंतर्गत श्रमिकांनी त्यांच्या मोठ्या आजारांसाठी उदा.कर्करोग, मुत्रपिंड, हृदयाची शस्त्रक्रिया इ. साठी खर्च केलेले पैसे त्यांना परत मिळवून दिले जातात. स्त्री कामगारांसाठी प्रसुतीविषयम फायदे मिळवून दिले जातात. अलीकडे अनेक सामाजिक स्वयंसेवी संस्था देखील, असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी त्यांना किमान सामाजिक सुरक्षितता मिळावी यासाठी प्रयत्न करत आहेत. जसे की, स्वयंरोजगारीत महिलांची संघटना

(SEWA), महिला विकास व सुरक्षा यासाठी सहकाराच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. अलीकडे महाराष्ट्रामध्ये युवा (YUVA) या सारख्या संस्था देखील पुढाकार घेत आहेत.

**देशातील रोजगारीची स्थिती :**

**राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण : २००४-०५ :**

भारतात एकूण ४५७५ लाख श्रमिकांमध्ये स्वयंरोजगार प्राप्त श्रमिकाचे प्रमाण ५६.५ प्रतिशत होते. आकस्मिक श्रमिकांचे प्रमाण २८.३ प्रतिशत होते. या दोन्ही दुर्बल वर्गाचे प्रमाण विचारात घेतल्यास ते ८५ प्रतिशत होते. तर इतर १५ प्रतिशत श्रमिक हे नियमित श्रमिक होते या शिवाय असंघटीत क्षेत्रातील एकूण ३९४९ श्रमिकांपैकी स्वयंरोजगार प्राप्त श्रमिकाचे प्रमाण ६४ प्रतिशत होते आणि आकस्मिक श्रमिकाचे प्रमाण २९ प्रतिशत होते. वरील दोन्ही दूर्बल घटकांचे प्रमाण सरासरी ९३ प्रतिशत होते तर नियमित श्रमिकांचे प्रमाण फक्त ७ प्रतिशत होते. यावरून असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांची दयनीय अवस्था दिसून येते. या उलट संघटीत क्षेत्राची स्थिती फारच चांगली दिसून येते. जेथे ६९ प्रतिशत श्रमिक नियमित श्रमिक आहेत. तर ३१ प्रतिशत स्वयंरोजगार प्राप्त व आकस्मिक श्रमिक आहेत. ज्यांना सामाजिक सुरक्षा तसेच नोकरीची सुरक्षा विधीवत प्राप्त आहे.

तसेच गैरकृषी उद्योगापेक्षा कृषी क्षेत्राची स्थिती फार भयावह असलेली दिसून येते कारण कृषी क्षेत्रात जवळजवळ ९९ प्रतिशत श्रमिक स्वयंरोजगार व आकस्मिक होते आणि फक्त १ प्रतिशत श्रमिक नियमित होते. त्यातही कृषीमध्ये असंघटीत क्षेत्रात ९९.४ प्रतिशत श्रमिक स्वयंरोजगार व आकस्मिक श्रमिक होते ज्यांना कोणताही प्रकारची सामाजिक सुरक्षा प्राप्त झालेली नव्हती. मात्र गैरकृषी क्षेत्रात हेच प्रमाण ८३ प्रतिशत होते.

देशात २००८-०९ मध्ये शेती क्षेत्रात ९८ प्रतिशत उद्योग क्षेत्रात ७५ प्रतिशत आणि सेवा क्षेत्रात ७२ प्रतिशत श्रमिक हे असंघटीत क्षेत्राशी संबंधीत कार्यात गुंतलेले होते. भारतात शेती व बिगर शेतीक्षेत्रात कार्यरत, असंघटीत कामगाराचे प्रमाण डॉ. अर्जून सेन गुप्ता समितीचा अहवाल मे.२००६.

**तक्ता क्र. २**

**शेती व बिगर शेतीक्षेत्रात पुरूष व स्त्री कामगार**

| अ.क्र. | क्षेत्र | पुरूष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| | **(शेती)** | | | |
| १. | ग्रामीण | १३७.५१ | ८७.०९ | २२४.६० |
| २. | शहरी | ४.९५ | ३.२४ | ८.१९ |
| ३. | एकूण | १४२.४६ | ३०.३३ | २३२.७९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **(बिगर शेती)** | | | |
| ४. | ग्रामीण | ४०.३५ | ११.६८ | ५२.०३ |
| ५. | शहरी | ४५.१३ | १०.३६ | ५५.४९ |
| ६. | एकूण | ८५.४८ | २२.०४ | १०७.५२ |
| | **(पूर्ण भारत)** | | | |
| ७. | ग्रामीण | १७७.८६ | ९८.७७ | २७६.६३ |
| ८. | शहरी | ५०.०८ | १३.६० | ६३.६८ |
| ९. | एकूण | २२७.९४ | ११२.३७ | ३४०.३१ |

(संख्या दशलक्षमध्ये)

वरील तक्त्याच्या आधारे आपणास असे स्पष्ट होते की शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामीण क्षेत्रात असंघटीत कामगाराचे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण भागात २७६.६३ दशलक्ष तर शहरी भागात ६३.६८ दशलक्ष कामगारांचा समावेश होतो. याचाच अर्थ एकूण असंघटीत क्षेत्रातील कामगारांमध्ये शहरी भागात २३ प्रतिशत कामगार कार्यरत आहेत तर ग्रामीण भागात ७७ प्रतिशत कामगार कार्यरत आहेत. तसेच देशातील असंघटीत क्षेत्रातील एकूण कामगारांमध्ये स्त्रियांचे पमाण हे ४९.३० प्रतिशत असून पुरूषांचे प्रमाण ५०.७ प्रतिशत आहे. यावरून देशात असंघटीत क्षेत्रात कामकरणाऱ्या श्रमिकांची संख्या जास्त तर आहेच पण यामध्ये स्त्रियांचे प्रमाण हे पुरूषांच्या जवळपास बरोबरीचे म्हणजे ४९.३०% आहे. त्यातही या क्षेत्रात शहरी भागात काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण १२.१ प्रतिशत असून ग्रामीण भागात काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ८७.९ प्रतिशत असल्याचे स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ३**

**निव्वळ देशीय उत्पादनातर्गत विविध क्षेत्रनिहाय संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगाराचे वितरण (२००२-०३)**

| क्र. | उद्योग | संघटीत क्षेत्र | असंघटीत क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | शेती, जंगल, मत्स्य | ४.१ | ९५.९ |
| २. | खाणकाम, निर्माणी, वीज आणि बांधकाम | ७०.५ | २९.५ |
| ३. | सेवा क्षेत्र | ५५.४ | ४४.६ |
| ४. | एकूण | ४३.३ | ५६.७ |

वरील तक्त्यावरून निव्वळ देशीय उत्पादनात संघटीत व असंघटीत क्षेत्राचे विविध क्षेत्रांतर्गत योगदान दर्शविले आहे. त्यानुसार शेती व संबंधीत व्यवसायात गुंतलेल्या संघटीत कामगाराचे योगदान ४.१ प्रतिशत आहे तर याच व्यवसायात गुंतलेल्या असंघटीत कामगाराचे

योगदान सर्वाधिक म्हणजे ९५.९ प्रतिशत होते. गैरशेती व्यवसायात गुंतलेल्या संघटीत कामगाराचे योगदान ७०.५ प्रतिशत होते तर असंघटीत कामगाराचे याच व्यावसायातील योगदान २९.५ प्रतिशत होते आणि सेवा क्षेत्रात संघटीत कामगाराचे योगदान ५५.४ प्रतिशत असून याच क्षेत्रात असंघटीत कामगाराचे योगदान ४४.६ प्रतिशत होते. एकंदरीत तिन्ही क्षेत्राचे NDP तील संघटीत क्षेत्राचे योगदान ४३.३ प्रतिशत असून असंघटीत क्षेत्राचे योगदान ५६.७ प्रतिशत होते. यावरून संघटीत क्षेत्राच्या तुलनेत असंघटीत क्षेत्रातील कामगाराचे निव्वळ देशीय उत्पादनातील योगदान अधिक असल्याचे दिसून येते.

**असंघटीत क्षेत्राच्या समस्यांवरील उपाय :**

भारतात एकूण श्रमसंख्येमध्ये असंघटीत श्रमिकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. तेव्हा या क्षेत्राला संघटीत क्षेत्राचा दर्जा मिळणे अत्यावश्यक आहे. तसेच त्यांना योग्य वेतन, सामाजिक सुरक्षा, आरोग्य, सामाजिक कल्याण, मातृत्व आणि त्याच्या बालकांच्या पालन पोषणाची जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक आहे. याच बरोबर आपले जीवनमान उंचावण्याकरिता त्यांना कौशल्यपूर्ण आणि तांत्रिक शिक्षण प्रशिक्षणाची किमान खर्चावर आधारित व्यवस्था करणे नितांत गरजेचे आहे. या सर्व बाबीकरिता त्यांच्या मानसिकतेत बदलाची आवश्यकता आहे. तरच त्यांना त्याचा लाभ घेता येईल.

**राष्ट्रीय श्रम आयोगाने सांगितलेले उपाय :**

१) सर्वप्रथम असंघटीत क्षेत्रातील कामगारांना स्विकृती प्रदान करणे आणि औपचारिक सर्वेक्षणामध्ये त्याचा समावेश करणे.

२) या क्षेत्रातील सर्व कामगारांना औपचारिक ओळखपत्र दिले जावे त्या आधारे त्यांना कायद्यांतर्गत संरक्षण दिले जावे.

३) असंघटीत क्षेत्रातील प्रत्येक कामगार भारतीय नागरिक असल्याने तो संरक्षण व कल्याणासाठी पात्र असावा तसेच जी.डी.पी. मध्ये त्यांचे योगदान अधिक असल्याचे त्यांना संघटीत क्षेत्रातील श्रमिकाप्रमाणे सर्व फायदे मिळणे अत्यावश्यक आहे.

४) त्याच्या कामाच्या अधिकाराला सामाजिक सुरक्षेच्या अधिकाराचे अभिन्न अंग मानावे लागेल. त्या अनुषंगाने त्यांचे आरोग्य, महिला कामगारांना संरक्षण, लहान मुले-मुली व बालकांच्या योग्य संगोपनाची जबाबदारी सरकारतर्फे स्वयंसेवी संस्थांना द्यावी. अशी शिफारस या आयोगाने केली आहे. कामाचा अधिकार या अंतर्गत असंघटीत क्षेत्रातील कामगारांना मूलभूत अधिकार प्रदान करण्यात यावेत.

५) आर्थिक विकासाला हातभार लावणारे गरीब, स्त्रिया बालकामगार यांचा आर्थिक स्तर वाढविण्यासाठी कृतिआराखडा करून त्या अंतर्गत कायद्यानुसार असंघटीत क्षेत्रातील कामगारांना सुरक्षा देण्यात यावी .

असंघटीत कामगारांसाठी समाजिक सुरक्षितता कायदा - २००८ हा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी १५ आक्टोबर १९९९ मध्ये भारतीय जनता पक्षाने श्री. रविंद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या राष्ट्रीय श्रम आयोगाची स्थापना केली. २००२ मध्ये या आयोगाने आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला. त्यामध्ये असंघटीत क्षेत्रातील कामगारांना किमान सुरक्षा मिळावी यासाठी कायद्याचे सुरक्षा कवच आवश्यक असल्याचे सूचविले. परंतू तेव्हा ही शिफारस अंमलात येऊ शकली नाही. पुढे मे २००४ मध्ये संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने राष्ट्रीय किमान समान कार्यक्रम अंतर्गत असंघटीत क्षेत्रातील कामगारांना (९३%) विविध कल्याणकारी योजना राबविण्याचे ठरविले. त्यानुसार सप्टेंबर २००४ मध्ये डॉ. अर्जुन सेनगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली असंघटीत क्षेत्रातील आस्थापनांचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना केली. या आयोगाच्या अहवालाने असे स्पष्ट केले की, भारतामध्ये ७७ प्रतिशत लोकांचा खर्च दैनिक दरडोई २० रू. पर्यंतच आहे.

पुढे अर्जून सेनगुप्ता यांनी ऑगस्ट २००५ व मे २००६ या दोन टप्प्यामध्ये दोन अहवाल मा. पंतप्रधानाकडे सादर केले. ज्यामध्ये असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या कामाची स्थिती आणि त्यांच्या आणि सामाजिक सुरक्षितता निर्माण करण्यासंबंधीच्या कायद्याच्या मसुद्याचा समावेश होता. तसेच सन २००५ मध्ये काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय सल्लागार परिषदेने दुसऱ्या राष्ट्रीय श्रम आयोगाने सुचविलेल्या शिफारशीच्या आधारे असंघटीत क्षेत्रासाठी एक मसुदा विधेयक सादर केले.

डॉ. सेनगुप्ता यांचा अहवाल व राष्ट्रीय सल्लागार परिषदेचा अहवाल विचारात घेऊन त्यावर चर्चा घडवून आणली. आणि सप्टेंबर २००७ मध्ये 'असंघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता' या नावाने हे विधेयक मंजुरीसाठी राज्यसभेमध्ये ठेवण्यात आले व ऑक्टोबर २००८ मध्ये राज्यसभेत याविधेयकावर उलट सुलट खल होऊन शेवटी राज्यसभेने संमती दिली. त्यानंतर हे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले व डिसेंबर २००८ मध्ये लोकसभेची मंजूरी मिळाली आणि शेवटी ३० डिसेंबर २००८ ला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या स्वाक्षरीने विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. ज्याचे नाव 'असंघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता कायदा-२००८' असा अस्तित्वात आला.

या कायद्याअंतर्गत राष्ट्रीय स्तरावर 'राष्ट्रीय सामाजिक सुरक्षितता मंडळ व राज्य स्तरावर राज्यस्तरीय सामाजिक सुरक्षित मंडळ स्थापन करण्याची तरतुद असून त्यानुसार स्थापना केली. यामध्ये असंघटीत कामगाराच्या नोंदणी प्रक्रियेपासून त्यांना द्यावयाचचा लाभासंबंधीची आवश्यक ती तरतुद समाविष्ट करण्यात आली. केंद्र व राज्यस्तरावरील ही प्रस्थापित मंडळे कामगार कल्याणासाठी सध्या अस्तित्वात असणाऱ्या योजनांचे लाभ असंघटीत क्षेत्रातील घटकांना देण्याच्या दृष्टीने समन्वयाचे काम करतील तसेच

आवश्यकतेनुसार एखाद्या विशिष्ट घटकांसाठी एखादी नवीन योजना कार्यान्वित करू शकतील त्या योजनेकरिता लागणाऱ्या स्त्रोतांचा देखील विचार करण्यात येतो.

'सहभागाधारित उत्पादन व विक्री प्रक्रियेत कार्यरत व्यक्ती किंवा कुटूंबाच्या मालकीचे कमीत कमी १० श्रमिकांचे मिळून बनलेले क्षेत्र म्हणजे असंघटीत क्षेत्र होय.'

ज्यांना कुशलप्रधान शिक्षण व प्रशिक्षणाची नितांत गरज आहे यामध्ये अकुशल श्रमिक, स्त्रिया व लहानमुले यांचा अंतर्भाव होतो. त्यांची प्रमुख समस्या म्हणजे अत्यंत कमी मोबदल्यात हे लोक काम करीत असतात. किंबहूना त्यांचे संघटन नसल्यामुळेच आणि त्यांच्या कामाचा दर्जा चांगला असूनही त्यांना योग्य मोबदला मिळत नाही हे विशेष. आज जागतिकीकरणाअंतर्गत व विकासाने झपाटलेल्या विविध अर्थव्यवस्थेत मानव विकास व कौशल्याची अतिशय निकड असणारे क्षेत्र म्हणजे असंघटीत क्षेत्र होय.

भारतात २००८ मध्ये एकूण ४५० दशलक्ष कामगारापैकी ४२० दशलक्ष कामगार (९२ प्रतिशत) आणि २०१२ पर्यंत (९३ प्रतिशत) प्रमाण असणारे क्षेत्र म्हणजे असंघटीत क्षेत्र होय. म्हणूनच राष्ट्रीय असंघटीत क्षेत्र आयोगाने या क्षेत्राला असंघटीत बेकारीची फौज म्हटले आहे. देशात हा अमर्याद श्रम पुरवठा म्हणून असंघटीत क्षेत्र ओळखल्या जाते. आधुनिक भारताची जडणघडण ज्यांच्या कार्यकुशलतेवर अवलंबून आहे असे ९३ प्रतिशत श्रमिकांना (असंघटीत) जर योग्य शिक्षण प्रशिक्षण, मार्गदर्शन, नियमित किमान वेतन, सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्यात शासन यशस्वी झाले तर स्टार्टप इंडिया आणि स्मार्ट इंडिया होण्यापासून भारताला कुणीही रोखू शकत नाही हे वास्तव आहे. आजही किरकोळ व्यापारी, लघु उत्पादक व अस्थायी कामाच्या ठिकाणी या असंघटत क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात अस्तित्व आहे.

वसाहती असणाऱ्या प्रदेशांमध्ये भांडवलशाही व गैरभांडवलशाही अशा दोन्ही ठिकाणी असंघटीत क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणात काम करून घेतल्या जाते. भारतात २००२ च्या राष्ट्रीय श्रम आयोगाने असंघटीत क्षेत्रातील कामगारांना न्यूनतम स्तराचे संरक्षण उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. सन १९९९-२००० मध्ये एकूण ३३.७ कोटी रोजगारामध्ये असंघटीत क्षेत्रातील रोजगारप्राप्त कामगाराची संख्या ही ३०.९ कोटी होती. म्हणजेच एकूण रोजगारामध्ये असंघटीत कामगारांचे प्रमाण ९१.७ प्रतिशत होते. असंघटीत कामगारांचा क्षेत्रवार आलेख पाहता कृषीमध्ये ९९.३ प्रतिशत, विनिर्माण क्षेत्रामध्ये ८३.५ प्रतिशत, निर्माणी क्षेत्रामध्ये ९२.१ प्रतिशत, व्यापार हॉटेल व्यवसायात ९८.७ प्रतिशत व सामाजिक आणि वैयक्तिक सेवांमध्ये त्यांचे प्रमाण ६२.७ प्रतिशत होते. निव्वळ असंघटीत क्षेत्राच्या एकूण रोजगारांमध्ये कृषी श्रमिकांचे प्रमाण ६१.४ प्रतिशत, व्यापार व हॉटेलिंग १२ प्रतिशत आणि विनिर्माण क्षेत्रामध्ये ११ प्रतिशत होते. राष्ट्रीय श्रम आयोगानुसार असंघटीत

क्षेत्रातील ६० प्रतिशत श्रमिक हे स्वयंरोजगार प्राप्त होते. २००१ च्या जनगणनुसार जीडीपी मध्ये असंघटीत क्षेत्राचा हिस्सा ६१.४ प्रतिशत होतो तो २०१२-१३ मध्ये ५० प्रतिशत पेक्षा जास्त आहे. यावरून या क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेता त्यांना मानवी विकास संकल्पने अंतर्गत त्यांना पर्याप्त अशा कायद्याचे संरक्षण देऊन योग्य जीवनमान जगण्याची पातळी उपलब्ध करून देणे सरकारची जबाबदारी आहे.

**जागतिक दृष्टिकोनातून असंघटीत क्षेत्र :**

असंघटीत क्षेत्राच्या संकल्पनेचा सैद्धांतिक पाया पन्नास व साठच्या दशकातील अभ्यासातून उदयास आला. ज्यामध्ये दुहेरी अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्ये मुख्यता विकसनशील देशाचे वैशिष्ट्ये असल्याचे स्पष्ट होते. असंघटीत क्षेत्राच्या संस्थात्मक वाटचालीचा मागोवा चार टप्प्यामध्ये घेता येतो. १९७० च्या दशकातील सुरवातीचा काळ, ज्याकाळात असंघटीत क्षेत्राच्या संकल्पनेचा विकास होऊन तीने मुळ धरणे, १९८० च्या दशकाचा काळ म्हणजे या संकल्पनेचा प्रसाराचा काळ अनेक कार्यक्रमामध्ये या संकल्पनेचा समावेश करण्यात आला. १९९० च्या दशकात अधिकृतपणे मान्यतेचा काळ यावेळी असंघटीत क्षेत्राच्या संकल्पनेला जागतिक मान्यता मिळाली आणि जागतिक अधिकृत योजनेत तिचा समावेश केला गेला.

२००० आणि त्यापुढील काळ म्हणजे या संकल्पनेचा विधायकपणे विस्ताराचा काळ ज्यामध्ये असंघटीत क्षेत्राचा नव्याने अभ्यास करण्यात अर्थतज्ञांना व अभ्यासकांना रस वाढला. विकसनशील व संक्रमण अवस्थेतील अर्थव्यवस्थांमध्ये असंघटीत क्षेत्राची वाढ झपाट्याने झालेली दिसते. या अर्थव्यवस्थांमधील गरीबांसाठी उत्पन्न व रोजगार निर्मितीचे साधन म्हणून या क्षेत्राच्या असलेल्या महत्त्वाबद्दल फारसे मतभेद नाहीत. असंघटीत क्षेत्राच्या अभ्यासाचे वाढते महत्त्व जागतिक कामगार संघटनेने आपल्या जागतिक कामगार परिषदेला सादर अहवालात श्रीमती हार्ट असे म्हणतात की, 'अलिकडच्या काही वर्षात विशेषत: विकसनशील आणि संक्रमणाच्या अवस्थेतील देशांमध्ये रोजगार निर्मितीचा मोठा वाटा असंघटीत क्षेत्राचाच राहिला आहे. कारण की बहुसंख्य लोक नियोजित क्षेत्रात नोकरी मिळवू शकत नाहीत किंवा स्वत:चा व्यवसायही सुरू करण्यात असमर्थ असतात.(ILO-2002A)

या देशांच्या विकास प्रक्रियेत संक्रमणाचा टप्पा म्हणून असंघटीत क्षेत्राचे अस्तित्व गृहीत धरले होते. या प्रक्रियेत जसा आर्थिक विकास होत गेला तसे असंघटीत क्षेत्राचाही विस्तार होत गेला. हळूहळू या देशांमधील अतिरिक्त अशा मनुष्यबळाच्या साठ्यावर उपाय म्हणून असंघटीत क्षेत्राचा विचार सुरू झाला. त्यातच 'स्ट्रकचरल ॲडजस्टमेंट प्रोग्राम' लागु करण्यात आल्याने या विकसनशील देशांमध्ये रोजगारविरहीत वाढ झालेली आहे. कारण सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्राला आपली स्पर्धात्मकता व लाभ टिकवून ठेवण्यासाठी

रोजगार क्षमतेचा बळी द्यावा लागतो. त्याचा एकूणच परिणाम या अर्थव्यवस्थामध्ये असंघटीत क्षेत्राचे अस्तित्व, विस्तार आणि चिरस्थायीत्वामध्ये झाला आहे म्हणूनच सुरवातीला असंघटीत क्षेत्राचे निरीक्षण व अभ्यास विकसनशील देशांच्या संदर्भात करण्यात आला आणि नंतर विकसीत देशांमध्ये या क्षेत्राच्या अभ्यासाला सुरूवात झाली. या क्षेत्राचे अस्तित्व विकसित आणि विकसनशील देशामध्ये असले तरी काही बाबतीत मुलभूत मतभेद असल्याचे दिसते ते म्हणजे विकसनशील देशामध्ये असंघटीत क्षेत्र हे गरीबांना (गरजुंना) रोजगार देणारी दुसरी कोणतीही पर्यायी व्यवस्था नसल्याने जिवंत ठेवणारी यंत्रणा समजली जाते. आणि विकसित देशांमध्ये संघटीत क्षेत्राच्या तुलनेत अधिक स्वायत्तता, लवचिकता व स्वातंत्र्य मिळत असल्याने लोक त्यात प्रवेश करतात. अशा प्रकारे गरीबांचे अस्तित्व टिकवणारे म्हणून कमी विकसित देशांमध्ये असंघटीत क्षेत्र विकसित देशाच्या तुलनेत अधिक कामगार केंद्रीत झालेले असून कमी उत्पन्न आणि कमी भांडवली संचय पुरवणारे आहे. अशी स्थिती असतांना देखील अलीकडच्या काळात असंघटीत क्षेत्रावरील अभ्यासामधून असे स्पष्ट होते की, असंघटीत क्षेत्रातील मोठ्या प्रभावावरील व्यवसाय कार्यक्षम आणि लाभदायी आहेत. मात्र या बाबत वास्तवता काय ही गोष्ट पडताळून पाहिल्या शिवाय निर्णयाप्रत पोहचणे कठीण आहे. (UNCHS-2006) अलीकडच्या काळात या एकूण नोकरी मधील असंघटीत क्षेत्राचा वाटा वाढत आहे. त्याचबरोबर सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढतो आहे.

उदा. असंघटीत क्षेत्राचा गैरकृषीचा जीडीपीतील वाटा आफ्रिकेत २७ प्रतिशत वरून ४१ प्रतिशतवर गेला आहे तर लॅटीन अमेरिकेत २९ प्रतिशत आहे तर आशियात तो ४१ प्रतिशतवर गेला आहे आणि कंबोडियामध्ये तर ८० प्रतिशतवर गेला आहे. अशा प्रकारे असंघटीत क्षेत्राचे जीडीपीतील गैरकृषीतील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. हे स्पष्ट होते. हे क्षेत्र अकुशल कामगार आणि स्थानिक उपलब्ध साधनसंपत्तीचा उपयोग करून रोजगार निर्मिती उत्पादन व उत्पन्नात प्रमुख भूमिका बजावत असल्याने राजकीय आर्थिक व सामायिक स्तरावर या क्षेत्राचा विचार होणे अगत्याचे झाले आहे. डे. सोटो १९८९ मध्ये आपल्या 'द अदर पाथ' या ग्रंथात असे म्हटले की, सरकारचा हस्तक्षेप आणि नियमामुळे नवीन व्यवसायाचा विकास थांबतो. आणि अशा प्रकारे वैद्यानिक आर्थिक उद्दीष्ट गाठण्याच्या प्रयत्नात प्रचलीत कायद्याचे पालन करण्याची किंमत त्यातून मिळणाऱ्या नफ्यापेक्षा किती तरी जास्त आहे. अशा स्थितीत भ्रमनिरास झालेल्या व्यावसायिकांचा अखेरचा आधार असंघटीत क्षेत्र असते.

स्निडर यांच्या व्याख्येत असंघटीत क्षेत्राबद्दल अधिक वास्तव दृष्टीकोन दिसतो. उत्पन्नकर, मूल्यवर्धीत किंवा कोणत्याही करांची देणी चुकविण्यासाठी, सामाजिक सुरक्षा

योगदान टाळण्यासाठी, मजुरीचा दर्जा, किमान वेतन, कामाचे सर्वाधिक तास, सुरक्षा उपाययोजना यांचे मापदंड तसेच विशिष्ट प्रशासकीय प्रक्रियेचे पालन करावे लागू नये या हेतूने सरकारी अधिकाऱ्यांपासून जाणीवपूर्वक गोपनीय ठेवल्या जाणाऱ्या अशा सर्व बाजारपेठाधारित वस्तू व सेवांच्या कायदेशीर उत्पादनाचे मिळून असंघटीत क्षेत्र बनते. यावरून असंघटीत क्षेत्रांतर्गत होणाऱ्या व्यापाराला एक कायदेशीर दर्जा देतांनाच विशिष्ट कामगार विषयक बाजारपेठीय प्रमाणाचे पालन केले जात नाही.

बहुतांश असंघटीत क्षेत्रातील व्यवसायाची कार्यरत कामगारांची नोंद अधिकृतपणे केलेली असली तरी त्यांच्या लाभाची नोंद अधिकृत करण्यास ते बाधील नसतात तसेच असंघटीत क्षेत्र असलेली अर्थव्यवस्था मुख्यता बारकाईने पाहिली न जाणाऱ्या अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे. या बाबत १९९३ मध्ये एन.एस.ए. सिस्टिम ऑफ नॅशनल अकाउंट ने या क्षेत्राची वर्गवारी भूमीगत, बेकायदा आणि असंघटीत क्षेत्रात स्वत:च्या अंतिम उपभोगासाठी तयार केलेली घरगुती उत्पादन व प्राथमिक आकडेवारी प्राप्त करण्याच्या कार्यक्रमातील उणीवांमुळे नजरेतून निसटलेल्या व्यावसायिक घडामोडी अशी केलेली आहे. अशा अनंत अडचणी व गुंतागुंतीतून असंघटीत क्षेत्राची पर्याप्त व्याख्या व अधिकृत माहिती प्राप्त व्हावी म्हणून प्रयत्न सुरू आहेत. त्या अंतर्गत संयुक्त राष्ट्रसंघाच्या सांख्यिकी विभागाने (U.N.S.D.) आणि भारतीय राष्ट्रीय सांख्यिकी आयोग (२०१०) मध्ये एक समिती स्थापन केली. (N.S.C.-2012) या समितीने असे नमुद केलेली आय.एस.ओ.च्या चौकटीनुसार परिणाम कारक आकडे वारीची व्यवस्था, अंमलात आणण्यासाठीच्या संकल्पना, व्याख्या आणि कार्यकक्षेसंदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या आकडेवारी जमवण्याच्या यंत्रणेतील तफावतीमुळे मुख्यत: भारतातील असंघटीत क्षेत्रातील रोजगार व व्यावसायावरील माहितीत असंख्य त्रुटी आहेत. अर्थव्यवस्थेच्या या महत्त्वाच्या विभागाची कामकाज पद्धती समजून घेण्यासाठी व या उणीवा कमी करून असंघटीत क्षेत्राच्या महत्त्वाच्या पैलूबाबत पुरेशी, तुलनात्मक आणि त्याच वेळेस विश्वासार्ह आकडेवारी गोळा करणे ही आजची गरज आहे. ज्याचा फायदा भविष्यात असंघटीत क्षेत्राबाबत धोरणे आखून त्याची अंमलबजावणी करण्यास सहाय्य होईल.

**संदर्भ सूची :**

१) www.unorganised sector.in
२) Muna Kalyani - Indian Informal Sector : An Analysis (IJMSR)
३) अर्थमंथन (२०१०) : मराठी अर्थशास्त्र परिषद, ३४ वे राष्ट्रीय अधिवेशन
४) Sengupta Arjun (2007) : Report on condition of work and promotion of livelihood in the unorganised sector, National Commission for Enterprises in the unorganised sector."
५) www.organised & unorganised sector.com


□□□□

301

2017-18

## डॉ.एस.व्ही.खांदेवाले गौरव ग्रंथ

# भारतातील
# आर्थिक सुधारणांची २५ वर्षे



# अनुक्रमणिका


| लेखाचे शिर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १. जागतिकीकरण : भारतीय शेतीसाठी अनुकूल ठरेल का? | आर.एस.देशपांडे<br>केदार विष्णू | १ |
| २. आर्थिक सुधारणांच्या काळातील पीक रचनेतील बदल | कुमुदिनी जोगी<br>राजेश चव्हाण | १६ |
| ३. आर्थिक सुधारणा अंतर्गत भारतातील कृषी क्षेत्राचे बदलते स्वरूप | वनिता चोरे<br>ज्योती ढोमणे | २८ |
| ४. आर्थिक सुधारणांच्या अंतर्गत औद्योगिक विकास | सुषमा देशमुख<br>संजय कोठारी | ४३ |
| ५. भारताचे औद्योगिक धोरण – एक परामर्ष | अंजली कुळकर्णी | ६२ |
| ६. भारतातील संघटित सेवा क्षेत्र | मंगला भाटे<br>प्रशांत काटोले | ७३ |
| ७. भारतातील असंघटीत क्षेत्रातील कामगार : सद्य:स्थिती, समस्या व उपाय | जी.जी.भारती<br>जे.व्ही.गायकवाड | ८१ |
| ८. वेध श्रमनियमन विषयक विचारांचा – इतिहास व वर्तमान | मुक्ता जहागिरदार<br>राजश्री रायभोग | ९५ |
| ९. भारतीय बँकिंग प्रणाली – बदलते संदर्भ व त्यांची मीमांसा | के.के.पाटील | ११२ |

# भारतातील असंघटीत क्षेत्रातील कामगार : सद्य:स्थिती, समस्या व उपाय

जी.जी.भारती

जे.व्ही.गायकवाड

**प्रास्ताविक :**

जागतिक स्तरावर प्रत्येक देशात असंघटित कामगाराचे प्रमाण हे कायम अधिक असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर असंघटित कामगाराच्या जीवनमानात फार सुधारणा झाली आहे असेही म्हणता येत नाही. जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्थेत झपाट्याने बदल घडून आलेले आहेत त्यातल्या त्यात माहिती तंत्रज्ञानाने प्रचंड वेग घेतला आहे. परंतू त्याचा फायदा असंघटित कामगारांना झाला नाही किंवा त्यांना घेता आला नाही असेच म्हणावे लागेल. त्यामुळे जागतिकीकरणातही असंघटित क्षेत्राचे प्रमाण कमी न होता कासवगतीने वाढत राहीले.

असंघटित क्षेत्राच्या तुलनेत संघटित क्षेत्रातील कामगारांची स्थिती अनेक पटीने चांगली आहे. जसेकी संघटित क्षेत्रातील कामगारांसाठी, निवृत्तीवेतन योजना, ग्रॅच्युइटी, अपघात विमा योजना, वैद्यकिय मदत, विविध रजा, महिलांसाठी प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर पगारी रजा, बेकारीभत्ता या योजनांचा लाभ मिळतो. तसा लाभ किंवा सोयीसुविधा असंघटित क्षेत्रातील कामगारांना मिळत नाहीत. ही वास्तविकता आहे.

अलीकडील काळात शहरीकरण, औद्योगिकीकरण तसेच जागतिकीकरण अंतर्गत विशेषत: सेवाक्षेत्रामध्ये १९९० ते २०१५ पर्यंत वेगाने वाढ झाली आहे. त्यानिमित्ताने ग्रामीण जनतेचे शहरीभागाकडे होणारे स्थलांतरण तीव्र गतीने झाल्याने ग्रामीण शेतमजुरांच्या संख्येत कमालीची घट झाल्याचे दिसून येते. देशाचा आर्थिक विकास, औद्योगिकीकरण व शहरीकरण यांचा सहसंबंध धनात्मक असल्याने सेवाक्षेत्रावर त्याचा अनुकूल परिणाम होऊन सेवाक्षेत्राचा वेग वाढतो आणि या आर्थिक घडामोडीमध्ये असंघटित कामगाराचा सहभाग अधिक असल्याचे दिसून येते.

असंघटीत क्षेत्राची संकल्पना सर्वप्रथम जागतिक कामगार संघटनेने १९७० च्या पुर्वार्धात आफ्रिकेमध्ये जागतिक रोजगार कार्यक्रम अभियान (World Employment Programme Mission) हाती घेऊन असंघटीत क्षेत्राकडे जगाचे लक्ष वेधून घेतले. तेव्हापासूनच असंघटीत क्षेत्रावर चर्चा तसेच अभ्यास होण्यास सुरूवात झाली आणि अजुनही चालूच आहे.

राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षणानुसार (२००४-०५) भारतातील ९३% श्रमिक हे असंघटित क्षेत्रात काम करतात तर केवळ ७% श्रमिक हे संघटित क्षेत्रात काम करत आहेत असे स्पष्ट होते. यावरून असंघटित क्षेत्राची व्याप्ती आणि स्वरूपाची कल्पना येते. भारतातील अतिरिक्त लोकसंख्या, अशिक्षितपणा, कर्जबाजारीपणा, ग्रामोद्योगाचे अद्य:पतन, आजारी उद्योगाच्या समस्या, कामगाराचे दारिद्र्य, कुशल कामगाराचा अभाव, कामगाराचे स्थलांतर, संघटनेचा अभाव, संघर्षाचा अभाव, शासनाचे व उद्योगपतीचे प्रतिकूल धोरण, मध्यस्थाचा प्रभाव, शेतीउद्योगातील अस्थिरता या विविध कारणांनी असंघटित क्षेत्राची स्थिती अधिकच बिकट बनली आहे.

**व्याख्या :**

१) असंघटित मजूर सामाजिक सुरक्षितता कायदा २००८ नुसार खाजगी मालकीच्या एखाद्या संस्थेत किंवा स्वयंरोजगार करणारे १० पेक्षा कमी कामगार एकत्रित येऊन उत्पादन किंवा वस्तुविक्री किंवा कोणतीही सेवा पुरविण्याचे काम करतात अशा कार्याशी संबंधित क्षेत्रास असंघटीत क्षेत्र म्हणतात.

२) जे कामगार स्वत:च्या काही वैशिष्ट्यामुळे, जसे अज्ञान, निरक्षरता, अकुशलता, उद्योगाचा लहान आकार, विखुरलेले स्वरूप यामुळे एकत्र येऊ शकत नाहीत किंवा संघटीत होऊ शकत नाहीत त्यांना असंघटीत क्षेत्र असे म्हणतात.

भारतात श्रममंत्रालयाने असंघटीत क्षेत्राला चार गटामध्ये विभागले आहे.

**अ) व्यवसायाच्या दृष्टीने वर्गीकरण** - लहान व अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन मजूर, ठेक्यांची शेती करणारे, मासेमारी, पशुसंवर्धन, बिडी बनविणारे, लेबल व पॅकींग करणारे, बांधकाम व्यवसायात गुंतलेले, चामड्याचे व्यवसाय करणारे, विणकाम व शिवणकाम करणारे, कारागीर, मिठाचा व्यवसाय, विट उत्पादक कामगार, दगड खाणीमधील कामगार, करवत गिरणीमध्ये काम करणारे व तेल घाण्यामध्ये कामकरणाऱ्या कामगारांचा समावेश या व्यवसाय गटात होतो.

**ब) रोजगार स्वरूपाच्या दृष्टीने वर्गीकरण** - यामध्ये कृषी संलग्न मजूर, शुल्कबंध, स्थलांतरीत मजूर व ठेकेदारी व अस्थायी कामगार असे वर्गीकरण केले जाते.

**क) कामाच्या स्वरूपावरून वर्गीकरण** - यामध्ये ताडी व्यवसाय करणारे, स्वच्छता कर्मी हमाल, प्राणी वाहून नेणारे, वाहनावर काम करणारे हमाल या वर्गीकरणामध्ये येतात.

**ड) सेवा श्रेणीच्या दृष्टीने वर्गीकरण** - या गटात घरगुती कामगार, मासेमारी, सुतकाम करणारे, न्हावी, वृत्तपत्र विक्रेते, भाजीपाला व फळविक्रीकरणारे कामगार येतात. शिवाय हस्तकला व्यावसायिक, सुतारकाम करणारे रिक्षा ऑटो, शिंपी, विजयंत्राचे काम करणारे असंघटीत क्षेत्रात येतात.

**भारतीय संघटीत व असंघटीत क्षेत्रांची तुलनात्मक स्थिती :**

भारताच्या संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगाराच्या संख्येत मागील २५ वर्षाच्या कालावधीत कसे बदल होत गेले याची सांख्यिकीय माहिती

**तक्ता क्र. १**

**भारतातील संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार**

(आकडे दशलक्षात, कंसातील आकडे प्रतिशत मध्ये)

| वर्ष | संघटीत | असंघटीत | एकूण कामगार |
|---|---|---|---|
| १९८७-८८ | २५.७१ (७.९३) | २९८.५८ (९२.०७) | ३२४.२९ |
| १९९३-९४ | २७.३७ (७.३१) | ३४७.०८ (९२.६९) | ३७४.४५ |
| १९९९-०० | २८.११ (७.०८) | ३६८.८९ (९२.९१) | ३९७.०० |
| २००५-०६ | २६.४६(७.५४) | ३५८.४५ (९२.४६) | ३८४.९१ |
| २०११-१२ | २७.२२(६.६०) | ३८५.०१ (९३.४०) | ४१२.२३ |
| सरासरी वृद्धीदर | २.८८ | ७.४१ | ७.०६ |

(स्रोत : Dhas A.L. / Helen M. Social Security for Unorganised Workers in India, MPRA, Madurai, 2008 (P.4))

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की १९८७-८८ मध्ये भारतात एकूण ३२४.२९ दशलक्ष कामगार होते पैकी संघटीत क्षेत्रात २५.७१ (७.९३%) आणि असंघटीत क्षेत्रात २९८.५८ (९२.०७%) कामगार कार्यरत होते. हेच प्रमाण १९९३-९४ मध्ये एकूण कामगारांची संख्या ३७४.४५ होती त्यापैकी संघटीत व असंघटीत कामगाराची संख्या ७.३१ व ९२.६९ प्रतिशत होती नंतर १९९९-०० मध्ये एकूण कामगारसंख्या ३९७ दशलक्ष होती त्यापैकी संघटीत ७.०८ आणि असंघटीत ९२.९१ प्रतिशत झाली पुढे २००५-०६ मध्ये एकूण कामगार संख्या ३८४.९१ दशलक्षवर गेली. पैकी संघटीत क्षेत्रात ७.५४ प्रतिशत आणि असंघटीत क्षेत्रात ९२.४६ प्रतिशत कामगार कार्यरत होते. २०११-१२ मध्ये एकूण कामगार संख्येत पुन्हा भर पडून ती ४१२.२३ दशलक्षवर गेली त्यापैकी संघटीत क्षेत्रात ६.६० प्रतिशत आणि असंघटीत क्षेत्रात ९३.४० प्रतिशत होती.

अशा पद्धतीने संघटीत क्षेत्राच्या तुलनेने असंघटीत क्षेत्रातील कामगारांची संख्या वाढत असतांना दिसते. तिच्यातील वाढ कमी प्रमाणात असली तरी एकूण अर्थव्यवस्थेतील तिचे योगदान नेहमीच अधिक असल्याचे स्पष्ट होते. मात्र त्यांच्या कार्यात आणि जीवन मानात सुधारणा होतांना दिसत नाही हे विशेष. दोन्ही क्षेत्राचा वृद्धीदर तपासला असता सरासरीने संघटीत क्षेत्राची वाढ १९८३ पासून २.८८ प्रतिशत होती आणि त्याच कालावधीत असंघटीत क्षेत्राचा सरासरी वृद्धीदर ७.४१ प्रतिशत राहिला. दोन्हीचा मिळून संयुक्त वृद्धीदर

मात्र ७.०८ राहिला. वरील आकडेवारीचा अभ्यास करता २००५-०६ नंतर संघटीत क्षेत्रातील कामगार वृद्धीत घसरण होत गेली मात्र त्याच काळात असंघटीत क्षेत्राचा वृद्धीदर वाढत गेला असे चित्र दिसते.

**असंघटीत कामगाराची वैशिष्ट्ये :**

एकंदरीत भारतातील असंघटीत कामगाराच्या स्वरूपावरून व जीवनमानाच्या स्थितीवरून जी काही लक्षणे आढळतात त्यावरून खालील प्रमाणे वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

१) भारतात ग्रामीण क्षेत्रातील असंघटीत कामगाराची विभागणी विशेषत: मागासलेपण, जात, धर्मावर आधारित झालेला दिसून येते तर शहरीक्षेत्रात अशा विभागणीचे प्रमाण कमी असते. मात्र शहरात स्थलांतरित असंघटीत कामगाराचे प्रमाण जास्त असते.

२) विशेषत: असंघटीत कामगार परंपरावादी, जून्या प्रथा व धार्मिक वृत्तीचे असतात तसेच बालविवाह, सणासमारंभाकरिता कर्ज काढून खर्च करणारे असतात.

३) विशेषत: असंघटीत कामगारांना हंगामी बेकारीचा प्रश्न सतत भेडसावीत असतो त्याबरोबरच छुप्या बेकारीचाही सामना त्यांना करावा लागतो.

४) शेतीशी संबंधीत कामे एकत्रितपणे करत असतांना सुद्धा लहान, सिमांत शेतकरी व शेतमालक यांच्यामध्ये औपचारिक संबंध दिसून येत नाहीत.

५) कामाचे स्वरूप एकसारखे असून सुद्धा अनेक असंघटीत कामगार भौगोलिक क्षेत्रामुळे व आपल्या वैयक्तिक कारणांमुळे एकत्रित काम न करता विस्कळीत स्वरूपात काम करत असतात.

६) असंघटीत क्षेत्रात कामगारांना मुक्त प्रवेश असतो तसेच केव्हाही बाहेर पडता येते.

७) असंघटीत क्षेत्रात मुख्यत: श्रमप्रधान तंत्राचा वापर होतो.

८) असंघटीत क्षेत्राला प्राधान्याने शासकीय मदतीचा अभाव असतो.

९) असंघटीत कामगाराचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे असून ते झोपडपट्टी तसेच मागास भागात निवास करतात.

१०) असंघटीत कामगारांमध्ये स्थलांतरित मजुराचे प्रमाण सर्वाधिक असते.

११) असंघटीत कामगाराचे कामाचे तास अधिक मात्र वेतन कमी दिल्या जाते त्यातही अनियमितता असते त्यामुळे त्यांचे शोषणच अधिक होते.

वरील वैशिष्ट्यावरून असे स्पष्ट होते की कोणत्याही देशाच्या विकासात्मक प्रक्रियेमध्ये सुरवातीला संघटीत श्रमिकाचे प्रमाण कमी असते ज्यामध्ये सरकारी, निमसरकारी आणि काही प्रमुख खाजगी कंपन्यामधील श्रमिक वा कर्मचारी संघटीत असलेले आणि ते आपली मजबूत संघटना प्रस्थापित करतात तसेच त्यांची सौदाशक्ती अधिक असते. त्यामुळे

ते मालकांशी यशस्वीरित्या वाटाघाटी करू शकतात तसेच उच्च वेतन, बोनस, इतर सवलती मिळवू शकतात. मात्र असंघटीत कामगार अकूशल, अडाणी, अप्रशिक्षित व मागासलेले अशा श्रमिकांची संख्या भरपूर असते. यामध्ये बहुतांश श्रमिक खेड्यातून आलेले असतात. संघटनेचे महत्त्व त्यांना कळलेले नसते. त्यांच्यातील परंपरागत आणि भटक्यावृत्तीमुळे ते संघटीत राहतात. ग्रामीण आणि शहरी मजुरांमध्ये दिसून येणारा असंघटीतपणा हे त्यांचे वैशिष्टये बनले आहे त्यामुळे श्रमबाजार असंघटीत बनतो म्हणून अशा श्रमबाजारात श्रमाची मागणी व श्रमाचा पुरवठा यांच्या योग्य मेळ बसने खूप कठीत जाते त्याचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम, त्यांच्या कुटूंबावर आणि समाजावर तसेच देशाच्या विकासावर होतांना दिसतात.

**असंघटीत क्षेत्र आणि सामाजिक सुरक्षितता :**

सामाजिक सुरक्षितता ही संकल्पना तशी पूर्वापार चालत आलेली संकल्पना होय. समाज जीवनामध्ये सर्वसाधारणपणे तीन प्रकारच्या सुरक्षिततेबाबत समस्या दिसून येतात. १) उत्पन्नाची असुरक्षितता २) व्यावसायिक असुरक्षितता ३) नैसर्गिक कारणांमुळे निर्माण होणारी असुरक्षितता मात्र काळओघात या संकल्पनेत बदल होत गेलेत.

सप्टेंबर १९७७ ला दिल्ली येथे घेतलेल्या जागतिक श्रम संघटनेच्या (ILO) परिषदेत सामाजिक सुरक्षितता म्हणजे 'समाजाने योग्य संघटनेकडून आपल्या सभासदांना विविध आपत्ती प्रसंगी त्यांना सहाय्य करणे होय' अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न झाला.

श्री. सिंग व स्वरन यांच्या मते, ''सामाजिक सुरक्षा म्हणजे नैसर्गिक सामाजिक व वैयक्तिक तसेच आर्थिक कारणांमुळे निर्माण होणाऱ्या अनेक संकटाच्या विरूद्ध समाजाद्वारे निर्माण केलेली एक पद्धती होय.''

के.एन.वैद्य यांच्या मते, ''सामाजिक सुरक्षितता हा असा एक प्रमुख आधार स्तंभ आहे, यावर कल्याणकारी राज्याची संरचना टिकून असते. व बहुतेक देशामध्ये त्याला सामाजिक योजनांचा महत्त्वपूर्ण भाग समजले जाते.''

या अंतर्गत मुख्यत: सामाजिक विमा, सामाजिक सहाय्य, कौटूंबिक लाभ, आरोग्याची काळजी व सामाजिक कल्याण सेवाशी संबंधीत इतर बाबीचा समावेश होतो. याबाबत जी.डी.एच.कोल यांच्या मते, ''सामाजिक सहाय्य व सामाजिक विमा यामधील फरक स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, सामाजिक सहाय्यतेचा कार्यक्रम हा पारंपरिक अनिवार्य मदतीच्या तत्वावर आधारित असतो तर सामाजिक विम्याची योजना म्हणजे गरजू लोकांच्या प्रति समाजाच्या सद्भावनेचे ते प्रतिक असते.''

भारत सरकारने असंघटीत कामगारांच्या सामाजिक सुरक्षीततेसाठी अस्तित्वात असलेल्या यंत्रणेचे चार भागात वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

१) केंद्र सरकार पुरस्कृत सामाजिक सहाय्यता कार्यक्रम २) सामाजिक विमा योजना ३) केंद्र व राज्यशासनाच्या कल्याण निधीमार्फत सामाजिक सहाय्य व ४) स्वयंसेवी, सामाजिक संस्था मार्फत करण्यात येणारे प्रयत्न.

असंघटीत श्रमिकांना सामाजिक सुरक्षितता मिळावी म्हणून केंद्र व राज्य सरकारमार्फत काही निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. केंद्र सरकारचे विविध कायद्यातंर्गत अनेक प्रकारच्या कल्याणकारी निधीची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये सामाजिक बांधिलकी म्हणून अनेक कामगार संघटनाही असंघटीत श्रमिक वर्गासाठी पुढे येवून कार्य करीत आहेत.

१) बीडी कामगार कल्याण निधी अधिनियम १९७६ अंतर्गत कल्याण निधीची तरतुद.
२) अभ्रक खनिज कामगार कल्याण निधी अधिनियम १९४६ अंतर्गत
३) चुनखडी व डोलामाईट खनिज श्रमिकांसाठी कामगार कल्याण निधी अधिनियम १९७२ अंतर्गत तर
४) लोखंड, मॅगनीज खनिज, कामगार कल्याण निधी अधिनियम १९७६ अंतर्गत तरतुदी केल्या आहेत.

अशा प्रकारे भारत सरकारने विविध श्रमिक वर्गासाठी त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी कल्याण निधीची तरतुद करून या कल्याण निधीतून मुख्यत: वैद्यकीय सेवा त्यांच्या मुलांना शैक्षणिक सहाय्य, घरे, पाणीपूरवठा यासारख्या सोयी सुविधा पुरविण्यावर भर दिला जातो.

केंद्र शासनाच्या या निधीतून राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण व शहरी भागामध्ये विविध योजना राबविल्या जातात. यामध्ये मुख्यत: इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकालीन निवृत्ती वेतन योजना, राष्ट्रीय कुटूंब लाभ योजना आणि राष्ट्रीय प्रसूती विषयम लाभ योजना यांचा समावेश होतो. असंघटीत कामगारांकरिता या सामाजिक सुरक्षा योजना - सामाजिक जीवन विमा निगम (LIC), साधारण विमा निगम (GIC) यांच्याद्वारे राबविल्या जातात. त्यामध्ये जनश्री विमा योजना, कृषीश्रमिक सामाजिक सुरक्षा योजना, आरोग्य विमा योजना, महात्मा गांधी बुनकर विमा योजना, आम आदमी विमा योजना, राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना, इत्यादीचा समावेश होतो.

तसेच या अंतर्गत श्रमिकांनी त्यांच्या मोठ्या आजारांसाठी उदा.कर्करोग, मुत्रपिंड, हृदयाची शस्त्रक्रिया इ. साठी खर्च केलेले पैसे त्यांना परत मिळवून दिले जातात. स्त्री कामगारांसाठी प्रसुतीविषयम फायदे मिळवून दिले जातात. अलीकडे अनेक सामाजिक स्वयंसेवी संस्था देखील, असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी त्यांना किमान सामाजिक सुरक्षितता मिळावी यासाठी प्रयत्न करत आहेत. जसे की, स्वयंरोजगारीत महिलांची संघटना

(SEWA), महिला विकास व सुरक्षा यासाठी सहकाराच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. अलीकडे महाराष्ट्रामध्ये युवा (YUVA) या सारख्या संस्था देखील पुढाकार घेत आहेत.

**देशातील रोजगारीची स्थिती :**

**राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण : २००४-०५ :**

भारतात एकूण ४५७५ लाख श्रमिकांमध्ये स्वयंरोजगार प्राप्त श्रमिकाचे प्रमाण ५६.५ प्रतिशत होते. आकस्मिक श्रमिकांचे प्रमाण २८.३ प्रतिशत होते. या दोन्ही दुर्बल वर्गाचे प्रमाण विचारात घेतल्यास ते ८५ प्रतिशत होते. तर इतर १५ प्रतिशत श्रमिक हे नियमित श्रमिक होते या शिवाय असंघटीत क्षेत्रातील एकूण ३९४९ श्रमिकांपैकी स्वयंरोजगार प्राप्त श्रमिकाचे प्रमाण ६४ प्रतिशत होते आणि आकस्मिक श्रमिकाचे प्रमाण २९ प्रतिशत होते. वरील दोन्ही दूर्बल घटकांचे प्रमाण सरासरी ९३ प्रतिशत होते तर नियमित श्रमिकांचे प्रमाण फक्त ७ प्रतिशत होते. यावरून असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांची दयनीय अवस्था दिसून येते. या उलट संघटीत क्षेत्राची स्थिती फारच चांगली दिसून येते. जेथे ६९ प्रतिशत श्रमिक नियमित श्रमिक आहेत. तर ३१ प्रतिशत स्वयंरोजगार प्राप्त व आकस्मिक श्रमिक आहेत. ज्यांना सामाजिक सुरक्षा तसेच नोकरीची सुरक्षा विधीवत प्राप्त आहे.

तसेच गैरकृषी उद्योगापेक्षा कृषी क्षेत्राची स्थिती फार भयावह असलेली दिसून येते कारण कृषी क्षेत्रात जवळजवळ ९९ प्रतिशत श्रमिक स्वयंरोजगार व आकस्मिक होते आणि फक्त १ प्रतिशत श्रमिक नियमित होते. त्यातही कृषीमध्ये असंघटीत क्षेत्रात ९९.४ प्रतिशत श्रमिक स्वयंरोजगार व आकस्मिक श्रमिक होते ज्यांना कोणताही प्रकारची सामाजिक सुरक्षा प्राप्त झालेली नव्हती. मात्र गैरकृषी क्षेत्रात हेच प्रमाण ८३ प्रतिशत होते.

देशात २००८-०९ मध्ये शेती क्षेत्रात ९८ प्रतिशत उद्योग क्षेत्रात ७५ प्रतिशत आणि सेवा क्षेत्रात ७२ प्रतिशत श्रमिक हे असंघटीत क्षेत्राशी संबंधीत कार्यात गुंतलेले होते. भारतात शेती व बिगर शेतीक्षेत्रात कार्यरत, असंघटीत कामगाराचे प्रमाण डॉ. अर्जून सेन गुप्ता समितीचा अहवाल मे.२००६.

**तक्ता क्र. २**

**शेती व बिगर शेतीक्षेत्रात पुरूष व स्त्री कामगार**

| अ.क्र. | क्षेत्र | पुरूष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| | **(शेती)** | | | |
| १. | ग्रामीण | १३७.५१ | ८७.०९ | २२४.६० |
| २. | शहरी | ४.९५ | ३.२४ | ८.१९ |
| ३. | एकूण | १४२.४६ | ३०.३३ | २३२.७९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **(बिगर शेती)** | | | |
| ४. | ग्रामीण | ४०.३५ | ११.६८ | ५२.०३ |
| ५. | शहरी | ४५.१३ | १०.३६ | ५५.४९ |
| ६. | एकूण | ८५.४८ | २२.०४ | १०७.५२ |
| | **(पूर्ण भारत)** | | | |
| ७. | ग्रामीण | १७७.८६ | ९८.७७ | २७६.६३ |
| ८. | शहरी | ५०.०८ | १३.६० | ६३.६८ |
| ९. | एकूण | २२७.९४ | ११२.३७ | ३४०.३१ |

(संख्या दशलक्षमध्ये)

वरील तक्त्याच्या आधारे आपणास असे स्पष्ट होते की शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामीण क्षेत्रात असंघटीत कामगाराचे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण भागात २७६.६३ दशलक्ष तर शहरी भागात ६३.६८ दशलक्ष कामगारांचा समावेश होतो. याचाच अर्थ एकूण असंघटीत क्षेत्रातील कामगारांमध्ये शहरी भागात २३ प्रतिशत कामगार कार्यरत आहेत तर ग्रामीण भागात ७७ प्रतिशत कामगार कार्यरत आहेत. तसेच देशातील असंघटीत क्षेत्रातील एकूण कामगारांमध्ये स्त्रियांचे पमाण हे ४९.३० प्रतिशत असून पुरूषांचे प्रमाण ५०.७ प्रतिशत आहे. यावरून देशात असंघटीत क्षेत्रात कामकरणाऱ्या श्रमिकांची संख्या जास्त तर आहेच पण यामध्ये स्त्रियांचे प्रमाण हे पुरूषांच्या जवळपास बरोबरीचे म्हणजे ४९.३०% आहे. त्यातही या क्षेत्रात शहरी भागात काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण १२.१ प्रतिशत असून ग्रामीण भागात काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ८७.९ प्रतिशत असल्याचे स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ३**

**निव्वळ देशीय उत्पादनातर्गत विविध क्षेत्रनिहाय संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगाराचे वितरण (२००२-०३)**

| क्र. | उद्योग | संघटीत क्षेत्र | असंघटीत क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | शेती, जंगल, मत्स्य | ४.१ | ९५.९ |
| २. | खाणकाम, निर्माणी, वीज आणि बांधकाम | ७०.५ | २९.५ |
| ३. | सेवा क्षेत्र | ५५.४ | ४४.६ |
| ४. | एकूण | ४३.३ | ५६.७ |

वरील तक्त्यावरून निव्वळ देशीय उत्पादनात संघटीत व असंघटीत क्षेत्राचे विविध क्षेत्रांतर्गत योगदान दर्शविले आहे. त्यानुसार शेती व संबंधीत व्यवसायात गुंतलेल्या संघटीत कामगाराचे योगदान ४.१ प्रतिशत आहे तर याच व्यवसायात गुंतलेल्या असंघटीत कामगाराचे

योगदान सर्वाधिक म्हणजे ९५.९ प्रतिशत होते. गैरशेती व्यवसायात गुंतलेल्या संघटीत कामगाराचे योगदान ७०.५ प्रतिशत होते तर असंघटीत कामगाराचे याच व्यावसायातील योगदान २९.५ प्रतिशत होते आणि सेवा क्षेत्रात संघटीत कामगाराचे योगदान ५५.४ प्रतिशत असून याच क्षेत्रात असंघटीत कामगाराचे योगदान ४४.६ प्रतिशत होते. एकंदरीत तिन्ही क्षेत्राचे NDP तील संघटीत क्षेत्राचे योगदान ४३.३ प्रतिशत असून असंघटीत क्षेत्राचे योगदान ५६.७ प्रतिशत होते. यावरून संघटीत क्षेत्राच्या तुलनेत असंघटीत क्षेत्रातील कामगाराचे निव्वळ देशीय उत्पादनातील योगदान अधिक असल्याचे दिसून येते.

**असंघटीत क्षेत्राच्या समस्यांवरील उपाय :**

भारतात एकूण श्रमसंख्येमध्ये असंघटीत श्रमिकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. तेव्हा या क्षेत्राला संघटीत क्षेत्राचा दर्जा मिळणे अत्यावश्यक आहे. तसेच त्यांना योग्य वेतन, सामाजिक सुरक्षा, आरोग्य, सामाजिक कल्याण, मातृत्व आणि त्याच्या बालकांच्या पालन पोषणाची जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक आहे. याच बरोबर आपले जीवनमान उंचावण्याकरिता त्यांना कौशल्यपूर्ण आणि तांत्रिक शिक्षण प्रशिक्षणाची किमान खर्चावर आधारित व्यवस्था करणे नितांत गरजेचे आहे. या सर्व बाबीकरिता त्यांच्या मानसिकतेत बदलाची आवश्यकता आहे. तरच त्यांना त्याचा लाभ घेता येईल.

**राष्ट्रीय श्रम आयोगाने सांगितलेले उपाय :**

१) सर्वप्रथम असंघटीत क्षेत्रातील कामगारांना स्विकृती प्रदान करणे आणि औपचारिक सर्वेक्षणामध्ये त्याचा समावेश करणे.

२) या क्षेत्रातील सर्व कामगारांना औपचारिक ओळखपत्र दिले जावे त्या आधारे त्यांना कायद्यांतर्गत संरक्षण दिले जावे.

३) असंघटीत क्षेत्रातील प्रत्येक कामगार भारतीय नागरिक असल्याने तो संरक्षण व कल्याणासाठी पात्र असावा तसेच जी.डी.पी. मध्ये त्यांचे योगदान अधिक असल्याचे त्यांना संघटीत क्षेत्रातील श्रमिकाप्रमाणे सर्व फायदे मिळणे अत्यावश्यक आहे.

४) त्याच्या कामाच्या अधिकाराला सामाजिक सुरक्षेच्या अधिकाराचे अभिन्न अंग मानावे लागेल. त्या अनुषंगाने त्यांचे आरोग्य, महिला कामगारांना संरक्षण, लहान मुले-मुली व बालकांच्या योग्य संगोपनाची जबाबदारी सरकारतर्फे स्वयंसेवी संस्थांना द्यावी. अशी शिफारस या आयोगाने केली आहे. कामाचा अधिकार या अंतर्गत असंघटीत क्षेत्रातील कामगारांना मूलभूत अधिकार प्रदान करण्यात यावेत.

५) आर्थिक विकासाला हातभार लावणारे गरीब, स्त्रिया बालकामगार यांचा आर्थिक स्तर वाढविण्यासाठी कृतिआराखडा करून त्या अंतर्गत कायद्यानुसार असंघटीत क्षेत्रातील कामगारांना सुरक्षा देण्यात यावी .

असंघटीत कामगारांसाठी समाजिक सुरक्षितता कायदा - २००८ हा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी १५ आक्टोबर १९९९ मध्ये भारतीय जनता पक्षाने श्री. रविंद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या राष्ट्रीय श्रम आयोगाची स्थापना केली. २००२ मध्ये या आयोगाने आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला. त्यामध्ये असंघटीत क्षेत्रातील कामगारांना किमान सुरक्षा मिळावी यासाठी कायद्याचे सुरक्षा कवच आवश्यक असल्याचे सूचविले. परंतू तेव्हा ही शिफारस अंमलात येऊ शकली नाही. पुढे मे २००४ मध्ये संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने राष्ट्रीय किमान समान कार्यक्रम अंतर्गत असंघटीत क्षेत्रातील कामगारांना (९३%) विविध कल्याणकारी योजना राबविण्याचे ठरविले. त्यानुसार सप्टेंबर २००४ मध्ये डॉ. अर्जुन सेनगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली असंघटीत क्षेत्रातील आस्थापनांचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना केली. या आयोगाच्या अहवालाने असे स्पष्ट केले की, भारतामध्ये ७७ प्रतिशत लोकांचा खर्च दैनिक दरडोई २० रू. पर्यंतच आहे.

पुढे अर्जून सेनगुप्ता यांनी ऑगस्ट २००५ व मे २००६ या दोन टप्प्यामध्ये दोन अहवाल मा. पंतप्रधानाकडे सादर केले. ज्यामध्ये असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या कामाची स्थिती आणि त्यांच्या आणि सामाजिक सुरक्षितता निर्माण करण्यासंबंधीच्या कायद्याच्या मसुद्याचा समावेश होता. तसेच सन २००५ मध्ये काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय सल्लागार परिषदेने दुसऱ्या राष्ट्रीय श्रम आयोगाने सुचविलेल्या शिफारशीच्या आधारे असंघटीत क्षेत्रासाठी एक मसुदा विधेयक सादर केले.

डॉ. सेनगुप्ता यांचा अहवाल व राष्ट्रीय सल्लागार परिषदेचा अहवाल विचारात घेऊन त्यावर चर्चा घडवून आणली. आणि सप्टेंबर २००७ मध्ये 'असंघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता' या नावाने हे विधेयक मंजुरीसाठी राज्यसभेमध्ये ठेवण्यात आले व ऑक्टोबर २००८ मध्ये राज्यसभेत याविधेयकावर उलट सुलट खल होऊन शेवटी राज्यसभेने संमती दिली. त्यानंतर हे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले व डिसेंबर २००८ मध्ये लोकसभेची मंजूरी मिळाली आणि शेवटी ३० डिसेंबर २००८ ला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या स्वाक्षरीने विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. ज्याचे नाव 'असंघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता कायदा-२००८' असा अस्तित्वात आला.

या कायद्याअंतर्गत राष्ट्रीय स्तरावर 'राष्ट्रीय सामाजिक सुरक्षितता मंडळ व राज्य स्तरावर राज्यस्तरीय सामाजिक सुरक्षित मंडळ स्थापन करण्याची तरतुद असून त्यानुसार स्थापना केली. यामध्ये असंघटीत कामगाराच्या नोंदणी प्रक्रियेपासून त्यांना द्यावयाचचा लाभासंबंधीची आवश्यक ती तरतुद समाविष्ट करण्यात आली. केंद्र व राज्यस्तरावरील ही प्रस्थापित मंडळे कामगार कल्याणासाठी सध्या अस्तित्वात असणाऱ्या योजनांचे लाभ असंघटीत क्षेत्रातील घटकांना देण्याच्या दृष्टीने समन्वयाचे काम करतील तसेच

आवश्यकतेनुसार एखाद्या विशिष्ट घटकांसाठी एखादी नवीन योजना कार्यान्वित करू शकतील त्या योजनेकरिता लागणाऱ्या स्त्रोतांचा देखील विचार करण्यात येतो.

'सहभागाधारित उत्पादन व विक्री प्रक्रियेत कार्यरत व्यक्ती किंवा कुटूंबाच्या मालकीचे कमीत कमी १० श्रमिकांचे मिळून बनलेले क्षेत्र म्हणजे असंघटीत क्षेत्र होय.'

ज्यांना कुशलप्रधान शिक्षण व प्रशिक्षणाची नितांत गरज आहे यामध्ये अकुशल श्रमिक, स्त्रिया व लहानमुले यांचा अंतर्भाव होतो. त्यांची प्रमुख समस्या म्हणजे अत्यंत कमी मोबदल्यात हे लोक काम करीत असतात. किंबहूना त्यांचे संघटन नसल्यामुळेच आणि त्यांच्या कामाचा दर्जा चांगला असूनही त्यांना योग्य मोबदला मिळत नाही हे विशेष. आज जागतिकीकरणाअंतर्गत व विकासाने झपाटलेल्या विविध अर्थव्यवस्थेत मानव विकास व कौशल्याची अतिशय निकड असणारे क्षेत्र म्हणजे असंघटीत क्षेत्र होय.

भारतात २००८ मध्ये एकुण ४५० दशलक्ष कामगारापैकी ४२० दशलक्ष कामगार (९२ प्रतिशत) आणि २०१२ पर्यंत (९३ प्रतिशत) प्रमाण असणारे क्षेत्र म्हणजे असंघटीत क्षेत्र होय. म्हणूनच राष्ट्रीय असंघटीत क्षेत्र आयोगाने या क्षेत्राला असंघटीत बेकारीची फौज म्हटले आहे. देशात हा अमर्याद श्रम पुरवठा म्हणून असंघटीत क्षेत्र ओळखल्या जाते. आधुनिक भारताची जडणघडण ज्यांच्या कार्यकुशलतेवर अवलंबून आहे असे ९३ प्रतिशत श्रमिकांना (असंघटीत) जर योग्य शिक्षण प्रशिक्षण, मार्गदर्शन, नियमित किमान वेतन, सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्यात शासन यशस्वी झाले तर स्टार्टप इंडिया आणि स्मार्ट इंडिया होण्यापासून भारताला कुणीही रोखू शकत नाही हे वास्तव आहे. आजही किरकोळ व्यापारी, लघु उत्पादक व अस्थायी कामाच्या ठिकाणी या असंघटत क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात अस्तित्व आहे.

वसाहती असणाऱ्या प्रदेशांमध्ये भांडवलशाही व गैरभांडवलशाही अशा दोन्ही ठिकाणी असंघटीत क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणात काम करून घेतल्या जाते. भारतात २००२ च्या राष्ट्रीय श्रम आयोगाने असंघटीत क्षेत्रातील कामगारांना न्यूनतम स्तराचे संरक्षण उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. सन १९९९-२००० मध्ये एकूण ३३.७ कोटी रोजगारामध्ये असंघटीत क्षेत्रातील रोजगारप्राप्त कामगाराची संख्या ही ३०.९ कोटी होती. म्हणजेच एकूण रोजगारामध्ये असंघटीत कामगारांचे प्रमाण ९१.७ प्रतिशत होते. असंघटीत कामगारांचा क्षेत्रवार आलेख पाहता कृषीमध्ये ९९.३ प्रतिशत, विनिर्माण क्षेत्रामध्ये ८३.५ प्रतिशत, निर्माणी क्षेत्रामध्ये ९२.१ प्रतिशत, व्यापार हॉटेल व्यवसायात ९८.७ प्रतिशत व सामाजिक आणि वैयक्तिक सेवांमध्ये त्यांचे प्रमाण ६२.७ प्रतिशत होते. निव्वळ असंघटीत क्षेत्राच्या एकूण रोजगारांमध्ये कृषी श्रमिकांचे प्रमाण ६१.४ प्रतिशत, व्यापार व हॉटेलिंग १२ प्रतिशत आणि विनिर्माण क्षेत्रामध्ये ११ प्रतिशत होते. राष्ट्रीय श्रम आयोगानुसार असंघटीत

क्षेत्रातील ६० प्रतिशत श्रमिक हे स्वयंरोजगार प्राप्त होते. २००१ च्या जनगणनुसार जीडीपी मध्ये असंघटीत क्षेत्राचा हिस्सा ६१.४ प्रतिशत होतो तो २०१२-१३ मध्ये ५० प्रतिशत पेक्षा जास्त आहे. यावरून या क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेता त्यांना मानवी विकास संकल्पने अंतर्गत त्यांना पर्याप्त अशा कायद्याचे संरक्षण देऊन योग्य जीवनमान जगण्याची पातळी उपलब्ध करून देणे सरकारची जबाबदारी आहे.

**जागतिक दृष्टिकोनातून असंघटीत क्षेत्र :**

असंघटीत क्षेत्राच्या संकल्पनेचा सैद्धांतिक पाया पन्नास व साठच्या दशकातील अभ्यासातून उदयास आला. ज्यामध्ये दुहेरी अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्ये मुख्यता विकसनशील देशाचे वैशिष्ट्ये असल्याचे स्पष्ट होते. असंघटीत क्षेत्राच्या संस्थात्मक वाटचालीचा मागोवा चार टप्प्यामध्ये घेता येतो. १९७० च्या दशकातील सुरवातीचा काळ, ज्याकाळात असंघटीत क्षेत्राच्या संकल्पनेचा विकास होऊन तीने मुळ धरणे, १९८० च्या दशकाचा काळ म्हणजे या संकल्पनेचा प्रसाराचा काळ अनेक कार्यक्रमामध्ये या संकल्पनेचा समावेश करण्यात आला. १९९० च्या दशकात अधिकृतपणे मान्यतेचा काळ यावेळी असंघटीत क्षेत्राच्या संकल्पनेला जागतिक मान्यता मिळाली आणि जागतिक अधिकृत योजनेत तिचा समावेश केला गेला.

२००० आणि त्यापुढील काळ म्हणजे या संकल्पनेचा विधायकपणे विस्ताराचा काळ ज्यामध्ये असंघटीत क्षेत्राचा नव्याने अभ्यास करण्यात अर्थतज्ञांना व अभ्यासकांना रस वाढला. विकसनशील व संक्रमण अवस्थेतील अर्थव्यवस्थांमध्ये असंघटीत क्षेत्राची वाढ झपाट्याने झालेली दिसते. या अर्थव्यवस्थांमधील गरीबांसाठी उत्पन्न व रोजगार निर्मितीचे साधन म्हणून या क्षेत्राच्या असलेल्या महत्त्वाबद्दल फारसे मतभेद नाहीत. असंघटीत क्षेत्राच्या अभ्यासाचे वाढते महत्त्व जागतिक कामगार संघटनेने आपल्या जागतिक कामगार परिषदेला सादर अहवालात श्रीमती हार्ट असे म्हणतात की, 'अलिकडच्या काही वर्षात विशेषत: विकसनशील आणि संक्रमणाच्या अवस्थेतील देशांमध्ये रोजगार निर्मितीचा मोठा वाटा असंघटीत क्षेत्राचाच राहिला आहे. कारण की बहुसंख्य लोक नियोजित क्षेत्रात नोकरी मिळवू शकत नाहीत किंवा स्वत:चा व्यवसायही सुरू करण्यात असमर्थ असतात.(ILO-2002A)

या देशांच्या विकास प्रक्रियेत संक्रमणाचा टप्पा म्हणून असंघटीत क्षेत्राचे अस्तित्व गृहीत धरले होते. या प्रक्रियेत जसा आर्थिक विकास होत गेला तसे असंघटीत क्षेत्राचाही विस्तार होत गेला. हळूहळू या देशांमधील अतिरिक्त अशा मनुष्यबळाच्या साठ्यावर उपाय म्हणून असंघटीत क्षेत्राचा विचार सुरू झाला. त्यातच 'स्ट्रकचरल ॲडजस्टमेंट प्रोग्राम' लागु करण्यात आल्याने या विकसनशील देशांमध्ये रोजगारविरहीत वाढ झालेली आहे. कारण सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्राला आपली स्पर्धात्मकता व लाभ टिकवून ठेवण्यासाठी

रोजगार क्षमतेचा बळी द्यावा लागतो. त्याचा एकूणच परिणाम या अर्थव्यवस्थामध्ये असंघटीत क्षेत्राचे अस्तित्व, विस्तार आणि चिरस्थायीत्वामध्ये झाला आहे म्हणूनच सुरवातीला असंघटीत क्षेत्राचे निरीक्षण व अभ्यास विकसनशील देशांच्या संदर्भात करण्यात आला आणि नंतर विकसीत देशांमध्ये या क्षेत्राच्या अभ्यासाला सुरूवात झाली. या क्षेत्राचे अस्तित्व विकसित आणि विकसनशील देशामध्ये असले तरी काही बाबतीत मुलभूत मतभेद असल्याचे दिसते ते म्हणजे विकसनशील देशामध्ये असंघटीत क्षेत्र हे गरीबांना (गरजुंना) रोजगार देणारी दुसरी कोणतीही पर्यायी व्यवस्था नसल्याने जिवंत ठेवणारी यंत्रणा समजली जाते. आणि विकसित देशांमध्ये संघटीत क्षेत्राच्या तुलनेत अधिक स्वायत्तता, लवचिकता व स्वातंत्र्य मिळत असल्याने लोक त्यात प्रवेश करतात. अशा प्रकारे गरीबांचे अस्तित्व टिकवणारे म्हणून कमी विकसित देशांमध्ये असंघटीत क्षेत्र विकसित देशाच्या तुलनेत अधिक कामगार केंद्रीत झालेले असून कमी उत्पन्न आणि कमी भांडवली संचय पुरवणारे आहे. अशी स्थिती असतांना देखील अलीकडच्या काळात असंघटीत क्षेत्रावरील अभ्यासामधून असे स्पष्ट होते की, असंघटीत क्षेत्रातील मोठ्या प्रभावावरील व्यवसाय कार्यक्षम आणि लाभदायी आहेत. मात्र या बाबत वास्तवता काय ही गोष्ट पडताळून पाहिल्या शिवाय निर्णयाप्रत पोहचणे कठीण आहे. (UNCHS-2006) अलीकडच्या काळात या एकूण नोकरी मधील असंघटीत क्षेत्राचा वाटा वाढत आहे. त्याचबरोबर सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढतो आहे.

उदा. असंघटीत क्षेत्राचा गैरकृषीचा जीडीपीतील वाटा आफ्रिकेत २७ प्रतिशत वरून ४१ प्रतिशतवर गेला आहे तर लॅटीन अमेरिकेत २९ प्रतिशत आहे तर आशियात तो ४१ प्रतिशतवर गेला आहे आणि कंबोडियामध्ये तर ८० प्रतिशतवर गेला आहे. अशा प्रकारे असंघटीत क्षेत्राचे जीडीपीतील गैरकृषीतील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. हे स्पष्ट होते. हे क्षेत्र अकुशल कामगार आणि स्थानिक उपलब्ध साधनसंपत्तीचा उपयोग करून रोजगार निर्मिती उत्पादन व उत्पन्नात प्रमुख भूमिका बजावत असल्याने राजकीय आर्थिक व सामायिक स्तरावर या क्षेत्राचा विचार होणे अगत्याचे झाले आहे. डे. सोटो १९८९ मध्ये आपल्या 'द अदर पाथ' या ग्रंथात असे म्हटले की, सरकारचा हस्तक्षेप आणि नियमामुळे नवीन व्यवसायाचा विकास थांबतो. आणि अशा प्रकारे वैद्यानिक आर्थिक उद्दीष्ट गाठण्याच्या प्रयत्नात प्रचलीत कायद्याचे पालन करण्याची किंमत त्यातून मिळणाऱ्या नफ्यापेक्षा किती तरी जास्त आहे. अशा स्थितीत भ्रमनिरास झालेल्या व्यावसायिकांचा अखेरचा आधार असंघटीत क्षेत्र असते.

स्निडर यांच्या व्याख्येत असंघटीत क्षेत्राबद्दल अधिक वास्तव दृष्टीकोन दिसतो. उत्पन्नकर, मूल्यवर्धीत किंवा कोणत्याही करांची देणी चुकविण्यासाठी, सामाजिक सुरक्षा

योगदान टाळण्यासाठी, मजुरीचा दर्जा, किमान वेतन, कामाचे सर्वाधिक तास, सुरक्षा उपाययोजना यांचे मापदंड तसेच विशिष्ट प्रशासकीय प्रक्रियेचे पालन करावे लागू नये या हेतूने सरकारी अधिकाऱ्यांपासून जाणीवपूर्वक गोपनीय ठेवल्या जाणाऱ्या अशा सर्व बाजारपेठाधारित वस्तू व सेवांच्या कायदेशीर उत्पादनाचे मिळून असंघटीत क्षेत्र बनते. यावरून असंघटीत क्षेत्रांतर्गत होणाऱ्या व्यापाराला एक कायदेशीर दर्जा देतांनाच विशिष्ट कामगार विषयक बाजारपेठीय प्रमाणाचे पालन केले जात नाही.

बहुतांश असंघटीत क्षेत्रातील व्यवसायाची कार्यरत कामगारांची नोंद अधिकृतपणे केलेली असली तरी त्यांच्या लाभाची नोंद अधिकृत करण्यास ते बाधील नसतात तसेच असंघटीत क्षेत्र असलेली अर्थव्यवस्था मुख्यता बारकाईने पाहिली न जाणाऱ्या अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे. या बाबत १९९३ मध्ये एन.एस.ए. सिस्टिम ऑफ नॅशनल अकाउंट ने या क्षेत्राची वर्गवारी भूमीगत, बेकायदा आणि असंघटीत क्षेत्रात स्वत:च्या अंतिम उपभोगासाठी तयार केलेली घरगुती उत्पादन व प्राथमिक आकडेवारी प्राप्त करण्याच्या कार्यक्रमातील उणीवांमुळे नजरेतून निसटलेल्या व्यावसायिक घडामोडी अशी केलेली आहे. अशा अनंत अडचणी व गुंतागुंतीतून असंघटीत क्षेत्राची पर्याप्त व्याख्या व अधिकृत माहिती प्राप्त व्हावी म्हणून प्रयत्न सुरू आहेत. त्या अंतर्गत संयुक्त राष्ट्रसंघाच्या सांख्यिकी विभागाने (U.N.S.D.) आणि भारतीय राष्ट्रीय सांख्यिकी आयोग (२०१०) मध्ये एक समिती स्थापन केली. (N.S.C.-2012) या समितीने असे नमुद केलेली आय.एस.ओ.च्या चौकटीनुसार परिणाम कारक आकडे वारीची व्यवस्था, अंमलात आणण्यासाठीच्या संकल्पना, व्याख्या आणि कार्यकक्षेसंदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या आकडेवारी जमवण्याच्या यंत्रणेतील तफावतीमुळे मुख्यत: भारतातील असंघटीत क्षेत्रातील रोजगार व व्यावसायावरील माहितीत असंख्य त्रुटी आहेत. अर्थव्यवस्थेच्या या महत्त्वाच्या विभागाची कामकाज पद्धती समजून घेण्यासाठी व या उणीवा कमी करून असंघटीत क्षेत्राच्या महत्त्वाच्या पैलूबाबत पुरेशी, तुलनात्मक आणि त्याच वेळेस विश्वासार्ह आकडेवारी गोळा करणे ही आजची गरज आहे. ज्याचा फायदा भविष्यात असंघटीत क्षेत्राबाबत धोरणे आखून त्याची अंमलबजावणी करण्यास सहाय्य होईल.


**संदर्भ सूची :**

१) www.unorganised sector.in
२) Muna Kalyani - Indian Informal Sector : An Analysis (IJMSR)
३) अर्थमंथन (२०१०) : मराठी अर्थशास्त्र परिषद, ३४ वे राष्ट्रीय अधिवेशन
४) Sengupta Arjun (2007) : Report on condition of work and promotion of livelihood in the unorganised sector, National Commission for Enterprises in the unorganised sector."
५) www.organised & unorganised sector.com

□□□□

ISBN 978-81-921694-8-4

# 25 Years of Human Development Report : Concept, Issues and Challenges



Editors

Dr. Prashant Haramkar
Dr. Jairam Gaikwad
Dr. Vanita Chore
Dr. Rajshree Raibhog

Kautilya Dnyan Prabhodhini, Amravati.

प्रा. गी.जी भारती

**ICSSR Sponsored**

**Two Day National Seminar**

**on**

# 25 Years of Human Development Report : Concept, Issues and Challenges

**18th & 19th August, 2017**

♦ **Editors** ♦


Dr. Prashant Haramkar

Dr. Jairam Gaikwad

Dr. Vanita Chore

Dr. Rajshree Raibhog



- Organized By -

**Kautilya Dnyan Prabhodhini**

(Regn. No. Maha / 495 / 09 / Amt.)

12, Gulmohar Colony, Camp, Amravati - 444 602 (M.S.)

# INDEX


| Sr.No. | Name of the Article | Author Name | Pg.No. |
|---|---|---|---|
| **Subsection I : Human Development : Concept & Components** | | | |
| 1) | Gender Equity & Human Development In India : A Challenge | Prashant Katole | १ |
| 2) | A Study on Comparison and Review of Critiques of Human Development Index | Aparna Samudre | ११ |
| 3) | The UN Strategy of "Human Development" A Journey from "Human Rights" | K. B. Nayak | २६ |
| 4) | Human development for everyone - Looking forward | Rajesh R. Chavan | ३३ |
| ५) | मानवी संसाधनाचे आर्थिक विकासात योगदान | लाजवंती आर. टेंभुर्णे | ३५ |
| ६) | मानव विकास अहवालाची २५ वर्षे : संकल्पना आणि आव्हाने | अस्मिता ठोंबरे | ४० |
| ७) | मानवी विकास निर्देशांक व संसाधने | अविनाश निकम | ४५ |
| ८) | मानव विकास निर्देशांक आणि त्याचे निर्देशक | ज्योती ढोमणे | ५२ |
| ९) | मानव विकास संकल्पना आणि स्वरूप | जे.व्ही. गायकवाड | ५५ |
| १०) | मानव विकास–एक विश्लेषण | गजानन गं. भारती | ६० |
| ११) | मानव विकास व आर्थिक विकासाचे परस्परावलंबन | वैशाली देशमुख | ६७ |
| १२) | UNDP ने वर्गीकृत केलेल्या मानव विकासाच्या विविध पैलूंचे विश्लेषण | राजश्री आ. रायभोग | ७२ |
| १३) | मानव विकास व महिला सक्षमीकरण – एक दृष्टीक्षेप | निना सा. चवरे | ८१ |
| **Subsection II : Various Issues addressed in UNDP's Report** | | | |
| १४) | Pathways to Development with Dignity : Review of UNDP Human Development Report 2010 with Special Reference to SAARC Countries | Dhanashri Mahajan | ८६ |
| १५) | मानव विकास संकल्पनेची २५ वर्ष : युएनडीपी च्या अनुषंगाने | आर. बी. भांडवलकर<br>विठ्ठल घिनमिने | ९१ |
| १६) | मानव संसाधन विकासामध्ये आरोग्य : एक उत्पादनक्षम घटक | रविंद्र दा. इचे | १०० |


*******************************

# मानव विकास–एक विश्लेषण

**गजानन गं. भारती**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना :**

जागतिक आर्थिक विकास आणि मानव विकास यांच्या सहसंबध जवळचा आहे. का? आर्थिक विकासाचे उधिष्टे आणि मानवी विकासाचे निर्देशक एकमेकाशी निगडीत आहेत का? या अंतर्गतच मानवी कल्यानाची उच्च पातळी गाढली आहे का? भारताच्या संदर्भात या सर्व बाबीची वास्तविकता पाहणे आवश्यक आहे. विकास प्रक्रियेत कल्यानाची साधने सर्व घटकांना उपलब्ध करुन देण्याकरीता मानवी विकासाची संकल्पना समोर आली. त्यानुसार प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासाच्या मुल्यांकनाकरीता जागातिक पातळीवर सकल राष्ट्रीय उत्पांदन (GNP) किंवा दरडोई उत्पन्नाचा निकष विचारात घेतला जातो. आलीकडील काळात कल्यानकारी राज्याची संकल्पना अस्तित्वात आल्याने सकेल राष्ट्रीय उत्पादन किंवा दरडोई उत्पन्न आर्थिक विकासाचे मोजमाप करण्या संदर्भात कमी पडू लागले. याला पर्याय म्हणून मानव विकास निर्देशांकाची (Human Development Index-HDI) संकल्पना समोर आली वास्तविक आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी अनेक अर्थतंज्ञानी अनेक निर्देशांक सादर केले. ज्यामध्ये मॉरिस डी मॉरिस, यांचा 'जीवनाचा भौतिक गुणवत्ता' निर्देशांक (Physical Quality Life Index = PQLI) तसेच पॉल स्ट्रीटन यांचा 'मूलभूत गरजा दृष्टीकोन' (Basic Need Approach) यांच्या प्रयत्नामुळे संयुक्त राष्ट्र संघाच्या विकास कार्यक्रम विभागामार्फत (UNDP) 'मानव विकास निर्देशांक' तयार करण्याचे प्रयत्न सुरु झाले त्याला फलश्रृती म्हणून १९९० मध्ये डॉ. महेबुब उल हक यांच्या मार्गदर्शनात जागतिक निवडक देशाचा 'मानव विकास निर्देशांक तयार केला गेला. तेव्हा पासून आजता गायत (UNDP) ने प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासाचे मोजमाप या निर्देशाकाद्वारे करुन प्रत्येक देशाच्या विकास अहवाल मानव विकास निर्देशांकाच्या स्वरुपात सादर केला जातो. (UNDP) च्या अहवाल निकषा प्रमाणे भारताने आपला पहीला मानव विकास अहवाल एप्रिल-२००२ मध्ये सादर केला तसेच राज्य स्तरावर मध्येप्रदेश हे मानव विकास अहवाल तयार करणारे देशातील पहीले राज्य ठरले जागतिक स्तरावर (UNDP) ने नंतरच्या काळात आपल्या मान विकास अहवालात 'लिंगभाव विकास निर्देशांक' (Gender Releted Development Index) आणि 'मानव दारीदयाचा निर्देशांक' (Human Poverty Index) या प्रमाने मानव विकासावर आधारीत काही निर्देशांक सादर केले.

**मानव विकासाचे महत्व :**

मानवाला आपले जीवन जगत असतांना उपलब्ध असलेल्या आवश्यकताची गुणवत्ता व संख्या

वाढविण्याची प्रक्रिया म्हणेज मानव विकास होय. १९९० चा (UNDP) या (HDI) अहवालानुसार लोकांना उपलब्ध असलेल्या विकल्पाची संख्या वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे मानव विकास होय. किंवा लोकांच्या जीवनमानाची पातळी वाढविणे म्हणजे मानव विकास होय.' वास्तविक विविध देशात 'आर्थिक वृध्दीच्या संकल्पनेत फक्त उत्पन्न या एकाच विकल्याच्या विस्तारीकरणाचा विचार होतो. मात्र मानव विकास संकल्पनेत त्याच्या सर्व विकल्पाचा विचार केला जोतो जसे- आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अशा सर्व विकल्पाचा विचार मानव विकासाच्या संकल्पनेत केला जातो. (महेबुब उलहक २००१) असे मानले जाते कि उत्पन्नामुळे सर्व विकल्पाचा विस्तार होतो. मात्र देशातील उत्पन्न वितरणात विषमता असल्यास कमी उत्पन्न गटातील लोकांना उपलब्ध विकल्पाची संख्या सिमित राहते. अशावेळी आर्थिक विकास हा खालच्या स्तरावपर्यंत झिरपत नाही हि वास्तविकता आहे किंवा देशातील आर्थिक व राजकीय संरचना अशी असु शकते की, ज्यामुळे उत्पन्न वाढले तरी समाजातील व्यक्तिच्या विकल्पात वाढ होणार नाही.

त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या मानवी विकल्पांना पूर्ण करण्याकरीता संपत्तीचा संग्रह करण्याची गरज नसते. कारण मानवाच्या अनेक विकल्पाचे मूल्य हे आर्थिक कल्पानापेक्षा आधिक असते ज्यामध्ये :- आरोग्य, ज्ञान, राजकीय स्वतंत्र्य, स्वच्छ व पर्याप्त पर्यावरण, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक प्रतिष्ठा व जिवनातील आनंद, इत्यादी बाबी उत्पन्नावर अलंबून नाहीत. परंतु आलिकडील काळात ह्या बाबी सुध्दा मानवासाठी दुरापास्त होत चालल्या आहेत. वास्तविक 'संपत्तीच महत्व तीच्या वापरात आहे, संपतीत नाही आणि म्हणूनच आपल्याला सावध करतांना महबुब उलहक असे म्हणतात की, 'आपली खरी संपत्ती ही आपली जनता आहे असे जर समाज समजत नसेल तर भौतिक संपत्तीच्या निर्मितीचा आत्याधिक हव्यास मानव जीवन संमृध्द बनविण्याच्या उद्येशाला मलिन करतो.

मावन विकासाच महत्व पाहत असतांना मानव विकास संकल्पनेत केवळ अर्थ व्यवस्थेचा समावेश नसून संपूर्ण मानवी समाज येतो. कारण मानव विकासात आर्थिक घटकाइतकेच सामाजिक राजकिय, व सांस्कृतीक घटकांनाही महत्व असते. उद्देश व साधने यामध्ये समय सुचकतेने फरक केला जातो. म्हणजेच मानवविकासात उद्देशा बरोबर साधनांना विचारात घेतले जाते. त्यामुळे सकल राष्ट्रीय उत्पादनातील वृध्दी मानवाच्या दृष्टीने अन्य विकल्पाच्या विस्ताराचे अत्यावश्यक साधन बनते. म्हणून आर्थिक वृध्दी व वितरणाचे मूल्यांकन मानवाच्या जीवनातील समृध्दीच्या रुपाने केले जाऊन मानव केवळ उत्पादन करणारे यंत्र न राहता त्याला केंद्रीय स्थान प्राप्त होते. आणि उत्पादन प्रक्रिया अमुर्त किंवा शुन्य न राहता तीला मानवी संदर्भ प्राप्त होतो. कारण मानव विकास प्रतिमानाचे समता, शाश्वतता, उत्पादकता, तसेच सशक्तीकरण हे चार घटक अत्यावध्यक मानले जातात म्हणूनच विकास प्रक्रियेत मानवाला अनंन्य साधारण महत्व प्राप्त होते.

**मानव विकास निर्देशांक :**

तीन सामाजिक निर्देशांकाच्या सरासरीचा समित्र असा आदर्ष सुचकांक म्हणजे मानव विकास निर्देशांक होय. तो तयार करतांना भिन्न भिन्न क्षेत्रातील स्थितीची तुलना त्या त्या विशिष्ट क्षेत्रात सर्वोच्या असणाऱ्या देशातील स्थितीशी केली जाते ज्यामध्ये १) आयुर्मान - जन्माच्यावेळी अपेक्षित जीवन ($P_1$), २) ज्ञान-प्रोढ साक्षरता, प्राथमिक, माध्यमिक,

उच्चमाध्यमिक शिक्षणाचा सयुक्त मानांकन दर, ($P_2$) ३) राहणीमान :- दरडोई उत्पन्न/उत्पादन ($P_3$), या घटकांचा समावेशे केला जातो. व मानव विकास निर्देशांक काढतांना प्रत्येक घटकांचे महत्तम व न्युहतम महत्व निश्चित केले जाते. त्यानंतर या प्रत्येक घटकाचे मूल्य हे दिलेल्या सुत्रामप्रमाणे ० ते ९ च्या दरम्यान काढले जाते.

$$\text{घटक निर्देशांक} = \frac{\text{वास्तविक मूल्य - न्युनतम मूल्य}}{\text{महत्तम मूल्य - न्युनतम मूल्य.}}$$

या सुत्राच्या आधारे प्रत्येक घटकाचे मूल्य काढले जाते आणि आलेल्या मूल्याला अनुक्रमे $P_1$,$P_2$, व $P_3$, मध्ये घेवून त्याच्या एकत्रित बेरजेला ३ ने भागून जो भागाक्ष र येईल तो अंक म्हणजे मानव किास निर्देशांक होय.

मानव विभास निर्देशांकाच्या मूल्यावरुन त्याचे तीन गटात वर्गीकरण केले जाते.

अ) ०.०० ते ०.४९९ निर्देशांक मूल्य असणारा गट, निम्म मानव विकास गट

ब) ०.५०० ते ०.७९९ मूल्य असणारा गट मध्यम मानव विकास गट आणि

क) ०.८०० ते ०.९९९ निर्देशांक मूल्य असणारा गट उच्चमानव विकास गट होय. या विविध गटांच्या निर्देशांकच्या आधारे त्या त्या देशाचा मानव विकास निर्देशांक तयार केला जोतो.

**मानव विकास निर्देशांक व भारताची वास्तविकता :**

मानव विकास निर्देशांकात १) जन्माच्या वेळी अपेक्षित आयुर्मान (ज्यामध्ये दीर्घ व आयोंग्यपूर्ण जीवनमान) २) प्रोढ साक्षरता दर व एकत्रित पटसंख्येच्या प्रमाणात (प्राथमिक, माध्यमिक व उच्चशिक्षण) ज्ञान आणि ३) देशांतर्गत दरडोई स्थूल उत्पन्न (सममूल्य क्रयशक्ती चलनात) अमेरीकन डॉलरमध्ये आर्थिक साध्य या तीन घटकावर ठरते. मावन विकास अहवालात २००५ नु सार भारताचा निर्देशांक ०.४८२ होता तर २०१० मध्ये त्यात वाढ होऊन तो ०.५१९ पर्यंत आला.

जागतिक स्तरावर (२०१० प्रमाणे) मानव विकासाच्या बाबतीत नार्वे(०.९३८) प्रथम क्रमांकावर तर ऑष्ट्रेलिया (०.९३७) नुसार द्वित्तीय क्रमांकावर पोलंड (०.७९५) नुसार ४१ व्या क्रमांकावर तर चीन (०.६६३) नुसार ८९ व्या क्रमांकावर आणि भारत. (०.५१९) नुसार ११९ व्या क्रमांकावर होता. अशा प्रकारे मानव विकासाच्या क्रमवारीत भारत खुप मागे असल्याचे दिसून येते. थोडक्यात जागतिक स्तरावर भारत मध्यम मानव विकासाच्या श्रेणीमध्ये येतो. भारताला जागतिक विकसीत देशाच्या स्पर्धात्मकतेत शास्वत विकास साध्य करावयाचा असेल तर देशांतर्गत सर्वच क्षेत्रात वेगवान असा श्रमाधिष्ठीत विकासावर भर देऊन तो साध्य करणे नितांत आवश्यक आहे. भारतात दरडोई उत्पन्नातील वाढ समाधान कारक असली तरी उत्पन्न वितरणात फार विषमता आहे. दारिद्रयाचे प्रमाणे २९ प्रतिशत असून कुपोषण २० (16%) कोटीच्या आसपास आहे बालमृत्यु व मातामृत्युचे प्रमाण मागास भागात तसेच अनुसचित जाती व जमातीमध्ये आधिक आहे. तसेच दरडोई उत्पन्न फार कमी असल्याने अल्पधारक शंकऱ्यांचे कर्जापाई प्रचंड आत्महत्या करण्याचे सत्र सुरुच आहे अशा पार्श्वभूमीवर मानव विकास निर्देकांचा अभ्यास हा चिंतनाचा विषय आहे आणि म्हणून त्याची तूलना जागतिक मानव विकासाशी केल्यास आपण कोणत्या पातळीवर आहोत हे सहज लक्षात येते म्हणूनच त्यावर विशेष उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे.

देशातील प्रतिव्यक्तीचे आरोंग्य सुदृढ व दिर्घायुषी असेल तरच दरडोई उत्पादकतेत वाढ होवू

शकते आणि राष्ट्रीय उत्पन्नात भर पडू शकते त्याच बरोबर भारतात प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यामिक व उच्चशिक्षणणाबाबत असलेले चित्र समाधान कारक नसून रोजगार पूरक अशा शिक्षण व प्रशिक्षणाचा अल्पविकास हा मानवी विकासाला हाणीकारक आहे. त्यातच ग्रामीण भागातील शिक्षणाची अवस्था फार बिकट असून देशातील तब्बल ३७ प्रतिशय शाळांमध्ये विजपूरवठा उपलब्ध नसल्याची माहीती केन्द्र सरकारकडून राज्यसंभेत सादर केली म्हणजे मार्च २०१७ पर्यंत देशातील ६२.८१ प्रतिशत शाळांपर्यंत विज उपलब्ध होती मात्र ३७.१९ प्रतिशत शाळा अजूनही आंधारात आहेत अशी भिषण अवस्था

**तक्ता क्र. १**

**भारतात राज्यनिहाय गरीबी कूपोषन व आरोंग्याबाबत स्थिती**

| राज्य | गरीबी एकूण लोंकसंख्येच्या प्रतिशन- २००४-०५ | अपर्याप्त भोजन २००४-०५ | कुपोषण वयवर्षे-३ पेक्षा कमी असलेले २००५-०६ | पिण्योग्य पाणी न मिळणाऱ्या कुंटूंबाचे प्रतिशत २००१-०२ | शौचालयाची सुविधा नसलेल्या कुंटूंबाचे प्रतिशत २००५-०६ |
|---|---|---|---|---|---|
| आध्रप्रदेश | १५.८ | ०.५ | ३६.५ | २०.० | ५७.६ |
| आसाम | १९.७ | ५.० | ४०.४ | ४१.२ | २६.६ |
| बिहार | ४१.४ | २.७ | ५८.४ | १३.४ | ७४.८ |
| गुजरात | १६.८ | ०.२ | ४७.४ | १५.९ | ४५.४ |
| हरियाणा | १४.०० | ०:१ | ४१.९ | १३.९ | ४७.७ |
| हिमाचल प्रदेश | १०.०० | ०० | ३६.२ | ११.४ | ५४.४ |
| कर्नाटक | २५.०० | ०.२ | ४१.१ | १५.४ | ५३.५ |
| केरळ | १५.०० | २.३ | २८.८ | ७६.६ | ४.० |
| मध्यप्रदेश | ३८.३ | १.६ | ६०.३ | ३१.६ | ८३.० |
| महाराष्ट्र | ३०.७ | ०.८ | ३९.७ | २०.२ | ४७.० |
| उडीसा | ४६.४ | ५.३ | ४४.० | ३५.८ | ८०.७ |
| पंजाब | ०८.४ | ०.७ | २७.० | ०२.४ | २९.२ |
| राजस्थान | २२.१ | ०० | ४४.० | ३१.८ | ६९.२ |
| तामिळनाडू | २२.५ | ०.३ | ३३.२ | १४.४ | ५७.१ |
| उत्तरप्रदेश | ३२.८ | १.५ | ४७.३ | १२.२ | ६६.९ |
| प.बंगाल | २४.७ | ९.० | ४३.५ | ११.५ | ४०.५ |
| छत्तीसगड | ४०.९ | २.२ | ५२.१ | २९.५ | ८१.३ |
| झारखंड | ४०.३ | ०.६ | ५९.२ | ५७.४ | ७७.४ |
| **भारत** | **२७.५** | **१.९** | **४५.९** | **२२.१** | **५५.५** |

स्त्रोत - आर्थिक समिक्षा -२००८-०९

(आकडे प्रतिशतमध्ये)

असल्याची माहीती मनुष्यबळ विकास राज्यमंत्री - उपेंद्र कुशवाह यांनी दिली. मानवी विकासाला आवश्यक अशा मूलभूत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न २१ प्रतिशत कूटूंबासाठी गंभीर आहे, पर्यावरणाला पोषक आसे वातावरण नाही. पर्याप्त जंगल संपत्ती उपलब्ध नाही. आणि पर्यावरणातील प्रदूषण वाढत असल्याने माणवी विकासाला हातभार न लागता उलट हाणीकारण आहे असेच चित्र दिवसा गणीक वाढत असल्याचे दिसते. 'एस. स्वामीनाथन यांच्या मतानुसार ८ हजार की. मी. लांबीच्या समूद्र किनारी लगत मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या ५० लक्ष लोकांपैकी ६० प्रतिशत जनता दारिद्रय रेषेखाली जवीन जगत आहे. ही वास्तवता विसरुन चालन नाही. ऑस्ट्रलिया देशातील आयुर्मान ८१.९ सर्वाधिक तर नार्वे या देशातील ८१ वर्ष आयुर्मानानुसार दुसऱ्या क्रमांकावर असुन भारताचे आयुर्मान ६४.४ इतके आहे.

वरील तक्त्यानूसार भारतात गरीबीचे (दारिद्रयाचे प्रमाण) २७.५ प्रतिशत असून राज्य निहाय सर्वाधिक गरीबीचे प्रमाण, उडीसा-४६.४ प्रतिशत, बिहार-४१.४ प्रतिशत, छत्तीगड-४०.९ प्रतिशत आणि झारखंड-४०.३ एम.पी. ३८.३ प्रतिशत असल्याचे दिसून येते तर किमान गरीबीचा स्तर असलेली राज्य म्हणजे हरीयाणा-१४ प्रतिशत, हिमाचल प्रदेश-१० प्रतिशत व पंजाब-८.४ प्रतिशत ही आहेत. तर उर्वरीत राज्य ही मध्यम गरीबी स्तर असलेली राज्य आहेत याला शासन ज़बाबदार असल्याचे दिसून येते.

देशात भूखमारीचे प्रमाण १.९ प्रतिशत असून पं. बंगाल-९ प्रतिशत, उडीसा-५.३ प्रतिशत तर आसाम-५ प्रतिशत आणि बिहार -२.७ प्रतिशत असल्याचे स्पष्ट होते या बाबत देशात खाद्यःनाची पर्याप्तता असतांना सुध्दा या जनतेपर्यंत उपलब्धता करुन देण्यात सार्वजनिक वितरण व्यवस्था उपयश ठरली आहे हे स्पष्ट होते.

भारतात कूपोषणाचे प्रमाण ४५.९ प्रतिशत असणे ही देशासाठी गंभीर बाब आहे कारण मानवी निकास कार्यक्रमाचे हे सर्वात मोठे अपयश आहे असेच म्हणावे लागेल. राज्य निहाय विचार केल्यांस, देशातील ४ राज्यात ५० प्रतिशत पेक्षा जास्त कूपोषण असल्याचे स्पष्ट होते ज्यामध्ये- मध्यप्रदेश-६०.३ प्रतिशत, झारखंड-५९.२ प्रतिशत, बिहार -५८.४ प्रतिशत, छत्तीसगड-५२.१ प्रतिशत, गुजरात -४७.४ प्रतिशत, उत्तरप्रदेश-४७.३ प्रतिशत, उडिसा व राजस्थान प्रत्येकी - ४४ प्रतिशत, आणि पं. बंगाल-४३.५ प्रतिशत असल्याचे दिसून येते यावरुन मानव विकास निर्देशांकातील (जागतिक स्तर) आपले स्थान खालच्या पातळीवर असल्याचे स्पष्ट होते या वरुन भारताचे दुर्देव असे की स्वातंत्र्य प्राप्तीला ७० वर्ष पूर्ण होऊनही आपण उपोषणाच्या बाबतीत सपसेल अपयशी असल्याचे दिसून येते.

पिण्यायोग्य पाण्याचा कुंटूंब निहाय विचार केल्यास आजूनही भारतात-२२ प्रतिशत कूंटूंबांना शुध्द पाणी उपलब्ध होऊ शकलेले नाही असेच दिसते राज्यनिहाय विचार केल्यास पिण्यायोंग्य पाणी उपलब्धता नसलेले राज्य (२००१ नूसार) केरळ-७६.३ प्रतिशत, झारखंड-५७.४ प्रतिशत, आसाम-४१.२ प्रतिशत कूंटूंब उडीसा-३५.८ प्रतिशत कूंटूंब, राज्यस्थान-३१.८ प्रतिशत कुंटूंबाना व मंध्येप्रदेश-३१.६ प्रतिशत कुंटूंबांना २००१ च्या जनगननेनुसार पिण्यायोंग्य पाण्याची उपलब्धता होत नव्हती असे चित्र आहे.

देशात शौचालय सुविधा उपलब्ध नसलेल्या कुटूंबाचे प्रमाण प्रचंड म्हणजे-५५.५ प्रतिशत-आहे. म्हणजे अजूनही पादन मुक्त अभियाणात आपण फार मागासलेले आहोत असे ग्रामीण भागाचे चित्र स्पष्ट

होते. राज्यनिहाय विचार केल्यास २००४-०५ मध्ये छत्तीसगड-८१.३ प्रतिशत कूंटूबे, झारखंड ७७.४ प्रतिशत, बिहार, ७४.८ प्रतिशत, कुटुंबे मध्येप्रदेश-७३ प्रतिशत, कुंटूंबे उडीसा -८०.७ प्रतिशत कुंटूंबे, राज्यस्थान-६९.२ प्रतिशत कुंटूंबे उघड्यावर शौचास जातात. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोणातुन ही स्थिती फारच अपायकारक व रोगराईस आमत्रण देणारी आहे म्हणून ह्या सुवीधेत वाढ करण्याची नितांत गरज आहे.

**वैश्विक पाणी व स्वच्छता :**

२००६ च्या मानव विकास अहवाल एका अशा मुद्यावर भर देतो की मानवी क्षमता आणि या शतकातील विकासाचे लक्षावर विशेष प्रभाव पाडतो मनुष्याच्या प्रगतीची पोहोच केवल साफ पाण्यापर्यंत सिमित असून एक उत्पादक संसाधन म्हणून पाण्याची उपलब्धता करुन घेण्याची क्षमता समाजावर अवलंबून असते एक म्हणजे जीवन जगण्यासाठी पाणी व दुसरे म्हणजे उत्पादनाच्या माध्यमातून जीवनमाना करीता पाणी, हे मावन विकासाचे दोन आधार आहेत विकासाच्या बाबत कधी कधी या संकटाला आपण सहज मनतों परंतु आता मान्य झाले आहे की जेव्हा पाण्याचा विषय येतो तेव्हा समस्त संसारापुढे असे संकट उभे राहते की ज्याचा आपण सामना करु न शकल्यास या शतकातील विकासाची लक्ष पार करणे तर दुरच पण मानवी विकासच ठप्प होऊन जाईल अशी शक्यता आहे.

काही लोकांकरीता वैश्विक जल संकट म्हणजे वास्तव उपलब्ध पाण्याची कमतरता होय परंतु या अहवालात या बाबीला नाकारले आहे आणि आपल्या अहवालात पाणीं संकटाची मुळे ही गरीबी, असमानता, व असमान सत्ता संबंधा बरोबरच दोषपूर्ण जल व्यवस्थापन धोरणात दडलेली आहेत. जे की या संकटांना सतत खतपाणी घालत आहेत.

मानवी जीवणाकरीता पाण्याची प्राप्ती ही मूलभूत गरज आहे तसाच तो मानवी अधिकार आहे परंतु आमच्या निरंत्तर समृध्द होत असलेल्या विश्वासामध्ये १ अरब लोकांना शुध्द पाण्याचा अधिकार प्राप्त होत नाही, तसेच २.६ अरप जनतेला पर्याप्त स्वच्छता उपलब्ध नाही. हे आकडे समस्याच्या केवळ एकाच पैलुसी संबंधीत आहे.दरवर्षी असुध्द पाणी आणि अस्वच्छतेमूळे जगात जवळपास १८ लाख बालकांचा मृत्यु होतो. २१ व्या शतकाच्या आरंभी अशुध्द पाण्यामुळे मृत्यु पावणाऱ्या मुलांचे हे दुसरे सर्वात मोठे कारण ठरले आहे.

दररोज लाखो स्त्रिया व मुली आपल्या कुंटूंबासाठी पाणी आणतात ही पध्दत रोजगार आणि शिक्षणातील स्त्री-पुरुष असमानतेला अधिक मजबूत करीत आहे. दुसऱ्या बाजुने पाणी आणि स्वच्छताची कमी अस्वस्थता, उत्पादकता आणि आर्थिक वृधीला याला हाणीकारक असून जागतिकीकरणाच्या प्रचलित प्रारुपाकरीता वैशिष्ट्य बणून गंभीर होत असलेल्या मानवी असमानतेला चालना देऊन दूर्बल परीवाराला दारिद्रयाच्या दृष्ट चक्रात अडकवत आहे.

या अहवालानूसार या विविध समस्याचे स्त्रोत प्रत्येक देशात अलग अलग आहेत. १) देशाचे मर्यादीत बजट, ज्यामुळे पाणी व स्वच्छता यांना दुय्यम राजनितीक प्राथमिकता देतात (२) विश्वातील सर्वात गरीब लोकांपैकी काही लोक पाण्या करीता सर्वाधिक किमत चूकवतात, गरीब जनता जेथे राहते त्या मागास व अनौपचारीक वस्त्यात पाण्याची उपलब्धता दूर्मीळ असेत. (३) २१ व्या शतकाचे लक्ष्याच्या प्रतिपुर्ती करीता निर्मित व विकास संबधी भागीदारीमध्ये पाणी व स्वच्छतेला प्राथमिकता देण्याबाबत जागतिक समुदाय अपयशी ठरला आहे. या सर्व समस्या बाबतीत

एक तथ्य समोर आले ते म्हणजे पाणी व स्वच्छतेबाबत सर्वाधिक पिडीत जनता आहे. ज्यामध्ये गरीब आणि विशेषत गरीब स्त्रियापासी आपला दावा ठाम व स्पष्टपणे मांडण्यासाठी लायक असे राजनितीक प्रतिनिधीत्व किंवा स्वर नाही. प्रस्तुत मुद्द्यांची सावधानी पूर्वक पडताळ केली गेली, संबंधीत आव्हाने भयभीत करणारे आहेत. परंतू लेखन व पडताळणी करणारे तज्ञ मंडळी हताश न होता आम्ही ही लढाई जींकू असा विश्वास व्यक्त करतात. स्वच्छ पाणी व स्वच्छता उपलब्ध करुन देण्याबाबत अनेक देशांनी अभूतपूर्ण प्रगती केलेली आहे. विकसनशील व गरीब देश आपली समस्या निवारणार्थ संसांधनाची जुळवाजुळव करीत आहेत त्यानूसार २१व्या शतकात सुरुवातीला या देशाजवळ वित्त प्रोद्योगिकी, पाणी, व स्वच्छता या संकटाला इतिहास जमा करु अशी क्षमता आहे. जसे की एक सदी पहीले आजच्या समृध्द देशांनी केलें होते. कमी असेल ती फक्त राजनयीक संकल्प प्रोत्साहीत करण्याची व संसाधनाची जुळवाजुळव करण्याची एका अर्थाने वैश्विक कार्य योजनेद्वारे समर्थनिय सुकल्पीत व नियोजीत पर्याप्त वित्ताद्वारे, राष्ट्रीय योजनेद्वारे सर्वांसाठी पाणी आणि स्वच्छता उपलब्ध करणे.

वास्तविक हे एक असे संकट आहे. जे मानवी प्रगतिला प्रतिबंध करते, व बहूसंख्य लोकांना गरीबी आणि असुरक्षित जीवन जगण्यास मजबूर करते.

**संदर्भ :**


१) अर्थमिमांसा (जुलै -डिसे. २०१५) खंड ८, अंक-२ विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची संशोधन पात्रिका. पृष्ठ- १-३

2) Human Development Report -2006. Page - 5-7

3) Global Economic Research (Journal) March -2015. Page - 51-52

४) आर्थिक समिक्षा - २००८-०९.

५) महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल- २००२.

6) Human Development Report -2002


❑❑❑

Chapter in book

# समकालीन प्रश्न आणि भारतीय लोकशाही

## मुख्य संपादक


**संदीप तुंडूरवार**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

**डॉ. रतन राठोड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला


## सहसंपादक


**डॉ. अमर बोन्द्रे**
राज्यशास्त्र विभाग,
व्ही.एम.व्ही. महाविद्यालय,
नागपूर

**डॉ. संजय नाकाडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगांव,
जि. चंद्रपूर

**डॉ. दिनकर चौधरी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी,
जि. चंद्रपूर

**डॉ. बाळासाहेब जोगदंड**
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
अकोला

# पूर्व विदर्भातील नक्षलवादी चळवळः कारण व परिणाम

डॉ. साधना देशमुख,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय,अमरावती

उगम :

'नक्षलवाद' या संकल्पनेला भारतीय सामाजिक चळवळींच्या इतिहासात एक विशेष अर्थ आहे. नक्षलवादी आंदोलन गेल्या सदतीस वर्षात कधी गनिमी पध्दतीने, तर कधी आक्रमकपणे भारतीय राजकारणात आणि समाजकारणात चर्चेचे केंद्र बनले आहे.

सामाजिक चळवळींचा संबंध सामाजिक बदल अथवा सामाजिक चौकटीशी आहे. या चळवळी किंवा आंदोलने सामाजिक परिवर्तनासाठी किंवा परिवर्तनविरोधी असू शकतात. पण प्रचलित समाजव्यवस्थेत बद्दल घडवुन आणणारी चळवळ म्हणजे सामाजिक आंदोलन, असे जवळपास सर्वच अभ्यासकाचे मत बनलेले आहे. सामाजिक चळवळी या सामाजिक रचनेतून अथवा त्या रचनेच्या काही वैशिष्ट्यांतून निर्माण होतात. दुसऱ्या शब्दात, समाजरचनेत घडून येणाऱ्या स्थित्यंतरांना प्रतिसाद म्हणून काही सामाजिक चळवळी उद्यास येतात. आणि त्याचा परिणाम म्हणून समाजरचनेत बदल घडून येत असतो. अशाप्रकारे सामाजिक परिवर्तन आणि चळवळी यांचा जवळचा संबंध असतो.

१९६७ मध्ये पश्चिम बंगालच्या नक्षलबाडी गावास एक स्वयंस्फूर्त किसान आंदोलन सुरु झाले. स्वातंत्र्यपूर्व काळातही बंगालमध्ये बटाईदारांना कुळांचे अधिकार आणि संरक्षण मिळवुन देण्यासाठी सन १९४६-४७ मध्ये 'तेभाग' हे आंदोलन झाले होते. कम्युनिस्ट चळवळीच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या या आंदोलनाने उग्र रुप धारण केले होते. परंतु स्वातंत्र्यप्राप्ती आणि त्यासोबत आलेल्या विभाजनातून बंगालमध्ये जातीय दंगली आणि राजकारण उसळले. त्यानंतरच्या राजकीय घडामोडी आणि पक्षीय राजकारणात विकासाचे अग्रक्रम बदलले आणि बटाईदारांचा दशकानुदशके प्रलंबित असलेला प्रश्न राज्यकर्त्यांच्या दृष्टीआड झाला. त्याचाच परिणाम नक्षलवादी चळवळ सुरु होण्यात झाला.

१९६७ पासून भारताच्या राजकीय सामाजिक क्षेत्रात नक्षलवाद हा शब्द प्रचलित झाला. अल्प काळातच नक्षलवादी आंदोलन भारतामध्ये बिहार, आंध्र, महाराष्ट्र, ओरिसा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, पंजाब इत्यादी राज्यात या आंदोलनाचा विस्तार झाला. या चळवळीचे स्वरुप अखिल भारतीय स्वरुपाचे नसले तरी हे आंदोलन नगण्य तर नाहीच, पण राजकीय आणि राष्ट्रीय क्षेत्रात एक नवे आव्हान म्हणून त्या लढयाला निश्चितच महत्त्व प्राप्त झाले आहे. संरजामशाही, वसाहतवाद, साम्राज्यवाद ह्या विरुध्द लढणारा आदिवासी आज देशी वसाहतवादाचा बळी ठरलेला आहे. परंपरागत जगण्याचे साधन असलेल्या जंगल-जमिनीवर शासकीय जमीनदारी विकासाच्या नावाखाली प्रस्थापित झालेली आहे. विकासाच्या नावाखाली विस्थापन, मजुरीच्या नावाखाली वेढबिगारी व सुधारणेच्या नावाखाली मानसिक गुलामी लादली जात आहे.

नक्षलवादाचा पूर्वइतिहास १९६२ साली झालेल्या भारत-चीन युध्दाच्या पार्श्वभूमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्षात मोठी फूट पडली. त्यातून भारतीय कम्युनिस्ट पक्ष 'सी.पी.आय' आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष **'मार्क्सवादी'** (C.P.I.M.) असे दोन गट उद्याला आले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे मवाळ धोरण पक्षातीलच एका मोठया गटाला मान्य नव्हते. आंध्र प्रदेशातील पक्ष अधिवेशनात त्याचा पुढे स्फोट झाला. पक्षनेतृत्वाने जहाल गटाचे म्हणणे फेटाळले. त्याचाच परिणाम म्हणजेच ज्योती बसू, रणदिवे वगैरेंनी पक्ष सोडला आणि **'मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष'** या नावाचा अधिक कडवा पक्ष काढला.

या नव्या पक्षाने १९६७ च्या निवडणुकीत भाग घेतला. 'बांगला काँग्रेस' या काँग्रेसमधील फुटीर गटाशी हात मिळवणी करुन हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सत्तेवर देखील आला. तेव्हा 'क्रांतीचा मार्ग टाकून संसदीय मार्ग स्वीकारलात काय?' असा प्रश्न या पक्षातील तरुण विचारु लागले.

'आता कुठे गेली तुमची क्रांतीवरील निष्ठा' असा रास्त प्रश्न विचारत चारु मजुमदार, कानु सन्यांल, विनोद मिश्रा, महादेव मुखर्जी वगैरेंनी पक्ष सोडला आणि नव्या माओवादी **'लेनिनवादी'** पक्षाची घोषणा केली. या पक्षातून निर्माण झालेली चळवळ पुढे **'नक्षल चळवळ'** म्हणून नावारुपाला आली.

आमचा पक्ष आणि पक्षाची चळवळ क्रांतीशी एकनिष्ठ आहे हे सिध्द करण्याची या पक्षाला इतकी घाई झाली होती की, त्यांनी पक्ष स्थापन झाल्याबरोबर पश्चिम बंगालमध्ये सरळ क्रांतीची घोषणाच केली. ही क्रांती अर्थात सशस्त्र होती, परंतु अशा प्रकारच्या उठावाला जी पुर्वतयारी लागते तिचा संपूर्ण अभाव त्यावेळी होता. या अचानक पुकारलेल्या क्रांतीने बंगालमधील कम्युनिस्ट वर्चस्वाचे आणि भारतातील पहिले बिगर काँग्रेस सरकार कोंडीत सापडले. हे बंड दडपले असते तर सरकार भांडवलशाहीचे हस्तक झाले असून क्रांतीशी गद्दारी करत आहे, असा या नव्या पक्षाचा आरोप खरा ठरला असता. दुसरे, शासनकर्ते या नात्याने सरकारला चूपचाप राहता येत नव्हते. राज्य शासनाच्या या द्विधा मन:स्थितीचा पुरेपुर फायदा या नव्या पक्षाने घेतला. राज्याचे गृहमंत्री ज्योती बसू यांच्याकडून या पक्षाने अभय मिळविले. अवघड जागी दुखणे असल्यामुळे शासनाकडे दुसरा पर्यायही ठरला नव्हता. या नव्या क्रांतीकारी पक्षाचे केंद्र उत्तर बंगालमधील 'नक्षलबाडी' क्षेत्रात होते. त्यावरुनच पुढे या दहशतवादी गटाला 'नक्षलवादी' गट म्हणून संबोधले व ओळखल्या जाऊ लागले. भारतासारख्या विशाल देशाच्या एका कोपऱ्यात एका ग्रामीण भागात, वरवर पाहता अनपेक्षित आणि राष्ट्रीय प्रवाहापासून अलिप्त असे, हे 'माओवाद्याच्या नेतृत्त्वाखालील किसान

आंदोलन' होते. नक्षलवाद या नावाला तसा काही तात्विक अर्थ नव्हता. परंतु नक्षलवाद्यांच्या या लढ्याला अन्याय, जुलूम, शोषणाविरुध्दचा सशस्त्र लढा असे रुप मिळाले. त्यातून जुलमी जमीनदार, निष्क्रिय राज्यकर्ते, भ्रष्ट शासकीय अधिकारी व पोलीस अशा लोकांच्या हत्या या जहाल गटाकडून केल्या जाऊ लागल्या व दहशतीचे नवे दालन या चळवळीने प्रस्थापित केले.

इ.स. १९७९ मध्ये तेलंगाणामधुन नक्षलवादी गट त्यांच्या १०-१२ साथीदारासह आदिवासी भागातील सर्वेक्षणासाठी सिरोंचा तालुक्यातील आदिवासी भागात दाखल झाले. अशिक्षीत, अज्ञानी आणि दारिद्री आदिवासींच्या दुःखात हे गट सहभागी झाले. त्यांच असे लक्षात आले की, इथल्या, शेतमजुराला मिळणारी मजुरी ही फारच कमी आहे. त्यामुळे त्यांचे राहणीमान अगदीच हलाखीचे झाले आहे. म्हणून एकदा का त्यांना मजूरी वाढवून दिल की, हा सगळा भाग आपल्या ताब्यात येऊ शकतो, असा साधा सोपा विचार नक्षलवादयांनी केला आणि व्यापक जनसंपर्काचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. त्यांना जातीची, भाषेची, राज्याची कशाचाही अडचण आली नाही.

### आदिवासी मजुरांच्या प्रस्थापित शोषणाविरूध्द नक्षलवादयांचा लढा

### तेंदूपाने खुडण्याची मजूरी

नक्षलवादयांनी प्रथम तेंदू पानांच्या संकलनातील लुटीवर लक्ष केंद्रीत केले गावोगाव सभा सुरु केल्या. आंदोलनाचा मार्ग ठरला. सर्वांनी प्रथम बहिष्कार टाकला. मागणी साधी होती. साडेचार रुपयांची बारा रुपये मिळाली पाहिजे. आणि मापात पाप नको. काम रोकून धरले. सिरोंचा परिसरातील आदिवासींचा हा पहिला लढा यशस्वी झाल. पिढयानं पिढयंच्या लुटीचा अर्थ आदिवासींना समझला. संघटनेची ताकद सिरोंच्यातील वणवा सर्वत्र पेटू लागला. १९८०-८४ या अल्पकाळात मजूरी ६ पासून १८ पर्यंत जाऊन पोहोचली.

### बांबु संकलनाचा प्रश्न

या भागातील दुसरा प्रश्न बांबु संकलनाचा या भागात मौलोगणती बांबुच्या बेटे आहेत. आल्लापल्ली परिसरातील बांबुमध्ये तगद्याचे प्रमाण ५५ टक्के आहेत तर अन्यत्र ३५ ते ४० टक्के आहे. चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यात बल्लारपूर पेपर मिळत आणि वनखाते बांबुची तोडणी करतात. पेपर मिलला नाममात्र रॉयल्टी आकारली जाते, या भागातील कामगारांना नक्षवाद्यांनी अर्थशास्त्राचे धडे दिले. आदिवासींना लुट लक्षात आली. संपाचे हत्यार उपसले. सतत तीन महिने काम बंद अखेर तडजोड मजूरीत वाढ. मागीतली व दरवर्षी मजूरीत वाढ होत गेली.

### हिंसावादी आणि सशस्त्र क्रांती मुक्तीचा आभास

या भागात स्थानिक आदिवासींचा नक्षलवादांचा धाक आहे. पिढयानपिढयांच्या अन्याय अत्याचारातून नक्षलवाद्यांनीच आपल्याला मुक्तता मिळवून दिल्याची आदिवासींची भावना आहे. नक्षलवादी दहशतवादामुळे आदिवासी बोलत नाही असा सरकारी प्रचार असत्य आहे. आज तरी या भागातील नक्षलवादी कार्यकर्ताबद्दल स्थानिक आदिवासींची तक्रार नाही. उलटपक्षी स्थानिक आदिवासींना नक्षलवादी म्हणजे कधीही अनुभवायला व उपभोगायला न मिळालेले स्वातंत्र्य मिळवुन देणारे मुक्तिदाते वाटतात. त्यांना ते आपलेसे वाटतात.

**उपाय**

आदिवासींच्या शोषण मुक्तीबरोबरच विकासासाठी काम करणाऱ्या विधायक संस्थांचे सहाय्य घ्यावे लागेल. त्यांना प्रोत्साहन द्यावे लागेल आणि हा प्रश्न कायमचा संपविण्यासाठी प्रथम प्रस्थापितांकडून होणारे शोषण संपवावे लागेल. अन्यथा अत्याचाराविरुध्द कठोर पावले उचलावी लागतील. दारिद्रय आणि अज्ञान याविरुध्द लढावे लागेल आणि विकासाचा कालबद्द कार्यक्रम राबवावा लागेल. चंद्रपूर, गडचिरोली येथील नक्षलवादी कारवाया जर बंदुकीच्या बळावर पूर्णत बंद पाडता येणार नसेल, तरी काही काळ बंदुक वापरावीच लागेल. पोलीसांना प्रशिक्षण देतांना बंदुकीचा वापर आदिवासी विरुध्द नव्हे, हे ठसवावे लागेल. पोलीसांशिवाय तेथे जाणारे अधिकारी, कमचारी, प्रशिक्षीत संवेदनाक्षम आणि स्वच्छ मताचे असावेत. त्यांची विशेष काळजी घ्यावी लागेल. त्यामुळे एका बाजुने दीलर्घकालीन विकास व समृध्दीची योजना आणि दुसऱ्या बाजुला सक्षम, प्रशिक्षित मनगटाच्या हाती बंदुकी या मार्गाने या प्रश्नाचा मुकाबला करावा लागेल.

'बंदुक वापरायची जरी आणि फावडे चालवायचे तरी', एकुण आदिवासींचा इतिहास, भूगोल, मनोभूमिका समजून घेऊन त्यांचा विश्वास संपादन करुन तसेच त्यांना तारणहार वाटणाच्या नक्षलवाद्यांचे तंत्र, मंत्र रणनीती ओळखूनच त्यांच्याशी लढावे लागणार आहे.

गरीब हे सहसा कधी संघटीत होत नाहीत. परंतू जेव्हा समाजामध्ये गरीबांची संख्या वाढायला लागेल. तेव्हा जगण्याच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी अन्यायग्रस्त, शोषित व दारिद्रयाने गांजलेले जेव्हा संघटीत होतील, तेव्हा होणारा उद्रेक देखील फार मोठा असेल तो टाळण्यासाठी आताच पावले उचलणे आवश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

१) डॉ. गारे गोविंद, नक्षलवादी आणि आदिवासी, युगांदा प्रकाशन पुणे.
२) मडावी एल.के., पताना, नागपूर.
३) कोळणकर प्रकाश, नक्षलनामा, मोटया प्रकाशन, डोंबिवली.
४) डोंगरे, मा. ग. वेध नक्षलवादी चळवळीचा, भारतीय श्रमशोष मंडळ, पुणे.
५) डॉ. गारे, आदिवासींच्या समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन पुणे.
६) ॲड मोरे माधव बंडू, आदिवासी बोलू लागला, सुगावा प्रकाशन पुणे.

★★★

महाराष्ट्र शासन


# Govt. Vidharbha Institute of Science & Humanities, Amravati.

ICSSR Govt. of India Sponsored One Day Interdisciplinary National Conference

7th October 2017

# VIDARBHA AFTER INDEPENDENCE

# स्वातंत्र्योत्तर विदर्भाची वाटचाल




## PROCEEDINGS

ISBN NO. 978-93-83810-96-3

**Editorial Board**

**Dr. G. S. Mahadik**
**Dr. Nalini K. Tembhekar**
**Dr. S. G. Satbhai**
**Dr. B. R. Maske**
**Prof. H. D. Dalavi**

Organised by
Department of History,
G.V.I.S.H., Amravati.

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | विदर्भाच्या इतिहासात वाकाटक घराण्याचे योगदान - एक ऐतिहासिक अध्ययन | श्री. किरण देविदासराव डेहणकर | ८८ |
| ३३ | विदर्भातील आधुनिक महान संत : गाडगे बाबा | विक्रम भ. ठाकरे | ९० |
| ३४ | संत गाडगे बाबांचा मानव धर्म | प्रा. अनिल ठाकरे | ९२ |
| ३५ | विदर्भाच्या भौगोलिक ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अध्ययन | डॉ. आशिष काळे | ९५ |
| ३६ | विदर्भातील परिवर्तवादी सामाजिक चळवळी | डॉ. वामन गवई | १०० |
| ३७ | महाराष्ट्र राज्यापुढील नक्षलवाद आव्हान आणि आहावन | डॉ. उमेश आर. धुमाळे | १०४ |
| ३८ | "स्वातंत्र्योत्तरकालीन विदर्भातील कृषी विषयक समस्या व चळवळी" | गोपाल पां. सामृतवार | १०६ |
| ३९ | विदर्भ दशा व दिशा | प्रा. विजय आठवले | १०८ |
| ४० | विदर्भातील संताचे योगदान | दिवाकर भिमराव पेठे | ११० |
| ४१ | विदर्भातील पर्यटन | दिपा रुपलाल मेटकर | ११३ |
| ४२ | नागपूर करार ते संयुक्त महाराष्ट्र - श्री यशवंतराव चव्हाण यांची भूमिका | श्रीनिवास सातभाई | ११५ |
| ४३ | पश्चिम विदर्भातील दलितांची जागृती | प्रा. डी. डी. जोंधळे | १२० |
| ४४ | विदर्भातील स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक क्षेत्रातील आयोगांच्या माध्यमातून झालेला विकास | डॉ. पी. डी. टिपरे | १२२ |
| ४५ | विदर्भाच्या अनुशेषाचा प्रश्न | डॉ. साधना भाऊराव देशमुख | १२४ |
| ४६ | विदर्भाचे ऐतिहासीक अध्ययन | अनंत रतनलाल राठोड | १२९ |
| ४७ | विदर्भातील नक्षलवादाची समस्या | डॉ. अनंत आवटी, | १३३ |
| ४८ | दीक्षाभूमी : सामाजिक परिवर्तनाची भूमी | डॉ. सूर्यकांत महादेवराव कापशीकर | १३८ |
| ४९ | विदर्भातील सामाजिक व राजकीय नेतृत्त्व : डॉ. पंजाबराव देशमुख | कु. सविता घरजारे | १४१ |
| ५० | विदर्भातील ऐतिहासीक पर्यटनस्थळ चिखलदरा | डॉ. व्हि. जि. वसु | १४३ |
| ५१ | विदर्भातील नक्षलवादी समस्या | डॉ. निलीमा विजयराव दवने | १४६ |
| ५२ | एक जाणते लोकशिक्षक : संत गाडगे महाराज | डॉ. कैलाश मारोती फुलमाळी | १४९ |
| ५३ | स्वच्छतेचे अग्रदुत कर्मयोगी संत गाडगेबाबा | प्रा. डॉ. राजु खरडे | १५१ |
| ५४ | विदर्भातील संत परंपरा आणि त्यांचे समाजकार्य | प्रा. प्रशांत रा. देशमुख | १५३ |
| ५५ | स्वातंत्र्योत्तर कालीन विदर्भातील राजकीय व सामाजिक नेतृत्त्व - ॲड. वसंतराव नाईक | डॉ. ए. डी. जाधव | १५६ |
| ५६ | संत गाडगेबाबा यांचे आर्थिक विचार | डॉ. हरिहर शिवदास मोहोकार | १५९ |
| ५७ | विदर्भातील संत परंपरा | प्रा. लक्ष्मण एफ. शिराळे | १६१ |
| ५८ | विदर्भातील अनुशेषाचा प्रश्न | प्रा. डॉ. मनोज श्रीकृष्णराव पवार<br>प्रा. डॉ. निलेश | १६५ |

# विदर्भाच्या अनुशेषाचा प्रश्न

**डॉ. साधना भाऊराव देशमुख**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

भाषावार प्रांतरचनेत मुंबई या औद्योगिक-व्यापारी महानगरावर कोणाचा ताबा असावा हा वादाचा मुद्दा होता. भांडवलाच्या आधारावर गुजरातने व बहुसंख्य मराठी लोकांच्या आधारे महाराष्ट्राने त्यावर आपला अधिकार सांगितला. शेवटी १९५६ मध्ये दोन्ही भाषांचे मुंबई राज्य केले गेले. हे पश्चिम महाराष्ट्राच्या जनतेला रुचले नाही. महाराष्ट्रातच हवी आणि विदर्भात (त्याकाळी) काँग्रेसचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणावर निवडुन येत, त्यांची ताकद जोडल्याशिवाय नव्या महाराष्ट्रात काँग्रेसची सत्ता येऊ शकणार नाही म्हणून विदर्भ महाराष्ट्रात सामील करा असा पश्चिम महाराष्ट्राकडून दबाव पंडित नेहरुंवर आला होता. त्या दबावात विदर्भाची इच्छा नसतांना सुध्दा काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने विदर्भाला १ मे १९६० रोजी महाराष्ट्रात सामील करण्यात आले.

**अकोला करार :-** दार कमिशनपुढे एकभाषीक घटकराज्याची मागणी एकमुखाने मांडता येईल याचा विचार करण्यासाठी अकोला येथे निवडक कार्यकर्त्यांची बैठक झाली. त्यालाच अकोला करार असे म्हणतात.

संयुक्त महाराष्ट्र परिषदेत महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना सामील करून घेण्यात आले असले तरी शंकरराव देव हे परिषदेचे अध्यक्ष बनल्याने तिची सुत्रे मात्र काँग्रेस पक्षाच्या नेत्यांच्या हातीच राहिली. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भाई श्री अ. डांगे यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषद भरीव स्वरुपाची कोणतीही कृती करू शकणार नाही कारण काँग्रेस श्रेष्ठींना विरोधात जाण्याची हिंमत महाराष्ट्रातील काँग्रेस नेते दाखविणार नाहीत असे मत सुरुवातीला व्यक्त केले होते.

श्री अणे, धनंजय गाडगीळ, रामराव देशमुख, ग. त्र्यं. माडखोलकर वगैरे प्रमुख व्यक्तींनी अकोला कराराची कलमे निश्चित केली.

१) संयुक्त महाराष्ट्राचा एक प्रांत असावा त्यात मध्यप्रांत, वऱ्हाड, मराठी भाविक व महाराष्ट्र असे उपप्रांत असावेत.
२) या उपप्रांतांना अलग कायदेमंडळ व मंत्रिमंडळ असावे काही विशिष्ट कामे त्यांच्याकडे सोपवावीत.
३) संबंध प्रांतासाठी एक गव्हर्नर व एक डेप्युटी गव्हर्नर असावा. त्यांची निवड संबंध प्रांतामधून व्हावी.
४) कायदेमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी असावेत.
५) उपप्रांताच्या निवडणुका अलग-अलग घ्याव्यात.
६) उपप्रांताची उच्च न्यायालये वेगळी असावीत आणि विशिष्ट बाबींसाठी सर्व प्रांतांना खास ट्रिब्युनल असावे.
७) संबंध प्रांतासाठी एक पब्लिक सर्व्हिस कमिशन असावे.

वरील कराराप्रमाणे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यात यावी. जर ते अशक्य वाटत असेल तर 'महाविदर्भ' हा स्वतंत्र प्रांत निर्माण व्हावा असाही एक ठराव पास केला.

'अकोला करार' करण्यापुर्वी ब्रिजलाल बियाणी (विदर्भ नेते) यांनी स्वतंत्र विदर्भाची मागणी केली होती आणि १५ ऑगस्ट १९४७ पुर्वी ती मान्य झाली नाही तर पहिल्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकुन वऱ्हाड म्हणजे विदर्भ स्वतंत्र झाल्याची घोषणा करण्याची धमकी दिली की, 'स्वतंत्र वऱ्हाडाच्या समितीचे अध्यक्ष या नात्याने भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाच्या समारंभावर बहिष्कार घालण्याचा आणि वऱ्हाडचे स्वातंत्र्य जाहीर करण्याचा आपला इरादा असल्याचे कळले व त्याचा त्वरित खुलासा करावा. माझ्याशी आधी विचार विनिमय केल्याखेरीज कोणतेही पाऊल स्वतंत्ररित्या उचलू नये. . . तुम्ही ताबडतोब दिल्लीत यावे असे सुचवावेसे वाटते. " सरदार पटेलांच्या तंबीमुळे बियाणींनी बहिष्काराचा कार्यक्रम रद्द केला.

**नागपूर करार (२८ सप्टेंबर १९५३) :-**

२६ जानेवारी १९५० रोजी घटना लागु झाली याचवेळी भाषिक राज्याचे घोषणा होईल असे आंध्र लोकांना वाटत होते पण त्यांचा भ्रमनिराश झाला ते संघ राज्यातुन फुटुन निघण्याची सुध्दा भाषा करू लागले. के. टी. प्रकशन यांनी लोकांची समजूत काढली, परंतु दोन वर्षे लोटली तेव्हा पोट्टी रामल्लु यांनी मरेपर्यंत उपोषण सुरु केले. पण त्यात त्यांचा अंत झाला सर्वत्र संतापाचा आगडोंब उसळला. कर्नाटकातही संतापाची लाट आली. महाराष्ट्रात असे काही घडले नाही कारण विखुरलेला संतापाला एकसंघ करणारी संघटना येथे नव्हती.

१९५० साली कोल्हापूर अधिवेशन भरले त्यात 'जे कोणी महाराष्ट्रभिमानी आहेत त्या सर्वांची एक संयुक्त आघाडी निर्माण झाली पाहिजे ही कल्पना मान्य करण्यात आली होती. ' १९५३ मध्ये आंध्र प्रदेशाची निर्मिती होऊन पुन्हा भाषावार राज्य रचनेच्या प्रश्नासाठी पुन्हा चौकशी आयोग नेमणार असल्याची बातमी आली तेव्हा महाराष्ट्रीयन नेते सतर्क झाले. १९५३ च्या बेळगावच्या सभेत पंडित नेहरु म्हणाले, "आंध्र प्रदेशात वर्षभर सुरळीत कारभार चालला तर अन्य प्रांताचाही विचार करू. " अगोदर आपसात मतैक्य करा असेही त्यांनी सुचविले होते. एकंदरीत एक उच्चाधिकार कमिशन नेमून कार्य पार पाडण्याची चिन्हे

दिसत होती. त्यामुळे नव्या जोमाने मराठी नेते एकत्र आले. अकोला करार रद्द करून त्याच्याऐवजी संयुक्त महाराष्ट्रात येऊ पाहणाऱ्या विभागांना समान दर्जा देणारा 'नागपूर करार' करण्यात आला.

१) सध्याच्या मुंबई, मध्य प्रदेश हैद्राबाद राज्यामधील मराठी भाषिक प्रदेशांचे मिळून हे राज्य स्थापन केले जावे. या राज्याच्या सिमेत व मर्यादेत कोणत्याची भागाचे वेगळे अस्तित्व राहू नये व त्या राज्याला महाराष्ट्र किंवा मराठी प्रदेश म्हटले जाईल आणि मुंबई ही त्याची राजधानी असेल.

२) सर्व प्रकारचे विकासकार्य व शासनव्यवस्था यांच्याबाबतीत या राज्याचे महाविदर्भ, मराठवाडा व उर्वरित भाग असे तीन घटक मानले जातील.

३) शासन एकच राहणार असल्याने त्यांच्या आवश्यकता लक्षात घेऊन निरनिराळया घटकांवरील खर्च लोकसंख्येच्या प्रमाणात केला जाईल. मराठवाड्यांची अवस्था अविकसित असल्यामुळे त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याकडे विशेष लक्ष दिले जाईल. या संबंधात एक अहवाल दरवर्षी विधानसभेला सादर होईल.

४) धंदे, व्यवसाय, औद्योगिक, वैज्ञानिक, व इतर खास प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांत प्रवेश देताना या विभागाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य व समान संधी उपलब्ध करून देण्याची हमी देण्यात येईल.

५) मुंबई येथे उच्च न्यायालय असेल व दुसरे पीठ नागपूर येथे राहील. नोकरवर्ग यांच्याबाबतीत योग्य प्रतिनिधीत्व मिळेल व हीच बाब मराठवाड्यालाही लागू राहील.

६) शासकीय नोकऱ्या किंवा सरकार नियंत्रित व्यवसायात नोकरांची भरती करतांना प्रत्येक घटकातून संख्येच्या प्रमाणात ही भरती केली जाईल.

७) विदर्भातील लोकांचा नागपूरशी 'राजधानी' म्हणून जुना संबंध आहे. त्या संदर्भातील फायदे शक्य तितके जपले जातील. विधानसभेचे वर्षातील एक अधिवेशन नागपूरमध्ये घेतले जाईल व निश्चित काळासाठी सरकार तेथे हलविले जाईल.

८) सर्व मराठी भाषीकांना राज्यात सामावून घेण्यासाठी खेडे हा घटक धरून ताज्या जनगणनेनुसार जिल्ह्यांच्या सीमा ठरविल्या जातील इत्यादी मुख्य तरतुदी ठरविल्या गेल्या.

वरील करारावर रामराव देशमुख, आर. के. पाटील, भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नाना कुंटे, देवकीनंदन नारायण, देवीसिंग चौहान, प्रभावती देवी जकातदार वगैरे प्रमुख पुढाऱ्यांच्या सह्या झाल्या. विशेष म्हणजे हे सर्वजण काँग्रेसवासी होते या करारावर शंकरराव देव, स्वामी रामानंद तीर्थ वगैरेनी सह्या केल्या नाहीत. या कराराचे राज्यभर स्वागत झाले. अपवाद फक्त सदोबा पाटील यांचाच होता त्यांना हा निर्णय पटला नाही.

**राज्यपालांना अधिकार :-**

नागपूर कराराच्या अनुषंगाने कलम ३७१(२) अंतर्गत भारताचे राष्ट्रपती केव्हाही हुकूम काढून महाराष्ट्राच्या राज्यपालांवर खालीलप्रमाणे विशेष जबाबदारी सोपवू शकतील. -

अ) महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वेगळी वेगळी विकास मंडळे स्थापन करण्याचा राज्यपालांना अधिकार राहील.

ब) राज्याच्या गरजा लक्षात घेतल्यावर अशा विभागीय विकास मंडळांना त्यांच्या विभागातील विकास खर्चासाठी न्याय प्रमाणात निधीचे वाटप करण्याची जबाबदारी राज्यपालांवर राहील.

क) तांत्रिक व व्यवसाय शिक्षणाच्या पुरेशा सुविधा त्या-त्या भागांतील लोकांना मिळवून देणे. राज्य शासनाच्या नौकरीत सगळयांना विभागीय वाटप करुन पुरेशी संधी उपलब्ध करुन देणे ही सुध्दा राज्यपालांनी जबाबदारी राहील.

राज्यघटनेने घटक राज्याच्या संदर्भात विधानसभेला आर्थिक बाबतीत सर्वोच्च अधिकार दिले असले तरी ३७१(२) कलमान्वये राज्यपालाचा स्वतंत्ररित्या भागाच्या विकासाचे विशेष अधिकार मिळतात. राज्यपालांना मिळणारे हे विशेष अधिकार नागपूर कराराचे फलीत आहे. हे नागपूर कराराचे विशेष महत्व निविवाद सिध्द करणारे आहे. यादृष्टीने नागपूर कराराच्या अनुषंगाने कलम ३७१(२) चे संविधानिक मूल्यांकन विदर्भाच्या अनुशेषाच्या निर्मुलनासाठी जनप्रतिनिधी केलेल्या कार्यांचे अध्ययन महत्वाचे ठरते. तसेच वर्तमान स्थितीमध्ये विदर्भातील निधीच्या उपेक्षांचे आणि विकासाचा संरक्षणाचे संविधानातील घलान म्हणून अभ्यास करणे अत्यंत महत्वपुर्ण आहे.

संयुक्त महाराष्ट्रात १९६० साली स्थापन झाला असला तरी विदर्भात बापुसाहेब अणे, टी. जी. देशमुख, आणि त्यानंतर जांबुवंतराव धोटे यांच्या नेतृत्वात फॉरवर्ड ब्लॉक स्वतंत्र विदर्भाची मागणी करुन आंदोलन करीत होते. जांबुवंतराव धोटे विधिमंडळात आग्रही आणि आक्रमण करीत असतांना काँग्रेसमधून नाशिकराव तिरपुडे, वसंत साठे, साळवे इत्यादी नेते विदर्भ विकासाचा अनुशेष मांडून विदर्भ विकासास स्वतंत्र लॉबी चालवित होते. विदर्भ अनुशेष आणि स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचा रेटा या प्रभावातून आणि दबावातून दांडेकर समिती नेमल्या गेली तीचा अहवाल प्रकाशीत झाल्यानंतर, अस्तीत्वात आलेल्या १९८५-९० च्या तृतीय क्रमांकाच्या विधानसभेत विदर्भ अनुशेषाचा प्रश्न ऐरणीवर आला आणि जनप्रतीनीधीनी आग्रही आणि आक्रमक

भुमिका घेत, विदर्भ विकासासंबंधी विधिमंडळात शासनाला धारेवर घरल्याचे दिसते १९९५-२००० या युती सरकारच्या काळ विदर्भ प्रश्नाची विधिमंडळातील क्रमवारी प्रथम क्रमांकाची दिसते.

विदर्भातील काँग्रेसची पडझड आणि सेना, भाजपाचा वाढता प्रभाव व विदर्भातील आमदारांची जागृकतेमूळे दांडे समीतीच्या अंमलबजावणीसाठी शासनावर दबाव वाढल्याचे दिसते. म्हणून काँग्रेस सरकारने दांडेकर समीतीच्या अहवाल निर्देशनानूसार कामाचे पुर्नमुल्यांकन करण्यासाठी १९९४ साली निर्देशांक व अनुशेष समीती स्थापन करण्यात आली. ति अहवाल १९९७ मध्ये युती सरकार असतांना सादर केला. बाळासाहेब ठाकरे यांनी विदर्भाच्या विकासासंबंधी 'भगवी पत्रीव जाहीर केली आणि विदर्भ अनुशेष नागपूर अधिवेशनामध्ये अग्रक्रमांकाने चर्चेल्याचे दिसते.

विदर्भांच्या अनुशेषाची घग आणि विदर्भातील नेत्यांचा असंतोष लक्षात घेता काँग्रेस पक्षाने विदर्भातील नेते सुधाकररा नाईक यांना मुख्यमंत्री बनविले आणि १९९३ मध्ये मुंबईतील बाँम्बस्फोटानंतर केंद्रीय मंत्री मंडळामध्ये गेलेले शरद पवार पून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तरी विदर्भाच्या अनुशेषावरील तिव्रता कायम राहून विदर्भांच्या अनुशेषाची तिव्रता गतीशील राहू १६९ प्रश्न चर्चेल्या गेल्यावरुन तिसऱ्या क्रमांकात गतीशील राहील्याचे दिसते.

२००५-१० मध्ये विदर्भ अनुशेष चर्चा चवथ्या क्रमांकावर असल्याचे दिसते. विदर्भात अनुशेषासंबंधी वाढता असंतो आणि विदर्भातील दबावगटांनी दत्ता मेघे, पांडुरंग फुंडकर, गोपालदास अग्रवाल, रमेश निकोसे इत्यादींनी स्वतंत्र विदर्भाच मागणी करुन रेटा कायम ठेवला व विदर्भ अनुशेषावर विधिमंडळात चर्चा झाल्याचे दिसते. २००० ते २००५ या आघाड सरकारच्या नेतृत्त्वात ५ व्या क्रमवारीत विकासासंबंधी अनुशेषासंबंधीत एकूण ९६ प्रश्न चर्चिल्या गेलीत.

विदर्भातील कर्नाटकात जाणाऱ्या नद्यांचा पाण्याचा वाटा निर्धारीत वेळेत पूर्ण करण्याच्या उद्देश्याने कृष्णा खो जलसिंचन विकासावर कर्जरोखे उभारुन अतिरिक्त खर्च युती सरकारच्या कालावधीत झाला असे मानल्या जाते. प महाराष्ट्रातील नेत्यांचा दबाव आणि निधीचा अभाव यामुळे या कालावधीत पक्षीय दबाव असूनही विदर्भीय जनप्रतीनिधीवर विदर्भ प्रश्नासंबंधी दबाव आला असावा त्यामुळे तुलनेने विदर्भ विकाससंबंधी ५ च्या क्रमांकावर चर्चा या कालखंडात दिसते.

**विदर्भ अनुशेषासंबंधीत चर्चिल्या गेलेल्या प्रश्नांसबंधी वारंवारीता दर्शक तक्ता**

| | १९८५-९० | १९९०-९५ | १९९५-२००० | २०००-२००५ | २००५-१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| विधान सभा सदस्य | ६६ | ६६ | ६६ | ६६ | ६६ | |
| सिंचनावर विचारलेले प्रश्न | १९ | ३२ | ४५ | ३१ | ४२ | १६९ |
| रस्ते | १५ | २५ | २० | ०९ | ११ | ८० |
| उद्योगधंदे | २० | २४ | २३ | १२ | १३ | ९२ |
| कृषी आधारित | २४ | १८ | २६ | १० | १८ | ९६ |
| पाणीपुरवठा | १२ | १६ | ०८ | ०७ | १० | ५३ |
| नौकरी संदर्भात | ०८ | १० | ०९ | ०५ | ०७ | ३९ |
| विदर्भाचा अनुशेषा संदर्भात | ३७ | २८ | ३३ | १२ | २८ | १३८ |
| **एकूण** | **१४७** | **१६९** | **१७६** | **९६** | **१४२** | **७३०** |

विदर्भातील रस्त्यांसंबंधी १९८५ ते २०१० या पाच पंचवार्षीकांमध्ये एकूण ८० प्रश्नांवर विदर्भातील आमदारांनी विधिमंडळात चर्चा केली. या मध्ये १९८५-९० मध्ये १५ प्रश्न, १९९०-९५ मध्ये २५ प्रश्न, १९९५-२००० मध्ये २० प्रश्न, २००५-२००५ मध्ये ०९ प्रश्न आणि २००५-२०१० मध्ये ११ प्रश्नांवर विधिमंडळात चर्चा झाल्याचे दिसते. यामध्ये १९९०-९५ या पंचवार्षीकात रस्त्यांचा विकासासंबंधी जनप्रतीनीधी अग्रक्रमाने प्रयत्नशील असल्याचे दिसते. १९९५-२००० मध्ये २० प्रश्न चर्चीले सारांशाने १९९०-९५ आणि १९९५-२००० मध्ये विदर्भातील रस्ते विकासासंबंधी जनप्रतीनीधीची अधिक प्रयत्नशिलता दिसते.

**उद्योगधंदे :-** १९८५-२०१० या ५ पंचवार्षीकांमध्ये एकूण विदर्भातील उद्योगधंद्यावर विदर्भातील जनप्रतीनीधींनी ९२ प्रश्नांवर चर्चा केली. यामध्ये १९८५-९० मध्ये २० प्रश्न, १९९०-९५ मध्ये २४ प्रश्न, १९९५-२००० मध्ये २३, २०००-२००९ मध्ये १२ आणि २००५-१० या कालावधीत १३ प्रश्नांवर चर्चा झाली. १९९०-९५ मध्ये २४ आणि १९९५-२००० मध्ये २३ चर्चा केल्या प्रश्नांवरुन आधुनिक प्रयत्नशीलता निदर्शनास येते व १९८५-९० मध्ये २० चर्चीलेल्या प्रश्नांवरुन प्रयत्नशीलतेचा आलेख २०००-२००५ आणि २००५-१० मध्ये उतरणीवर दिसतो. तर सारांशाने १९९०-९५ मध्ये उद्योगधंद्यासंबंधी जनप्रतीनीधीची प्रयत्नशीलता अधिक दिसते.

**कृषी आधारित उद्योग :-** कृषीसंबंधी उद्योगातील संबंधात १९८५-२०१० या ५ पंचवार्षीकात एकूण ९६ प्रश्नांवर महाराष्ट्र विधिमंडळात चर्चा झाल्याचे दिसते. यापैकी सर्वात जास्त म्हणजे २६ प्रश्न १९९५-२००० मध्ये तर १९८५-९० मध्ये २४ प्रश्न चर्चिल्या गेले. त्यानंतर १९९०-९५ मध्ये १८ आणि २००५-१० मध्ये १८ प्रश्नांवर चर्चा झाली व २०००-२००५ मध्ये १० प्रश्न

चर्चिल्या गेले. सारांशाने १९८५-२००० आणि १९८५-९० मध्ये जनप्रतिनिधींची कृषी आधारित उद्योगासंबंधातील प्रत्यनशीलता सर्वात जास्त दिसते.

**पाणीपुरवठा :-** विदर्भातील पाणीपुरवठाच्या प्रश्नांवर १९८५-२०१० पर्यंतच्या ५ पंचवार्षीकांमध्ये विधिमंडळात ५३ प्रश्नांवर चर्चा झाली. पैकी १९९०-९५ मध्ये १६, १९८५-९० मध्ये १२, २०००-१० मध्ये १०, १९९५-२००० मध्ये ०८, आणि २०००-२००५ मध्ये ७ प्रश्नांवर विधिमंडळावर चर्चा झाली. यापैकी १९९०-९५ मधील पाणीपुरवठा प्रश्नांवर प्रयत्नशिलतेचा अग्रक्रम दिसतो. त्यानंतर द्वीतीय क्रम १९८५-९० चा दिसतो. सारांशाने पाणीपुरवठावर १९९०-९५ मध्ये विदर्भातील जनप्रतीनिधीची प्रयत्नशीलता अधिक दिसते.

**नौकरी संदर्भातः** संयुक्त महाराष्ट्रात सामील होतांना विदर्भातील लोकसंख्येच्या प्रमाणात महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विदर्भातील नागरीकांना प्रतीनीधीत्व दिल्या जाईल हे अधोरेखीत केल्याचे दिसते. तथापी १९८५-२०१० पर्यंत ३९ प्रश्नांवर नोकरीसंदर्भात चर्चा झाली. यामध्ये सर्वात जास्त १९९०-९५ मध्ये १०, १९८५-९० मध्ये ०८, १९९५-२००० मध्ये ९, २००५-१० मध्ये ७, तर २०००-२००५ मध्ये ०५ प्रश्नांवर चर्चा झाली. यावरुन विदर्भातील नागरीक सेवेच्या सहभागाचा नागपूर कराराअंतर्गत उद्दिष्ट्यांच्या अनुषंगाने १९९०-९५ आणि १९९५-२००० मध्ये प्रयत्न तौलानिक दृष्ट्या विशेष करुन दिसते. सारांशाने नोकरी संदर्भात १९९०-९५ आणि १९९५-२००० प्रयत्नाशीलता तौलानिक दृष्ट्या उल्लेखनीय दिसते.

**शिक्षण :-** १९८५-२०१० या ५ पंचवार्षीकांमध्ये विदर्भातील शैक्षणिक प्रश्नासंबंधी ६३ प्रश्न चर्चिल्या गेली या पैकी १६ प्रश्न १९९०-९५ तर १९८५-९० आणि १९९५-२००० मध्ये १२ प्रश्न व २००५-१० मध्ये १३ प्रश्न चर्चीलेत. २०००-२००५ मध्ये १० प्रश्नांवर चर्चा झाली. सारांशाने शिक्षणाच्या संदर्भात १९९०-९५ मध्ये जनप्रतीनीधींची विशेष क्रियाशीलता दिसते. आणि शैक्षणीक प्रश्नासंबंधीचा आलेख फार तफावत दिसत नाही.

**विदर्भाचा अनुशेष :-** विदर्भ संयुक्त महाराष्ट्रामध्ये समाविष्ठ होत असतांना त्याचा सर्व क्षेत्रातील अनुशेष समन्यायी, समतोल विकासाचा समतोल राखण्याचे घटनात्मक अभिवचन करारबद्ध केले असले तरी विदर्भाचा अनुशेष वाढतच गेला. तो दुर करण्यासंबंधी विदर्भातील जनप्रतीनीधी प्रयत्नाशील असल्याचे दिसते. संबंधीत ५ पंचवार्षीकांमध्ये एकूण १९८ प्रश्न विदर्भाच्या अनुशेषांसंबंधी चर्चिल्या गेले यापैकी १९८५-९० मध्ये ३७, १९९५-२००० मध्ये ३३, १९९०-९५ मध्ये २८ आणि २००५-१० मध्ये २८ तर २००९-१० मध्ये १२ प्रश्न चर्चीलया गेले. एकूणच १९८५-९० मध्ये त्यानंतर १९९५-२००० मध्ये अनुशेषासंबंधी विशेष क्रियाशीलता दिसते. तर १९९०-९५ आणि २००५-१० मधील प्रयत्नशीलतेचा क्रम दिसतो. विशेषत्वाने विदर्भाच्या अनुशेषासंबंधी विदर्भातील जनप्रतीनीधीच्या प्रयत्नशीलतेचा आलेख जवळपास सारखा असला तरी २०००-२००९ मध्ये प्रयत्नशिलतेचा क्रम घसरलेला दिसतो.

विदर्भात बारमाही पाणी असणाऱ्या नद्या लक्षावधी घनमीटर पाणी वाहून नेतात त्याचा विदर्भातील जमीनीचा सिंचनासाठी उपयोग होत नाही. त्यासाठी नद्यांवर धरणे बांधुन पाणी अडविल्या जावे, बंधारे, आणि पाटचऱ्या बांधुन विदर्भातील सिंचन क्षमता व व्यवस्था विकसीत करावी विदर्भाची जमीन अतिशय सुपीक असून कोरडवाहू आहे. सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी पाणी अडविण्यासाठी समन्यायी निधी विदर्भाच्या वाट्याला यावा विदर्भातील सिंचनाची कामे वेळेत पूर्ण व्हावीत अन्यथा प्रकल्प वर्षानुवर्षे रखडत जावून त्याचा खर्च वाढत जातो. विदर्भ संयुक्त महाराष्ट्रात सामील होतांनाच तो पश्चिम महाराष्ट्र, उर्वरीत महाराष्ट्र या तुलनेत मागासलेला होताच. प्रगत विभागातील राज्यर्कते, जनप्रतीनीधी अधिकाअधिक नीधी त्यांच्याकडे वडता करुन विदर्भाकडे दुर्लक्ष्य होईल अशी भीती विदर्भातील आमदारांनी वारंवार व्यक्त केल्याचे दिसते.

**निष्कर्ष :-**


विदर्भाच्या प्रश्नांसंबंधी विदर्भातील जनप्रतिनिधी सक्रीय आणि आग्रही असले तरी सत्ताधारी पक्षाचे नेतृत्त्व, मुख्यमंत्री जरी विदर्भातले असले तरी आणि विरोधी पक्ष नेतृत्त्व विदर्भ विकाससंबंधी अनुकूल दिसत नसल्यामुळे पक्षिय धोरण आणि श्रेष्ठ यांची बंधने विदर्भातील जनप्रतिनिधींवर असल्यामुळे ते विदर्भाचा अनुशेष पूर्ण करण्यासंदर्भात त्यांच्या मर्यादा येतात. त्यामुळे वैदर्भिय जनप्रतिनिधींच्या अनास्थेमुळे विदर्भाचा अनुशेष निर्माण झाला असावा.

**शिफारसी :-** १) विदर्भातील भूपृष्ठ सिंचन पाण्यापेक्षा भूजलाचा हिस्सा मोठा आहे म्हणून त्याला स्वतंत्र विकास निर्देशांक म्हणून समजण्यात यावे. २) विदर्भात कापसाचे पीक मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे तसेच डोंगराळ चढउतार असणाऱ्या प्रदेशांमुळे आवश्यक असले तेथे पाईपलाईनद्वारे पाण्याचे वितरण करण्यात यावे. ३) वैज्ञानिक दृष्टीने जलवाहक मापनाच्या आधारे, पावसाच्या पाण्याची साठवण हाती घेण्यात यावी तसेच भूजल तज्ञांच्या शिफारसीच्या आधारे, प्रत्येक ठिकाणास आणि परिस्थितीशी अनुरूप असणारे आवश्यक ते उपाय तयार करण्यात यावे. ४) सिंचन प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठीच्या प्रशासकीय यंत्रणा त्यांच्या जल वितरण क्षमतेसह सुधारल्या पाहिजे आणि सिंचन तसेच सिंचनेत्तर प्रयोजनाच्या घनपरिमाणांच्या आधारे जल वितरणाच्या तत्त्वांचे बारकाईने अनुपालन करावे. ५) नक्षलवादी कारवायांमुळे विदर्भाच्या ज्या क्षेत्रांमधील आर्थिक विकासावर प्रतिकूल रितीने परिणाम झालेला आहे. त्या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात यावे आणि या प्रदेशांतील प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावेत. ६) राज्याच्या संपूर्ण आदिवासी विकास योजना, आरोग्यविषयक साक्षरतेचा प्रसार, गावांमध्ये स्वच्छता,

SAI JYOTI

# BUSINESS ECONOMICS

Prof. Manojkumar V. Jagtap Prof. Akash Bele



Business Economics

© AUTHORS

No part of this book shall be reproduced, stored in retrieval system, or translated in any form or by any means, electronic, mechanical, photocopying and/or otherwise without the prior written premission of the publishers.

**ISBN : 978-93-86011-87-9**

**FIRST EDITION : 2017**

**Printed and Published By :**

**Naresh Khapekar**

SAI JYOTI PUBLICATION

Teen-nal Chowk, Kasarpura,

Behind Panjivani Market,

Itwari, Nagpur.

Ph. No. : 9764673503

E-mail id : sjp10ng@gmail.com

Website : www.saijyoti.in

**Sales Office :**

SAI JYOTI PUBLICATION

Plot No. 29, Indira Nagar,

Behind T.B. Ward, Nagpur.

Ph. No. : 9923693506

**Type Setter :**

**Hari Om Computers**

Nagpur.

Ph.: 9673550720

# PREFACE

It is a matter of great pleasure to place the edition of the book entitled **'Business Economics '** before the students' community. No student can undermine the importance of studying economics as it is closely associated with various business decisions. This book is designed as per the requirement of the students in a simple and lucid language. The presentation of subject matter is systematic and very effective.

The book can also be used for the students of not only B.Com students but also by BBA, B.com (CA), DBM and relevant disciplines of not only Amravati University but also other State Universities for the U.G. course in Commerce and Management.

The authors express their gratitude to publisher of this book **Sai Jyoti Publication** for their support. We hope you enjoy this book and come to appreciate the crucial role that economics plays in our lives and particular in business.

**Authors**

# Syllabus

**B.Com. Part - I Semester - II**

**BUSINESS ECONOMICS**

Time: 3 Hours | Marks: 80

### UNIT-I

**BUSINESS AND MANEGERIAL ECONOMICS:**

Meaning and characteristics of Business Economics, Meaning, Definition and characteristics managerial Economics. Nature and Scope of Managerial Economics.

Objectives and Importance of managerial Economics. Relation of managerial Economics with Business Economics and Business Management.

### UNIT-II

**MARKET STRUCTURE:**

Meaning and classification of Markets. Working of Price Mechanism. Monopoly: Meaning and Characteristics.

Price determination under monopoly Price discrimination under monopoly.

### UNIT-III

**MARKET STRUCTURE**

**Monopolistics competition :** Meaning and Characteristics.

Price determination in monopolistic competition.

**Oligopoly :** Meaning and characteristics. Price determination under Oligopoly.

**Perfect competition :** Meaning, Characteristics and determination.

### UNIT-IV

**FACTORS PRICING**

Nature of demand & supply of factors inputs. Marginal productivity theory.

**WAGES:** Meaning & Types. Determination of wages and Exploitation of Labour.

**RENT:**Concept, Ricardian and modern theories of Rent, Quasi Rent.

### UNIT -V

**FACTORS PRICING:**

INTEREST: Concept and time preference.

Loanable funds and Liquidity preference theory of Interest.

**PROFIT:** Meaning and Definition.

Dynamic & Risk bearing theory of Profit. Innovation theory of Profit.

# ABOUT AUTHOR



## Prof. Manojkumar V. Jagtap

Prof. Manojkumar V. Jagtap has been teaching since last 26 year in Commerce Faculty. Presently he is working as a Associate Professor and Head of Dept. of Commerce at Shri shivaji Education Society, Amravati's Y.D.V.D Arts, Commerce College, Teosa Dist. Amravati.

He has served as a Board of Studies member in commerce Board in 1992-1995 and then B.O.S member in A/C State Board and member of commerce faculty in 2007-2012. He is also a member of various Professional, Educational, Social and Institutional bodies and also worked on various University level committees. He organized one state level conference on ' Power Crizes in Maharastra' (Nature and Challenges) on 6 Feb 2010.

He has several Research Paper to his credit at National, State and International conference SGB Amravati University and Amravati Divisional for H.S.C. Standard.



## Prof. Akash Bele

Prof. Akash Bele is M.Com (Merit), MBA, and B.Ed. He is presently working with Sevadal Education society, Nagpur. He has 4 Years of Teaching Experience. His teaching areas include Economics, Business Management and Finance.

He is University topper for M.Com, M.B.A. and achieved Gold medal in Commerce and Achieved Best lectureship Award. Author has also worked with Indira Gandhi National Open University Nagpur Center as Lecturer and Academic Counselor for Master, bachelors, Diploma and certificate Programmes. He is core committee member of DBNI, Nagpur. Author Has more than15 Book Published Under his credit. His expertise lies in Economics, Operation Management, Organizational Behavior, Business Research, Auditing Account, entrepreneurship Development And Skill Development

ISBN-978-93-86011-87-9

Rs. 195/-

Published by : SAI JYOTI PUBLICATION
Behind Chawla Sadi Center, Tin-nal Chowk, Kasarpura, Itwari, Nagpur - 440002.
Phone : 9764673503, 9923593503
email : sjp10ng@gmail.com